DECISIONS

FROM

THE SHAHU & PESHWA DAFTAR.

00072677

JAC
954·03
MAW/Dec
72677

NOT TO BE ISSUED OUT
WITHOUT PERMISSION.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

Digitized with financial assistance from

on 16 November, 2018

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

SELECTIONS FROM THE GOVERNMENT RECORDS IN THE ALIENATION OFFICE, POONA.

DECISIONS

FROM

THE SHAHU & PESHWA DAFTAR

CONTAINING

(WATAN-PATRAS, NIVA'D-PATRAS &c.,)

72677

SELECTED BY

The Late Rao Bahadur Ganesh Chimnáji Vád, B. A.
Alienation Assistant to the Commissioner C. D., Poona.

AND EDITED BY

PURSHOTAM VISHRAM MAWJEE, J. P., M. R. A. S.

AND

D. B. PARASNIS.

BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC SOCIETY
JACKSON MEMORIAL COLLECTION.

PUBLISHED WITH THE PERMISSION OF THE GOVERNMENT OF BOMBAY.

BY

PURSHOTAM VISHRAM MAWJEE, J. P., M. R. A. S.

[Price 1 Rupee]

1909.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

JNC
954.03
Mod/Dec
72677

Printed at the "Arya-Bhushana" Press, Poona

BY

HARI NARAYEN GOKHALE.

00072677

NATIONAL ARCHIVES OF INDIA

Index.

1.	Watan-patra	1
2.	Vratti-patra	5
3.	Vratti-patra	8
4.	Abhaya-patra	11
5.	Watan-patra	12
6.	Watan-patra	26
7.	Watan-patra	34
8.	Watan-patra	36
9.	Vratti-patra	42
10.	Watan-patra	46
11.	Nivád-patra	56
12.	Abhaya-patra	56
13.	Extracts from Registers relating to the Administration of Justice	58
14.	Vratti-patra	63
15.	Mahajar	65
16.	Yádi	74
17.	Mahajarnámá	74
18.	Nivád-patra	80

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अनुक्रमणिका.

१. वतनपत्र १
२. वृत्तिपत्र ५
३. वृत्तिपत्र ८
४. अभयपत्र ११
५. वतनपत्र १२
६. वतनपत्र २६
७. वतनपत्र ३४
८. वतनपत्र ३६
९. वृत्तिपत्र ४२
१०. वतनपत्र ४६
११. निवाडपत्र ५६
१२. अभयपत्र ५६
१३. न्यायाधिशाकडील बारानिशींतील उतारे वगैरे... ... ... ५८
१४. वृत्तिपत्र ६३
१६. महजर ६५
१६. यादी ७४
१७. महजरनामा ७४
१८. निवाडपत्र ८०

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वतनपत्रें, निवाडपत्रें वगैरे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वतनपत्रें, निवाडपत्रें,

वगैरे.

वतनपत्र १.

कित्ता वतनपत्र शामजी गंगाधर व गोपाळ तुकदेव आडकुळे कुळकर्णी मौजे पाडळी तर्फ हवेली प्रांत सातारा छ ९ मोहरम सन इहिदे, दिल्हें वतनपत्र ऐसेजें:—तुम्हीं स्वामी-सनिध किल्ले वंदनचे मुक्कामीं सन अशरामध्यें हुजूर येऊन विनंती केली जे, मौजे मजकूरचें कुळकर्ण आपले पूर्वापार वडिलापासून वंशपरंपरा अनुभवीत आहों; त्यास जानो बाकदेऊ व गोपाळ गंगाधर वाळिंबे हे आपल्या वतनास कथला करीत आहेत. सांप्रत गोपाळ गंगाधराचा लेक मोरो गोपाळ, राजश्री चंद्रसेन जाधवराऊ सेनापती याकडे चाकर आहे. व मौजे मजकूर मुकासा सेनापतीचे दिंमत आहे. त्याचे हिमातीनें मौजे मजकुराच्या हिशेबाबद्दल गोपाळ तुकदेऊ यास तलब करून नेऊन, बळेंच त्याचे पदरीं रुपये १५० दीडशें व गल्ला ·।·॥। पावणे साहा मण घालून, दबावून मौजे मजकूरचे कुळकर्णपैकीं तकसिमा दोनचा कागद लेहून घेतला आहे. परंतु मौजे मजकूरचे कुळकर्णास त्यास दखल होऊं दिल्हें नाहीं. आपलें कुळकर्ण आपण करीत असों. त्यांनीं जोरावारीनें कागद लिहून घेतला आहे. तरी स्वामींनीं त्यास हुजूर आणवून, त्याचा व आपला करिना मनास आणून तहकिकात केली पाहिजे, म्हणून विनंती केली. त्यावरून जानो बाकदेऊ व गोपाळ गंगाधर वाळिंबे यांसी हुजूर आणविलें आणि राजश्री सखो विठल न्यायाधीश यांकडे मनसुफीस आज्ञा केली. तेहीं उभयतां वादी यासी जमान होऊन तकरिरा लेहून घेतल्या. शामजी गंगाधर आडकुळे यानीं तकरीर लेहून दिल्ही ऐसीजें:—मौजे मजकूरचें कुळकर्ण वडील परंपरापासोन आपलें, दरम्यान पेशजी आदिलशाही पातशाही असतां, आगा रुजुवान दिवाण किल्ले सातारी-यासी होते. त्यांपाशीं देवजीराम वाळिंबे उभा राहोन, आपला आजा गोविंद नागनाथ आडकुळा यासी तलब करून किल्ले मजकुरीं नेलें. दिवाण मशारनिल्हेहीं देशमुख, देशपांडे प्रांत मजकूर व हमशाही गोत यांचे मतें दोघांचे करिने मनास आणून निश्चय केला जे, दोघे वादी कृष्णेंत घालावे; आणि बाबाजी पाटील मौजे मजकूर यानें क्रियापूर्वक आपले बेताळीस पूर्वज स्मरोन, कृष्णेंत रिघोन, जो पुरातन वतनदार खरा असेल तो हातीं धरून बाहेर आणावा. ऐसा तह करून दिवाण मशारनिल्हे व देशमुख, देशपांडे व हमशाही गोत मिळोन, माहुली संगमीं कृष्णातीरीं आले. दोघे वादी कृष्णेंत उभे केले, आणि समस्ताहीं पाटील मजकुरास शफतपूर्वक सांगितलें जे, तुम्हीं आपले बेताळीस पूर्वज स्मरोन, श्रीकृष्णा साक्ष

NATIONAL ARCHIVES OF INDIA

करून, जो पुरातन मौजे मजकूरचा वतनदार कुळकर्णी खरा असेल त्यास हातीं धरून घेऊन येणें, म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें क्रियापूर्वक पाटील मजकूर कृष्णेंत रिघोन, गोविंद नागनाथ आडकुळा हा मौजे मजकूरचा पुरातन वतनदार कुळकर्णी खरा, ऐसें कृष्णेमध्यें घालोन त्यास हातीं धरून बाहीर निघाला. समस्त गोतास ते क्रिया मान्य झाली. तेहीं गोविंद नागनाथ यासी पाटील मजकुराचे हातीं घेऊन आपले वतनावरी रवाना केलें. कुळकर्णाचा कार्यभाग पूर्वी करीतच होते, त्याही उपरी करीत गेले. ऐसें असतां मागुतीं चौवर्षाउपरी, किल्ले मजकुरीं, आगा रुजुवान दिवाण यांजपाशीं फिरोन वाळिंबे मजकूर उभे राहून वाद सांगितला जे, श्रीकृष्णेची क्रिया केली त्यास आपण रजावंद नाहीं. मौजे मजकूरचे पांढरीवरी दिव्य नेमावें. दिव्यीं खरा होईल त्यानें वतन चालवावें: ऐसा वाद सांगून आपला आजा गोविंद नागनाथ यासी किल्ले मजकुरीं तलब करून नेविलें. तेथें दिवाणजीनें देशमुख, देशपांडे व हमशाही गोत मिळवून, बाळंभट वाळिंबे व गोविंद नागनाथ या दोघांस मौजे मजकूरचे पांढरीवरी नेऊन दिव्य करावें याबद्दल पाठविलें. तेथें समस्त गोत मिळोन हरदू जणा- करवीं दिव्य करविलें. तेथें बाळंभट वाळिंबे यासी रव लागला. हा करिना दिवाणजीपाशीं समस्त गोत येहीं विदित केला. त्यावरून वाळिंबे खोटे ऐसें करून, आपले वडिलास पूर्वापार चालत आले प्रमाणें वतन चालवावयाची आज्ञा केली. मागुतीं वाळिंबे विजापुरास जाऊन, मालुमातीचा फर्मान आपले वडील प्रसंगीं नसतां घेऊन आले. हें वर्तमान आपले वडिलांस कळलेनंतर लखोपंत विजापुरास जाऊन त्यानें मालुमाती फर्मान आणिला, तो बातील करून ताजा फर्मान घेऊन आले. वाळिंबे वतनास दखल नाहींत. आपले वडील सालाबादप्रमाणें चालवीत आहेत. त्याही उपरी महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामींस हा देश अर्जानी झाला. ते समयीं राजश्री दत्ताजीपंत वाकनिवीस यांचे स्वाधीन हा प्रांत होता. त्यापाशीं रामभट वाळिंबे जाऊन उभा राहिला, ऐसें वर्तमान आइकिलें. त्यावरून आपण राजश्री वाकनिवीसपंतापाशीं जाऊन भेटी घेतली. ते समयीं वाळिंबे तेथून गैरहाजीर जाहले. आपण आज्ञा घेऊन गांवास आलों. त्यावरी हा प्रांत राजश्री राघो बल्लाळ अत्रे याचे स्वाधीन जाहला. ते समयीं त्यापाशीं जिवाजी विश्वनाथ व विठल गंगाधर वाळिंबे हयाळ होऊन, आपणास तलब करून, रहिमतपूरचे मुक्कामीं आपल्यास नेलें. तेथें पांच महालचे सुभेदार व देशमुख, देशपांडे हमशाही गोत लोक होते. त्यांचे मतें मौजे मजकूरचे मोकदम व बारा बलुते आपल्यापाशीं बोलावून आणिले, आणि आज्ञा केली जे, पुरातन कुळकर्णी वतनदार जो आहे तो परिछिन्न सांगणें म्हणून आज्ञा केली. त्यावरून मोकदम व बारा बलुते येहीं राजश्री राघो बल्लाळ व देशमुख, देशपांडे समस्त गोत यांसी बोलिले जे, वाळिंबीयासी कुळकर्णाचा आधिकार नाहीं. सालाबाद आडकुळे याचे मौजे मजकुरचें कुळकर्ण वतन खरें; म्हणून बोलिले. त्यावरून आपलें वतन चालवावयासी आपल्यास अभय देऊन गांवास पाठविलें. त्याउपरी राजश्री कबजी बावाचे कारकिर्दीस राजश्री केसो

NATIONAL ARCHIVES OF INDIA

त्रिमल पन्हाळीयासी आले होते. त्यापाशीं जिवाजी विश्वनाथ वाळिंबा जाऊन उभा राहिला. हें वर्तमान आपल्यास कळलें, त्यावरून आपण पन्हाळ्यास गेलों. राजश्री प्रल्हादपंडित न्यायाधीश होते. त्यांस आद्यंत सकल वर्तमान विदित केलें. तेहीं भोगवटा व पूर्वील मौजे मजकूरचे पाटिलानें श्रीकृष्णेची क्रिया करून आपले कुळकर्णी सालाबाद आडकुळे खरे ऐसें झालें आहे. त्याउपरी दिव्यींही वाळिंबे खोटे जाहले, आडकुळे खरे; ऐसें पेशजीचें करीने परस्परें मनास आणून, आपणांस अभयपत्र दिधलें. जिवाजी विश्वनाथ वाळिंबा खोटा केला तो न पुसतां पळोन गेला. आपण अभयपत्र घेऊन गांवास येऊन सालाबादप्रमाणें कुळकर्ण चालवीतच आहों. त्याउपरी राजश्री कोनेरी रंगनाथ सरसुभेदार यापाशीं जिवाजी विश्वनाथ व समस्त वाळिंबे उभे राहिले आणि आपणांस बोलावूं पाठविलें. आपण सरसुभेदार मशारनिल्हेपाशीं गेलों. तेहीं याच महालचे सुभेदार व देशमुख, देशपांडे व मोकदम व समस्त मिळून, उभयतां वादी उभे करून, पुरातन वतनदार कोण हे तहकिकात करणें, म्हणून समस्तास आज्ञा केली. ते समयीं नाईकजी गाढवे देसाई प्रांत मजकूर यानीं समस्त सभेदेखत साक्ष दिली जे, पाडळीचे कदीम वंशपरंपरा कुळकर्ण आडकुळे वतनदार खरे, ऐसें आपले वडील सांगत होते. वाळिंबे यांनीं मौजे मजकूर कुळकर्णी कोणे काळीं केलें नाहीं. वाळिंबीयासी पांढरीवरी घरठाण नांदणूक कदीम नाहीं. ऐसें वर्तमान आपले वडील सांगत आले आहेत. हे साक्ष समस्ता लोकीं मनास आणितां, दोनशां वर्षांची गोही केला. हल्लीं हा मजकूर समस्तांहीं चित्तास आणून वाळिंबे खोटे, आडकुळे पुरातन वतनदार खरे, ऐसें करून, त्यावरून आपल्यास अभय पत्र देऊन गांवास पाठविलें. सालाबादप्रमाणें वतन चालवीत आहों. त्यावरी महाराज राजश्री राजारामसाहेबांचे कारकिर्दीस राजश्री निळकंठ मोरेश्वर प्रधान साताराचे मुक्कामास आले. ते समयीं वाळिंबे त्यापाशीं हयाळ होऊन आपणास मसाला करून गडास नेलें. दोघांचा मुकाबला करावा तों वाळिंबे तेथें गैरहाजीर जाहले. आपण आज्ञा घेऊन गांवास आलों. त्याउपरी काळ कठीण पडला. योगक्षेम चालिला पाहिजे म्हणून मातुश्री व मुलें गांवीं ठेवून आपण उद्योगास गेलों. मागा (हून) राजश्री रामचंद्र पंडितापाशीं वाळिंबे जाऊन मातुश्रीस मसाला करून नेलें. चार महिने तेथें मातुश्रीस कष्टी केले. आणि कागद लेहून घेतला जे, आपला लेक तीम महिन्यांत हजीर करावा म्हणून वायदा केला. आणि मातुश्रीस आज्ञा दिल्ही. आपण प्रवाशी दूर प्रांतीं होतों. तीन महिन्यांत आपलें येणें जाहलें नाहीं. याकरितां वाळिंबे राजश्री परशरामपंतापाशीं जाऊन, पांचशें रुपये कबूल करून देऊन, कुळकर्णास दुसाला पत्र घेतलें जे, गोतमुखें खरा होईलतों मौजे मजकूरचें कुळकर्ण वाळिंबीयांनीं आठ महिने चालविलें. त्यावरी चैत्रमासीं आपण गांवास आलों. मौजे मजकूरचे पाटील व देशकास रुजू झालों. तेहीं सांगितलें जे, वाळिंबे यांनीं दिवाणचा हुकूम आणिला, त्याप्रमाणें वर्तावें लागलें. तूं आपला करिना दिवाणास सांगून पत्र घेऊन येऊन आपलें कुळकर्ण करीत जाणें, म्हणून बोलिले. त्यावरी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

आपण राजश्री आण्णाजी जनार्दन सुभेदार प्रांत मजकूर याकडे जाऊन वर्तमान विदित केलें. तेहीं मौजे मजकूरचे पाटील व देशमुख व शीवझाडे मेळवून तहकिकात करून आपणास दुमाल पत्र दिल्हें. तें गांवीं आणून वाळिंबीयासी दूर करून आपलें कुळकर्ण सालाबादप्रमाणें चालवीत आहों. सदरहू वतनाचे कागद इस्तकबीलपासून होते ते आपल्या घरास आगी लागली ते समयीं कुली दग्ध जाहले. ऐशी तकरीर जाहीर केली. याउपरी जानो बाकदेऊ व गोपाळ गंगाधर वाळिंबे या उभयतांनीं तकरीर लिहून दिल्ही जे, आपलें कुळकर्ण मौजे मजकूरचें पुरातन आहे. आडकुळे कुटुंबासहवर्तमान काळविशदें देश पडिला, ते समयीं फिरत फिरत मौजे मजकुरीं आले. आपले वडिलांनीं गांवांत घरठाण देऊन राहवलें. त्यावरी मौजे मजकूरचे पाटील दिवाण-कार्यप्रसंगीं विजापुरास जावयाचा निर्वाह केला. सांगाते कुळकर्णी पाहिजे, व मागें गांवींचाही मामला चालिला पाहिजे. आपले वडिलांपाशीं दुसरा आपले घरोबियांत शहाणा मनुष्य नव्हता. यास्तव आडकुळा मजकूर यासी कागदपत्र समजावून देऊन गांवीं कुळकर्णगिरीचें गुमस्तेस ठेवून, आपण विजापुरास मौजे मजकूरच्या पाटलासमवेत गेला. तेथें कार्य प्रयोजन संमधें तीन वरुषें लागलीं. त्यावरी गांवास आले. तंवरी आडकुळे गुमस्तगिरीचा कार्यभाग करीत असतां, पाटील व आपण एकदील होऊन आमच्या चहाडिया कित्येक सांगोन, मौजे मजकूरचे पाटील व आपले वडील यांमध्यें विक्षेप घालून, पाटीलास मेळवून घेऊन आडकुळे आपणासीं वाद सांगों लागले. याकरितां ते समयीं आदिलशाही पातशाही कारकिर्दीस आगा रुजुवान दिवाण किल्ले सातारीं होते, त्यापाशीं आपले वडिलांनीं करिना सांगितला. त्यावरून आडकुळीयासी तलब करून किल्ले मजकुरास आणिलें. ते समयीं दोघे वादीस श्री कृष्णेंत घालून मौजे मजकूरचे पाटील येहीं क्रियापूर्वक जो कदीम वतनदार त्यास हातीं धरावा ऐसा तह करून, समस्त गोत सहवर्तमान कृष्णातीरीं माहुलीसंगमीं आले. उभयतां वादी कृष्णेंत घालून पाटीलमजकूर यासी क्रियापूर्वक आज्ञा केली. त्याणें कृष्णेंत जाऊन आडकुळा हातीं धरून आणिला. आडकुळे याचा व पाटील मजकूर याचा एकदील पहिलेपासून सुलोख होता, त्याकरितां त्याची क्रिया आपले वडिलास मानली नाहीं. ह्मणून मागती आगा रुजुवान दिवाण यापाशीं अर्ज केला जे, दोघे वादी संघातें घेऊन मौजे मजकूरचे पांढरीवरी देवापाशीं दिव्य करावें ह्मणून. त्यावरून दिवाण मशारनिल्हे देशमुख, देशपांडे सहित मौजे मजकुरास आले. पांढरीवरी देवापाशीं दिव्य करविलें. त्यास दिव्यामध्यें आडकुळे यांनीं राळ घातली. तेणेंकरून आपले वडिलास दिव्य लागलें. ऐशी तकरीर लेहून दिल्ही. सदरहू दोघांच्या तकरीरा छ २५ रमजान सन इहिदे अशर मया अलफ किल्ले सातारचे मुक्कामीं मनास आणितां वाळिंबीयाचा भोगवटा पहिलेपासून झाला नाहीं. आदिलशाही कारकिर्दीमध्यें आगा रुजुवान दिवाण किल्ले सातारा येहीं आपण व देशमुख, देशपांडे समस्त गोतसहित माहुलीसंगमीं जाऊन

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मौजे मजकूरच्या पाटलास क्रियापूर्वक आज्ञा केली. त्यानें आपले बेताळीस स्मरोन कृष्णेंत रिघोन पुरातन वतनदार आडकुळे खरे, ऐसें बोलोन त्यास हातीं धरून बाहीर आणिलें. त्याही उपरी वाळिंबीयानें दिव्याचा करार केला. तेथेंही वाळिंबे दिव्यीं लागले, ते खोटे जाहले. आडकुळे कदीम वतनदार भोगवटा चालत आला आहे. ऐसें जाणवून तुह्मांस मौजे मजकूरचें कुळकर्णाचें वतन तुह्मांस वंशपरंपरेनें दुमाला केलें असे. सदरहू वतनास हक्क लवाजिमा इनाम सालाबाद चालत आलेप्रमाणें घेऊन वतन अनुभवीत जाणें. मोरो गोपाळ वाळिंबे यानें राजश्री चंद्रसेन जाधवराऊ सेनापती यांचे निसबत गोपाळ तुकदेऊ आडकुळे कुळकर्णी मौजे मजकूर यासी दबावून, त्याचे पदरीं रुपये दीडशें व गल्ला पावणे साहा मण घातला आणि मौजे मजकूरपैकीं कुळकर्ण दोन्ही तक्षीमा लिहून घेतले. तो कागद सदरहू नख्त व गल्ला तुजकडून त्यास देऊन, त्यानें कागद घेतला होता तो फिरावून देविला. व वाळिंबीयाचा बेदावा कागद तुह्मांस लेहून देविला. वाळिंबे खोटे झाले याकरितां त्याचे माथां गुन्हेगारी रुपये ६०० सहाशें ठेवून हुजूर वसूल घेतला. तुमचें वतन कुळकर्ण मौजे मजकूरचें तुमचे दुमाला केलें ह्मणवून तुह्मांपासून शेरणी रुपये ३०० तीनशें हुजूर घेतले. त्याचा जाब अलाहिदा सादर होईल. तुह्मीं मौजे मजकूरचें कुलकर्णाचें वतन सालाबाद चालवीत आलेप्रमाणें वंशपरंपरेनें अनभवून सुखरूप असणें, येविषयीं पत्रें:—

१ वतनपत्र.
१ सुभेदारास पत्र.
२

वृत्तिपत्रें २.

वेदमूर्ति प्रल्हाद जोशी बिन बापूजोशी व यादव जोशी बिन राम जोशी मांडके जोशी ग्रामउपाध्ये कसबे शिरवळ यासी दिल्हें वृत्तिपत्र ऐसीजें:— रामभट बिन त्रिंबकभट, गोपाळभट बिन केशवभट वाळिंबे उपाध्ये निसबत देशपांडे, परगणे शिरवळ, याचा कसबे मजकूरचे ब्राह्मणांचे घरींच्या ग्रामउपाध्येपणाचा (धंदा) होता. याबद्दल हरदूवादे सन खमसामध्यें भांडत हुजूर आले. त्यावरून मनास आणितां, पूर्वी कसबे मजकुरीं रंभाजी निंबाळकराचे कारकिर्दीत शके १६३९ हेमलंबीनाम संवत्सरीं, देशमुख व देशपांडे यांनीं दोघांपासून जामीन व कतबे घेऊन, चिरपत्रें देऊन कसबे फलटणास गोतांत पाठविलें. त्यास गोताची निशा वाळिंबे याजवळ कागदपत्रें होतीं, त्यावरून निशा नव्हे. तेव्हां गोतानें, त्यानें कसबे मजकुरास पत्रें पाठवून सडी आणवून सडीप्रमाणें निवाडपत्र करून गोतानीं जोशी यास दिल्हें कीं, मांडके जोशी ग्रामउपाध्ये खरे; वाळिंबे, देशपांडे याचे घरचे उपाध्ये. यास ब्राह्मणांचे घरीचे उपाध्येपणास संमंध नाहीं. ऐशी पत्रें जोशी यास दिल्हीं. त्यावरी वाळिंबे

NATIONAL ARCHIVES OF INDIA

निवाडपत्राप्रमाणें वर्तणूक न करीत. कथला करूं लागले. याकरितां मांडके जोशी शके १६४१ विकारीनाम संवत्सरांत हुजूर येऊन जाहीर केलें. त्यावरून वाळिंबे यांस तलब करून आणिलें आणि हरदु यास श्री महाबलेश्वरास गोतांत पाठविलें. तेथें हरदुजणांनीं राजिनामे नेमोत्तरें लेहून दिल्हें. आणि वाळिंबे गैरहजीर जाहले. याकरितां पांच वर्षें मनसुबी राहिली. त्याउपरी शके १६४६ क्रोधीनाम संवत्सरें, कार्तिक मासीं, प्रल्हाद व यादव-जोशी मांडके व रामभट व गोपाळभट वाळिंबे हे हरदुजण वादे भांडत हुजूर आले. ते समयीं कुल परगणे मजकूरचें गोत, देशपांडे परगणे मजकूर याचे मनसुफीबद्दल हुजूर आणिलें होतें. त्यांचे मतें निर्वाद झाला कीं, वाळिंबे फलटणच्या गोताच्या इनसाफास राजी नाहींत. यास दिव्य नेमून द्यावें ऐसें जाहलें. त्यावरून हरदुजणांस पुरशीस करितां वाळिंबे बोलिले जें, आपली साक्ष गोत देत नाहीं व आपण फलटणच्या निवाडियास राजी नाहीं. आपले वडिलीं पूर्वी जोशी यासी श्रीकेदारेश्वरीं दिव्य केलें आहे. हल्लीं जोशी यांनीं श्रीकृष्णेचें दिव्य करावें. आपण राजी आहों. ह्मणोन हरदुजणांनीं राजिनामे व कतबे लेहून देऊन दिव्यास राजी झाले. त्यावरून शके १६४६ क्रोधीनाम संवत्सरीं, कार्तिक बहुल अष्टमी बुधवारीं बरोबर भिकाजी कृष्ण चिटणीस सुभे मजकूर यासी देऊन माहुली संगमास श्रीकृष्णेस हरदुजणास पाठविलें. तेथें जाऊन प्रल्हाद जोशी याणीं स्नान करून, मस्तकीं शिरोपत्र बांधून हातीं जल घेऊन बोलिले कीं, आपण कसबे मजकुरीचे काळे पांढरीचे मांडके जोशी, ग्रामउपाध्ये, पुरातन वतनदार खरे; आणि वाळिंबे, देशपांडे यांचे उपाध्ये ऐसें बोलोन गोपाळभट वाळिंबे याचे हातावर जल त्रिवार घातलें. त्यासी दशरात्रीची मुदत केली. दशरात्रीमध्यें जोशी यास क्रिया लागली नाहीं. त्यावरून जोशी खरे झाले. वाळिंबे खोटे झाले. त्यावरून राजश्री नारो पंडित सचीव यांनीं जिल्हेचीं पत्रें व खालसाचीं पत्रें करून दिल्हीं. आणि वाळिंबे मागती दुराग्रहास प्रवर्तोन श्रीकृष्णातीरीं उपवास करीत बसले. त्यावरून समस्त सरकारकून यांनीं स्वामींस विनंती केली कीं, वाळिंबे ब्राह्मण कृष्णातीरीं उपवास करितात. आणि अग्निदिव्य करूं ह्मणतात. त्यासी बोलावून आणून अग्निदिव्य नेमून देविलें पाहिजे. त्यावरून पंत-सचीव व राजश्री पंताजी शिवदेव यास आज्ञा केली. त्यावरून मशारनिल्हेनीं हरदुजणास बोलावून राजिनामे जमानकतबे हरदुजणाचे घेऊन, श्री केदारेश्वरीं कसबे मजकूर येथें वाळिंबे यासी अग्निदिव्य नेमून दिल्हें. बरोबर महादाजी नारायण सभासद दिंमत सचीव यांस देऊन कसबे मजकुरीं पाठविलें. तेथें जाऊन राजश्री शामजी हरी नामजाद प्रांत मावळे व राजश्री रामाजी यादव दिंमत खालसा देशमुख व देशपांडे कसबे मजकूरीं मिळून वाईकर रामभट हुशींग व नारायणभट हुशींग यांचे विद्यमानें मार्गशीर्ष शुद्ध पंचमी रविवारीं दिव्य करार केलें. त्यास दिव्य समयीं रविपात्रांतील तेल तुपास अग्नि लागला आणि जळोन गेले. ते दिवशीं दिव्य राहिलें. त्या उपरी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

दिव्यास दुसरा मुहूर्त समस्तांचे विचारें शके १६४७ विश्वावसूनाम संवत्सरें, मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशीस सोमवारीं निश्चय केला. त्यावरून दोघे वादी यांनीं राजिनामे लेहून दिल्हें. ते दिवशीं यथाविधा शास्त्र पाहून, तूप तेल वजन रुपये सत्तरभार घालून सत्व करून रविपात्र सिद्ध केलें. गोपाळभट वाळिंबे यांजकडून शिस्ता (?) करून मस्तकीं शिरोवस्त्र बांधिलें कीं, माडके जोशी यांजपूर्वी आपल्या वडिलीं ब्राह्मणांचें घरचें ग्रामउपाध्येपण खादलें. जोशी यास गणेश घटिका या वेगळे ब्राह्मणांचें घरीं प्रयोजन कांहीं नाहीं. ह्मणून पूर्वी आपले वडिलीं दिव्य केलें आहे. हल्लीं आपण दिव्य करितों. ऐसें श्रीपत्र बांधोन गोपाळभट बोलिले कीं, पत्रीं अर्थ आहे, तो यथार्थ आहे. ऐसें बोलोन रवा काढिला. त्याउपरी दुसरे दिवशीं सगस्त सभानाईक व देशक परगणे मजकूर यांनीं लखोटा फोडून गोपाळभटाचा हात पाहिला, तों हाताच्या पांच बोटास पांच फोड आले. हें पाहून हातास खलित्या घालून लखोटे करून शामजी हरी सुभेदार व रामाजी यादव फौजदार व देशमुख व देशपांडे यांनीं खबरा लिहून, हुजूर स्वामीकडे मौजे धोम, परगणे वाई तेथील मुक्कामास पाठविले. तेथें राजश्री स्वामींनीं श्री नरसिंह संनिध कृष्णातीरीं सरकारकुनाच्या विद्यमानें गोपाळभटाच्या हातास फोड आले हें पाहून, समस्तांचें मतें वाळिंबे खोटे जाहले. मांडके जोशी खरे जाहले. त्यास स्वामींनीं वस्त्र दिल्हें आणि वाळिंबे यांजकडून जोशीयास येजीतखत लेहून देविलें. बदस्तूर रामभट वाळिंबे कीं, आपण गोतमुखें श्रीकृष्णेचे क्रियेमुळें श्रीकेदारेश्वरीं रवा आपण काढिला, त्यामुळें आपण खोटें झालों; व आपणास ब्राह्मणांच्या घरचे ग्रामउपाध्येपणास संबंध नाहीं. आपणाकडे जोशी याचे वाडे दोन्ही होते ते जोशी यांच्या स्वाधीन केले असत. म्हणोन येजीतखत लेहून दिल्हें. मांडके जोशी कसबे मजकूरचे ग्रामउपाध्ये वतनदार जाणोन, जोशी मशारनिल्हेच्या ज्योतिष व ग्रामउपाध्येपण व धर्माधिकारीपण तुमच्या दुमाला केलें असे. वाळिंबे याजजवळ मालमातीचे कागद असतील ते रद्द असत. जोशी यास वतनसंमधें शेरणी रुपये १५० दीडशें दुतर्फा जिल्हेकडे व खालसाकडे वसूल जाहला असे. वाळिंबे खोटे जाहले त्यापासून गुन्हेगारी रुपये ३०० तीनशें घेतले असेत. पत्रें माघ शुद्ध चतुर्थी बार छ ११ रजब सन सीत अशरीन मया. म्हणून पत्रें:—

१ वृत्तिपत्र.
१ राजश्री शामजी हरी सुभेदार प्रांत मावळ.
१ राजश्री रामाजी यादव दिंमत खालसा.
१ देशमुख व देशपांडे, परगणे शिरवळ.

४

वृत्तिपत्र ३.

बार कीर्द छ १९ रमजान सन समान सलासीन मया व अलफ. स्वामी यानीं अमृतराव बिन खंडोजी इबिन बाळाजी नाईक खोपडे देशमुख तर्फ उत्रोली तपे रोहीडखोरें यास दिल्हें वृत्तिपत्र ऐसीजे, तुम्हीं हुजूर कसबे उंब्रजेच्या मुक्कामास येऊन विदित केलें जे, तर्फ मजकूरचे देह २० वीस येथील देशमुखीचें वतन देखील भाऊबंद आपलें आहे. व शिक्के २ दोन पूर्वीपासोन चालत आहेत. त्यास आपण निमेचें भाऊ, आपणाकडे निमे दस्ताचे देह ९॥ साडेनव देखील इसाफत मौजे नाझरें व एक शिक्का आहे. व निमेचे भाऊ नरसिंगराव बिन बिंबाजी नाईक खोपडे याजकडे निमेच्या दस्ताचे देह १०॥ साडे दाहा देखील इसाफत मौजे आंबाडे व एक शिक्का आहे. याप्रमाणें दोन्ही वाटे व दोन शिक्के चालतात. त्यास आपले बाप खंडोजी नाईक यास स्त्रिया पांच ५ होत्या. त्यांपैकीं दोघींचा वंश आहे. त्यास वडील पुत्र बापाचे आपण, उदावा धाकटीचे पोटीचे, व धाकटे बाळाजी नाईक वडील जैनावाचे पोटीचे, येणेंप्रमाणें दोघीजणींस दोघे झालों. त्यास आपले बाप मृत्यु पावलीयावरी त्याजमागें आपण वडील पुत्र शिक्का आपलीयाकडे असावा. ऐसें असतां धाकटे बाळाजी नाईक याजकडे शिक्का आहे. सबब जे वडील बायकोचे पुत्र म्हणून बळास आले आहेत. तरी वडील आपण आहों. धर्मतः न्यायें मनास आणून आपला शिक्का आपलियाकडे देविला पाहिजे. म्हणून विनंति केली. हें वर्तमान बाळाजी नाईक यानीं ऐकोन हुजूर आले. त्यानीं आपला करिना विदित केला कीं, आपल्या बापास स्त्रिया ५ पांच होत्या. त्यांपैकीं वडील स्त्री जैनावा, तिचे पोटीचे आपण बापाचे धाकटे पुत्र. व धाकटी स्त्री उदावा तिचे पोटीचे अमृतराव बापाचे वडील पुत्र, याप्रमाणें दोघींचा वंश आहे. त्यास आपण वडील स्त्रियेचे पुत्र म्हणून बापा माघारे पांचांनीं आपल्या स्वाधीन शिक्का केला. त्यावरून आपण शिक्का करीत आहों. त्यास महालीं अमृतराव यांनीं कजिया शिक्क्याचा आपल्याशीं केला. तेव्हां रामोजी नाईक खोपडे व कृष्णाजी नाईक व वाघोजी नाईक खोपडे यांनीं आह्मां दोघांची समजाविशी केली कीं, शिक्क्याचें उत्पन्न निमे-निम दोघांनीं घ्यावें. शिक्का आपण करावा. नांवें दोघांचीं ल्याहावीं. ऐशी समजाविशी करून आपला कागद त्याकडे व त्यांचा कागद आह्मांकडे देऊन समजाविशी केली आहे. म्हणून करिना. त्यावरून राजश्री चिमणाजी पंडित सचीव यांस आज्ञा केली कीं, यांच्या तकरिरा व कतबे जिल्हेकडे घेणें. त्यावरून सदरहूप्रमाणें तुह्मीं व बाळाजी नाईक यांनीं तकरिरा व कतबे दिल्हे. मग तुह्मां हरदोजणांस आज्ञा केली कीं, तुह्मीं बापाचे पुत्र दोघे; त्यास बायकोच्या वडील-धाकुटपणामुळें कजिया करितां. तरी ये गोष्टीचा निर्णय धर्मशास्त्रीं जो असेल त्याप्रमाणें वर्तावें. ये गोष्टीस राजी होणें असेल तरी राजी होऊन राजिनामे व वर्तावयाचें जामीन देणें. तेव्हां तुह्मीं व बाळाजी नाईक धर्मशास्त्रांतल्या निश्चयास राजी होऊन, राजिनामे दिल्हे व वर्तावयाचे जामीन तुम्हीं जानोजी भोईटे मोकदम मौजे हिंगणगांव परगणे फलटण यांस दिल्हे व

NATIONAL ARCHIVES OF INDIA

बाळाजी नाईक यानीं जमान कुसाजी पाटील काळभर कसबे पाल तर्फ उंब्रज प्रांत कऱ्हाड यांस दिल्हें. त्यावरी राजश्री फत्तेसिंग भोसले यांजकडे मनसुफी दिल्ही. तुम्हां हरदो जणांस आज्ञा केली कीं, मशारनिल्हेकडे जाऊन निर्वाह करून घेणें. तेव्हां तुह्मीं हरदो जण त्याकडे गेलेस. निर्वाह करितात. मशारनिल्हेनीं आपले सदरेस सभा केली. वृत्तपशील नांवनिशीः—

१ राजश्री रावजी उपाध्ये.
१ राजश्री पंतप्रधान यांकडील भिकाजी परभू.
१ राजश्री दौलतराव शिर्के.
१ राजश्री पंतसचीव यांकडील राजश्री बाजी बाबजी.
गोत महालानिहाय हजीर.

३ सुभानजी नाईक बांदल देशमुख तर्फ हिरडस मावळ.१
संताजी बिन कान्होजीराव पासलकर देशमुख तर्फ मोसें खोरें.१
बापुजी नाईक व धनाजी नाईक कोंडे देशमुख तर्फ खेडेबारें.

१ राजश्री नारोराम मंत्री.
१ राजश्री भास्कर वैद्य.
१ राजश्री यशवंतराव महादेव कारकून दिंमत मशारनिल्हे.
३
१ राजश्री रामाजी दामोदर दिवाण.
१ राजश्री पांडुरंग खंडेराव.
१ राजश्री बाबुराव शामराज फडणीस.
३
१ हजीर मज्यालशी समस्त.

येणेंप्रमाणें सभास्थानीं समानायक व गोत बैसोन, तुम्हां दोघाच्या तकरिरा मनास आणिल्या. त्यास तुह्मांस पुरशीस केली कीं, तुमचा शिक्का कैसा ? तेव्हां तुह्मीं सदरहू प्रमाणें करिना विदित केला. मग बाळाजी नाईक यांस पुरशीस केली कीं, तुह्मीं आपला शिक्का कैसियावरून ह्मणतां ? त्यास त्यांनीं तकरीर केली कीं, आपण वडील बायकोचा पुत्र, यामुळें आपण वडील; व पांचांनींही शिक्का आपल्या गळां घातला आहे. व यांचा आमचा कजियाही भावांनीं चुकवून समजाविशी करून, कागद परस्परें दोघांकडे आहेत ते मनास आणावे; शिक्का आपला आहे; ऐसें बोलिले. यावरी तुह्मांस पुरशीस केली कीं, बाळाजी नाईक ह्मणतात याचा करिना काय आहे? तेव्हां तुह्मीं तकरीर केली कीं, आपण बापाचा वडील पुत्र धाकटे बायकोचे पोटीचा, आणि बाळाजी नाईक मज धाकटे, परंतु वडीले स्त्रियेचे पोटीचा; याचा सिद्धांत जो शास्त्रमतें होईल त्यास राजी आहे. व पांचांनीं शिक्का बाळाजी नाईक यांस दिल्हा ह्मणून बाळाजी नाईक ह्मणतात. तरी आपले बाप मेले, त्यांचें उत्तरकार्य आपण करून लष्करास गेलों; यामुळें दोन वर्षे राहणें झालें. मागें महालाचा कारभार चालिला पाहिजे, आणि आपण तों हजीर नाहीं. ह्मणून शिक्का कारभाराकरितां पांचांनीं बाळाजी नाईक यांचे हवाला केला. नेहमीं दिल्हा

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ऐसें नाहीं. लष्करांतून आपण आलों. आपला शिक्का आपले स्वाधीन करावा, ते करिनात. ह्मणून कजिया झाला. त्यास रामोजी नाईक व कृष्णाजी नाईक व वाघोजी नाईक खोपडे भाऊ मिळाले, आणि समजाविशी करितों म्हणून आह्मां दोघांस नेलें. सत्य करितों ह्मणून बोलिले, आणि शास्त्राप्रमाणें निर्वाह न करितां, बेजमा हल्लीं समजाविशी काढिली कीं, शिक्का बाळाजी नाईक यांजकडे द्यावा. कागदीं नांवें दोघांचीं ल्याहावीं. शिक्याचें उत्पन्न निमें निमें घ्यावें. ऐसा बाळाजी नाईक यांचा प्रतिपक्ष करून त्याचा कागद आम्हांस, व आमचा कागद त्यांस देविला. त्यास कागद लिहिले ते कांहीं नारो शंकर गांडेकर देश कुळकर्णी तर्फ मजकूर यांचे दस्तुरें अगर त्यांच्या मुतालीकाच्या दस्तुरें ल्याहावे, ते लिहिविले नाहींत. घरांत बहिरो शिवदेऊ सोनटक्का याजकडून कागद त्यांनीं लिहिविला, आणि दोघांस दिल्हे. करिना आपणास कळलीयावरी आपण राजी नाहीं म्हणून बोलोन गेलों. तेव्हां सदरहू भावांनीं राजश्री नारो पंडित सचीव यांस समजाविशीचें वर्तमान विदित केलें. त्यांनीं उत्तर दिल्हें जे, वडील असतां शिक्का धाकटीयाकडे कैसा द्यावासा केला आणि वांटणी केली, हें केलें कर्म उत्तम झालें नाहीं. कागद कार्याचे नाहीं. तेथून दोघांकडेही केल्या कार्याचा भोगवटा चालिला नाहीं. यावरी आपण हुजूर आलों; त्याची समजाविशी त्यांचा पक्ष धरून केली. यास आपण कबूल नाहीं ऐसें बोलिलेस. त्यास पांचा जणांनीं शिक्का दिल्हा ते कोणी ह्मणून बाळाजी नाईक यास पुसिलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, राणोजी नाईक बांदल देशमुख तर्फ हिरडस मावळ व नागोजी सर्ज्याराव जेधे देशमुख तर्फ भोर वगैरे यांचे गुजारतीनें पांचांनीं शिक्का दिल्हा. त्यास दोघाजणांस पुरशीस आणवावें ऐसा सिद्धांत झाला. तेव्हां तुम्हीं सांगितलें कीं दोघांनींही लेहून पाठविलें कीं, शिक्का नेहमीं दिल्हा नाहीं; कारभार चालवावयाकरितां अमृतराव हजीर नव्हते म्हणून दिल्हा आहे, ऐसें लिहिलें. राजश्री पंत सचीव यांजकडे आहे तें मनास आणितां, सदरहू प्रमाणें लिहिलें आहे. त्यावरून नेहमीं शिक्का दिल्हा नाहीं, ऐसें खरें जाहलें. व रामोजी नाईक व कृष्णाजी नाईक व वाघोजी नाईक खोपडे यांनीं समजाविशी केली ते कागद मनास आणितां, न्यायशुद्ध केला नाहीं. देशमुखीच्या कज्याचा कागद परस्परें दोघास लेहून देणें तो देशकुळकर्णी यांनीं ल्याहावा, तें न करितां, घरचे घरांत बहिरो शिवदेऊ यांजकडून लिहिविला. तो कार्याचा नाहीं. बाळाजी नाईक यांच्या प्रतिपक्षाची समजाविशी केली ऐसें सभानायकांस व गोतास दिसून आलें. त्यावरून ते समजाविशी दूर केली. कागद बातल केले. मग समस्त सभानायक यांनीं श्री विज्ञानेश्वर धर्मशास्त्रार्थ मनास आणिला. तेथें निर्णय कीं, बापाच्या पुत्राचा अनुक्रमाप्रमाणें वडील धाकुटपणाचा निश्चय खरा; स्त्रियांच्या अनुक्रमावरी पुत्राचा अनुक्रम नाहीं. ऐसा निश्चय जाणून तुह्मीं बापाचे वडील पुत्र, शिक्काचे अधिकारी ऐसें खरें करून, मशारनिल्हेनीं समस्तां देखत तुम्हांस व बाळाजी नाईक यांस सांगितलें कीं, वडील अमृतराव, धाकटे बाळाजी नाईक याप्रमाणें

NATIONAL ARCHIVES OF INDIA

निर्वाह खरा झाला. हें वर्तमान झाल्या निर्वाहाचे पंडित मशारनिल्हेनीं तुह्मांस व बाळाजी नाईक यांस हुजूर आणून, दोघां देखत विदित केलें. तें मनास आणितां, यथान्यायें निर्वाह झाला ऐसें जाणून, बाळाजी नाईक तुम्हां धाकटा असतां, शिक्का त्याकडे होता तो दूर करून, तुह्मीं वडील, शिक्का तुमचा तुम्हांकडे असावा हा निश्चय खरा जाणून, तुमचा तुमचे दुमाला केला असे. बाळाजी नाईक यांस याउपर शिक्क्यासी कजिया करावयासी अर्था-अर्थीं संबंध नाहीं. या कजियाचे कागदपत्र बाळाजी नाईक या पाशीं असतील ते रद्द असत. तरी तुम्हीं बापाचे वडील पुत्र खरे, कारभार तपे मजकूरचा व शिक्का वंशपरंपरेनें अनुभवणें. तुमचे निमे वांटणीचे देह दस्ताप्रमाणें ९॥ साडेनव आहेत, त्याचे वाटे तुम्हीं व भावांनीं केले ५ पांच, पैकीं शिक्क्याकडे वाटा १ एक, बाकी वाटे च्यार, पैकीं भावाकडे वाटे तीन, बाकी वाटा १ एक तुमच्या बापाचा आहे. त्यापैकीं निमे तुम्हीं व निमे बाळाजी नाईक यांनीं भाऊपणाचा वाटा अनुभवून असावें. व तुम्हीं भाऊपणाचा वाटा निमे घेणें व शिक्क्याचा वाटा एक व कारभार शिक्क्याचें उत्पन्न व इसाफतीचा रावता महार व पट्टी पासोडी व मुळवे चाकर लोक शिक्क्याकडे पेशजीप्रमाणें चालत आहेत, याप्रमाणें शिक्क्याचे तुमचे तुम्हीं अनुभवणें. सदरहू शिक्क्याच्या उत्पन्नासी दुसरीयासी संबंध नाहीं. या वतन संमधें तुमचे माथा जीवनमाफीक शरेणी दुतर्फा करार केले रुपये १००० एक हजारास सदरहूची उगवणी जिल्हेकडे करून, तर्फ मजकूरचा शिक्क्याचा उपभोग घेऊन सुखरूप असणें. एकूण पत्रें. सुरुसन समान सलासीन मया आलफ. पिंगल (नाम) संवत्सरें पत्रें सुमारः—

१ वतनपत्र मशारनिल्हेच्या नांवें.
१ देशपांडे व मोकदमानि देहाय तर्फ उत्रोली.
१ देशाधिकारी.
१ राजश्री चिमणाजी पंडित सचीव.

४

एकूण चार पत्रें देणें.

अभयपत्र ४.

अभयपत्र राजश्री मोकदमानी मौजे महागांव संमत निंब प्रांत वांई ताहा विठोजी बिन आप्पाजी गुरव मौजे मजकूर सुरुसन समान सलासीन मया व आलफ. लेहून दिल्हें अभयपत्र ऐसीजे, तुझे वडील हजरत अवरंगजेब छत्रपती आविंधीचा शहाजादा याचा राज्यक्रांत जाहला तेव्हां गांव देश उध्वस्त जाहला. तेव्हां तुह्मीं गंगातीरीं गेला. ते तुह्मीं श्री राजा शिवछत्रपती देशास आले तेव्हां मुलूख सर्व भरिला. उपरांतिक तुह्मीं देशास येऊन आपलें गांवावरी आला. तेथून हणगोजी गुरव हा झुंजांत पडला. ह्मणून छत्रपतीनीं इनाम बिघे ८३ ती त्याची बायको निरा ईस दिल्हे. त्याजवरी तिचें व शिदोजी बिन

बयाजी गुरव याचें बनेनासें जाहलें. तेव्हां ती येऊन तुम्हांपाशीं राहिली. तिचा प्रतिपाळ करून तिचा अंतकाळ तुजपाशीं जाहला. तेव्हां तिची जमीन व तिच्या घरांतील चीजवस्त होती ती तुजकडे सरकारांतून जाहली. शिदोजीस अर्थाअर्थीं बोलावयासी संबंध नाहीं. ऐसें हुजूरून महाराजापासून व श्रीमंत रावपंत प्रतिनिधी व पंतप्रधान यांजपासून जाहलें. तेव्हां त्याची बायको अना इनें तुम्हांस विष घालून तुझीं तिघें पोरें मारिलीं. तुझे बायकोस व तुजलाही घातलें. तेव्हां तुम्हीं जाऊन मौजे कठापूर संमत कोरेगांव येथील वैद्य मांग संभनाक होता, तो आणिला. याउपरी उपाय करावा तों त्यास अडथळ्यास शिदोजी आला. मग तुवां अजम शेखजीसाहेबांपासून मांग वैद्य नेमून घेऊन बरोबर दावलशा व राजजी बागुल आगु त्याच्या विद्यमानें वीख पाडिलें. परी शेखसाहेबापाशीं गाठोळी नेली. यावरी तेथें राजखान वैद्य होता, त्यानें पारखिलें. सोमल ठरला. उपरी खुद्द खासा शेखसाहेब बोलिले जे, अजि कांहीं करावें तर घरावर उदईक करणें तें करावें ह्मणून निरोप दिल्हा. हरदुजणा जामीन बितपशील—खानाजी पाटील तुला व सावजी पाटील शिदोजीस दिले. ऐसें करून गांवास लावून दिल्हे. मग शिदोजी पळून गेला. उपरी तुम्हीं अगोदर गोत आऊद (?) वजित जाले तेव्हां खोटा जाहला. तूं निमेचे वतनदार शिदोजीस निराईच्या हिश्यासी बोलावयास संबंध नाहीं. हल्लीं हें लिहिलें. सही छ. २१ मोहरम शके १६५० विकारी (नाम) संवत्सरें माघ वद्य ६ सोमवार.

साक्ष पाटील.

१ सावजी पाटील.
१ रामजी पाटील.
१ हणगा पाटील.
१ सुलतानजी पाटील.
१ कुसाजी पाटील.
१ संताजी कृष्णाजी.

६

बलुत.

१ लखा महार.
१ माणा महार.
१ जानोजी तेली.

३

वतनपत्र ५.

वतनें करार सुरूसन इसन्ने आर्बैन.

खंडो शिवदेव उपनाम पानशी गोत्र मुद्गल सूत्र आश्वलायन ज्योतिषी व कुळकर्णी मौजे दियें कर्यात सासवड व मौजे सोनोरी तर्फ कऱ्हेपठार प्रांत पुणें सरकार जुन्नर यांसी दिल्हें वतनपत्र ऐसें जे, तुह्मीं शाहूनगर नजिक किले सातारा येथील मुक्कामीं स्वामीसन्निध विनंती केली. हरदो गांवचीं सदरहू दोनीं वतनें पूर्वी गिधवीयाचीं होतीं. त्यांनीं आपल्या वडिलांस दान देऊन दानपत्र करून दिल्हें. त्यावरून वतन अनुभवूं लागले. त्यास मौजे सोनोरी येथील कुळकर्ण चालवावयासी कृष्णाजी गाऊजी उपनाम गांवखंडेराऊ मुतालीक ठेविला होता. त्याचा लेक रामाजी कृष्ण आपला आजा गोविंद विश्वनाथ

NATIONAL ARCHIVES OF INDIA

यासी कुळकर्णाबद्दल कजिया करूं लागला. याजकरितां महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामीसन्निध किले राजगड मुक्कामीं जाऊन वर्तमान निवेदन केलें. त्यावरून रामजीस हुजुरून आणून हरदो जणाचे करीने मनास आणिले, आणि मौजे पोहुरी बुद्रुक तर्फ गुंजणमावळ प्रांत मावळ येथें दिव्य नेमून दिल्हें. तेथें दोघानींही दिव्यें केलीं. रामाजी कृष्ण दिव्यमुखें खोटा जाहला. त्यानें अजीजखत लेहून दिल्हें. आपला आजा गोविंद विश्वनाथ खरा जाहला. त्यावरून थळकरांनीं थळपत्र करून दिल्हें. तें महाराज स्वामींनीं मनास आणून दुमालपत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें वतन अनुभवीत आहों. परंतु पत्रें जीर्ण झालीं, भोगवटीयास पत्रें पाहिजेत. याजकरितां महाराजाहीं कृपाळू होऊन नूतन पत्रें करून देऊन वंशपरंपरेनें चालविलें पाहिजे. ह्मणून विदित करून महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामीचें पत्र व गिधवीयाचें दानपत्र व रायाजी गांवखंडेराऊ याचे अजीजपत्र व थळपत्र ऐसीं चार पत्रें आणून दाखविलीं. पत्रें बितपशीलः—

महाराज कैलासवासी यांचें पत्र दिल्हें. "अजरख्तखाने राजश्री शिवाजी राजेसाहेब दामदौलत हू बजानेबू मोकदमानी व रयानी समस्त प्रजा मौजे सोनोरी परगणे पुणें बिदानद सुरुसन तिसा सितैन अलफ. गोविंद विश्वनाथ पानशी जोतिषी व कुळकर्णी मौजे मजकूर यासी व रामाजी कृष्ण गांवखंडेराऊ वस्ती कसबे सासवड यासी कुळकर्णाबद्दल भांडण लागलें होतें. याचा निवाडा होऊन महजर झाला ऐसाजे, रामाजी कृष्ण गांवखंडेराऊ हुजूर येऊन मालूम केलें जे, आपलें कुळकर्ण मौजे सोनोरी तर्फ कऱ्हेपठार परगणे पुणें आपली मिरास आहे. यानीं गोविंद पानशी आपणासी कईणी (?) कुळकर्णाबद्दल भांडत आहे. तरी साहेबीं गोविंद विश्वनाथ यास हुजूर आणून आपली व त्याची बरहक्क मुनसुफी करून निवाडा केला पाहिजे. म्हणून मालूम केलें. त्यावरून गोविंद विश्वनाथ यास तलब करून आणून दोघाजणांची हकिकत मनास आणून तकरिरा घेतल्या छ १२ माहे शाबान."

"गोविंद विश्वनाथें तकरीर केली ऐसीजे, गिधवीयाची मिरास जोतीष व कुळकर्ण देह २ तपशील. मौजे दियें कर्यातसासवड व मौजे सोनोरी तर्फ कऱ्हेपठार परगणे पुणें सदरहू गिधवीयाची मिरासी. गिधवे आपले यजमान परंपरा, आपण त्यांचे उपाध्ये ह्मणून गिधवीयानीं आपला मूळ पुरुष लक्ष्मीधरभट पणजा होय त्यासी पाय धुवून दान दिधलें. दानपत्र गोही साक्षीनिशीं स्वहस्ताक्षरें वृत्ति लेकराचे लेकरीं करून दिल्ही. यावर कित्येका दिवशीं गिधवे काशीस गेले. आपला पणजा लक्ष्मीधरभट लेहूं जाणत असें. ह्मणोन कुळकर्ण चालवावयासी हरदो गांवीं मुतालीक ठेविला असे. जोशीपण चालवीत असे. याचे पोटीं परशरामभट जाहला. तो आपला आजा होय. हा जाणता जाहला यावरी मौजे दियाचें कुळकर्ण चालवून असे व परशरामभटाचा भाऊ दुसरा भटपण जाणत असतो. दोही गांवचे जोतीष चालवून असे. व तिसरा भाऊ विठोबा व्यापारास जात असे. याबद्दल सोनोरीस मुतालीक हरकोणी ठेऊन चालवीत असे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ती मग विठोबाचा नारोबा तो जाणता झालीयावरी सोनोरीचें कुळकर्णावर कित्येक दिवशीं ठेविला. याउपरी परशरामभट आपला आजा, त्याचे पोटीं आपला बाप विसाजी व चुलते जाहले. हे थोडेबहुत लेहूं शिकले. परंतु लहान लहान असत. मौजे दियाचें कुळकर्ण चालवून असत. यावरी आपल्या बापाचा मामा दाणी सासवडकर याचें शेत मौजे सोनोरीस वोवाडीयानें करीत असे. त्या शेतावरी कृष्णाजी गावजी खंडेराऊ खटपटेस ठेविला होता. त्यास आमचे वडिलाचे मामानें आमचे अजाहती मुतालीक ठेविला. मौजे सोनोरीचें कुळकर्ण चालवावयास जाणते होत, तोंवरी एक दोन वर्षें चालविणें, व शेताचीही खटपट जैशी करतात तैशी करणें. हे जाणते झाल्यावर आपलें कुळकर्ण चालवितील ह्मणून ठेविला होता. त्यावरी आपला बाप व चुलता हे लेहों शिकले, जाणते जाहले. मग कृष्णाजीस दूर करून दोही गांवचें कुळकर्ण आपण चालवूं लागले. ऐसें असतां कित्येक दिवशीं, नाईकजी पाटील मोकदम मौजे मजकूर कुळकर्णाचा मुशाहिरा मागतां मोकदमामध्यें व लुखोबा आपला चुलता यामध्यें कटकट झालीयावरी मोकदमें लुखोबास मारिलें. याबद्दल आपले वडील रुसोन माराच्या भेणें राहिले. पुढें नाईकजी पाटील यानें कृष्णाजी गाऊजीस बोलावून कुळकर्णाचें लिहिणें लिहूं लागल्यावरी, आपले वडिलीं कृष्णाजीस ह्मटलें कीं, आपण रुसोन राहिलों आहों; आणि तूं मौजे मजकुरास जाऊन कुळकर्णाचें लिहिणें चालवितोस तें चालवूं नको. यावरी कृष्णाजी सासवडास उगाच राहिला. कुळकर्ण्याचें कामाचा बोभाटा पडूं लागला. याबद्दल आपले बापाचा मामा दाणी सासवडकर यानें आपले वडिलास ह्मटलें जे, तुह्मीं रुसोन घरीं राहिला. दिवाण काम चालत नाहीं. पाटलाची व तुमची समजाविशी होय तोंवरी चार दिवस कृष्णाजीस मुतालिकी देऊन ठेवणें. त्यावरी आपले वडिलीं मुतालीक करून देविला. पाटलाची आमची समजाविशी झाली नाहीं. ऐशामध्यें रंगभट दत्तभट राखिया सेकिन सासवड दिव्यास आला होता. त्यानें एके घरीं निसरवा घेतला, ह्मणून आपल्या चुलत्यानें मारिला. त्या दुःखें राखियानें काशीस जाऊन गिधवी याचा वंश त्याची भेट घेऊन त्यास सांगितलें कीं, तुमच्या वडिलाची मिरास मौजे दियेस व सोनोरीस आहे. येऊन चालवाना हें उचित नाहीं. ऐसें त्यांनीं नानाप्रकारें उपदेश करून घेऊन आला. गिधवी यानीं आपले वडिलास पुशिलें कीं तुम्हीं दोही गांवीचें कुळकर्ण व जोतीषपणा खाता कशावरून तें सांगणें. त्यांहीं त्या गिधवी याचें दानपत्र लिहून दिल्हें होतें व गोही लिहिलें होतें. पत्र पाहून गोही मनास आणून मागुती आपलींही दानपत्रें करून दिल्हीं असतां, काशीचा वियोग करून आह्मांस घेऊन आलास ऐसें बोलोन ते मागुती काशीस गेलीयाउपरी लुखोबा आपला चुलता त्यास देवाज्ञा झाली. पाटिलाची व आमच्या वडिलाची समजाविशी झाली नव्हती. तैशामध्यें कारकीर्द राघो निंबाजी मुकासाई कसबे सासवड याचे वेळेस पाडागला जेजुरी श्री खंडेराऊ याचा भक्त व राघोजी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मंबाजीही खंडेराऊ याचा भक्त याची हकिकत करून उभा राहिला. कीं, मौजे दियें व मौजे सोनोरी दोही गांवचें जोतीष कुळकर्ण, आपली मिराशी, गिधवी या आधीं आपली मिराशी ऐसें बोलिला. त्यामध्यें व आपल्या वडिलामध्यें वाद झाला. मग निवाडीयासी श्री अमृतेश्वर मुक्कामीं ह्मैसळे कोकणांत आहे, तेथें आपला बाप विसाजी परशराम व पाडागला गेले. ते जागां आपले बापें दिव्य केलें, रवा काढिला, खरा झाला. ह्मैसळाचें थळपत्र दिल्हें, तें घेऊन विसाजी परशराम आला. पाडागला खोटा झाला. सदरहू हकिकत राघो निंबाजीस सांगितली व रवा काढिला, खरा जाहला, तें स्थळपत्र दाखविलें. त्यावरून राघोजी मंबाजीनें पाडागला यासी दटाविलें कीं, कईणी आमचा निशा केला कीं, एकाची मिराशी आपली ह्मणोन तुटीलासी. ब्राह्मण म्हणोन तुजला सोडिलें ते वेळेस ऐसा निवाडा झाला. नाईकजी पाटील होता तो मृत्यू पावला. पुढें थोरला दुकाळ पडला. आपला बाप गांवीं होता. आपण पांचा भाऊ व कुटुंब थोर. दुकाळाकरितां पोट भरेना. तैशामध्यें आपल्या घरासी आगी लागोन जळालें. त्यामध्यें गिधवी याचें दानपत्राचे कागद होते ते व म्हैसळां दिव्य केलें तेथील कागद पत्र आपली बिशाद होती ते जळाली. आपण व आपले भाऊ लहान लहान होतों. गांवावरी पोट भरेना. मग आपला बाप विसाजी परशराम कारकीर्द महाराजसाहेब पुणीयास गेला. ते वेळेस नाईकजी पाटील यांचा लेक हस पाटील व रत्नोजी पाटील, रामाजी कृष्ण ठाणीयास दिवाण कामाबद्दल आले होते ते हस पाटील, रत्नो पाटील आपले बापास बोलिले कीं, नाइकजी पाटीलामध्यें व लुखोबामध्यें कटकट झाली होती. ते दोघे मरोन गेले. आपण तुम्हांसीं कांहीं किलाफ धरीत नाहीं. आपण व तुम्हीं मिरास भाऊ आहों. आपलें कुळकर्ण व जोतीष सुखें खाणें. ऐसें समाधान केलें. त्यावरी आपले बापें रामजीस ह्मटलें कीं कुळकर्णाचे निसबतीचे कागद तुजपाशीं आहेत ते समजावून मज देणें. अनमान असेल तर दादाजी कोंडदेऊ सुभेदार हकीम आहेत त्याजपाशीं चाल. त्यावरी रामाजीनें पाटलास ह्मणोन आठा दिवसाची मुदत सांगोन मोईन केली जे आठा दिवशीं येऊन कागद समजावून देईन. ऐसा नेम करून ठाणांतून गांवास गेला. आणि रामाजीनें हस पाटिलाचा धाकटा भाऊ बैजी होता. त्यासी घरोबा करून शफत घेतली जे, तूं मोकदमी करणें. आपण कुळकर्ण करीन. पानशी जोशीपण करितात तैसें करितील. त्याचें कुळकर्ण आपणास देणें. या तहास हस पाटिलामध्यें व बैजी पाटलामध्यें कसूर वाढविला आणि रामाजी कागद नेदी, तो गांव टाकून कर्नाटक प्रांतीं गेला. त्यावरी आपले बापें पाटिलास कागद लेहून दिल्हा कीं, रामाजीस आठ रोजा नेम करून तुह्मीं घेऊन गेला. त्यास बोलास पंधरा वीस दिवस झाले. कागद पाठविले नाहींत ह्मणून लिहिले. शेवट हस पाटील व रत्नो पाटील बैजीस म्हणत कीं, पानशी मिरासदार आहेत. आमची क्रिया गुंतली आहे कीं याच्या हातें कुळकर्णाचें काम घ्यावें. आणि बैजी मजकूर

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ह्मणे कीं रामाजीस हातीं धरावें. याबद्दल कुसुर वाढला. त्याकरितां आपला बाप गांवास गेला नाहीं. कोकणामध्यें व्यापार करून गेला. त्यावरी बैजीनें मारा करून आपला वडील भाऊ हस पाटील जिवें मारिला. आपलाही बाप कोकणांत मरोन गेला. आपण धाकटे नेणते होतो. ते जाणते जाहले त्यावरी कारकीर्द महाराजसाहेब नारो सुंदरास हवाला पुण्याचा होता. त्याची भेट घेऊन आपली हकिकत सांगितली. त्यावरून तीहीं कुळकर्णाची दुमाले चिट्ठी दिधली. मग रखमाजी पानशी आपला गोत्रज कुळकर्ण चालवावयास ठेविला. तो कुळकर्ण चालवीत असतां, रामजीनें राजश्री महाराजसाहेबांस गलत मालुमात केली जे, मौजे सोनोरीचें कुळकर्ण आपली मिरास. पांच पिढ्या खादलें आहे. आणि पानशे खलेल करितात. ह्मणून सांगितलें. त्यावरून महाराजसाहेबीं नारो सुंदर हवालदार परगणे मजकूर यास खुर्दखत दिधलें कीं, रामजी याची व पानशी याची बरहक मनसुफी करणें. याचे कुळकर्ण हक्कहिशेबी गोहीसाक्षीनिशीं होईल त्याचे दुमाला करणें ह्मणून सादर झाले. त्याजवर नारो सुंदर, दोघे वादे व गांवीचे मोकदम व मुख्तेसर बलुते व हमशाही गांवीचे गोत मेळवून मनसुफी करून निवाडा करावा तो केला नाहीं. व खुर्दखत कैसें आहे तेंही आपणास दखल नाहीं. नारो सुंदर याचा हवाला पुरलीयाउपरी खुर्दखत ठाणाचें घेतलें. तेंही कोणास ठावकें नाहीं व आपणासही हल्लीं वाद सांगतां कळलें. रामाजी मजकूर गांवास येऊन रखमाजी पानशे कुळकर्ण चालवावयासी आपण ठेविला होता, त्यास ह्मणों लागला जे, महाराज स्वामीचे व ठाणाचे खुर्दखत घेऊन आलों आहें. कुळकर्ण आपले दुमाले केलें आहे. तूं आपणास कागद लेहून दे कीं कुळकर्ण आपलें नव्हे. त्यावरी आपले मनीं रखमाजीनें विचारिलें कीं त्रिंबक विश्वनाथ सुभा चाकरी करीत असतां संभाजी मोहिते यानें धरिलें आहे. त्यामध्यें व नारो सुंदरामध्यें आकस आहे. याकरितां इलाज न चाले. व बैजी पाटील व रामजी दोघे एक होऊन आपणास जिवें मारितील. ऐसा विचारून कागद मौजे दियाच्या मोकदमाच्या नांवें ठाणां अर्जदास्त दिधली कीं, आपणास व रामाजीस संमंध नाहीं. त्रिंबक विश्वनाथ धणी आहे. तो जाणे व तूं जाणेस. रखमाजीची निसबत नाहीं. ऐशी अर्जदास्त लेहून दिल्ही. त्यावर अफजलखानाचा गलबला झाला व अमीरल उमराऊ नवाब शास्ताखानाचा गलबला झाला. मुलूख खराब पडिला. त्याबराबर मौजे मजकूरही खराब पडिलें. पेस्तर मुलुखास कौल जाहला. जुजबी वसाहत झाली. तेच वख्तीं आपण हजीर झालों. रामाजी गैरहजीर झाला. तो औरंगाबादेस जाऊन बाकोजी व बालजी भोसले यापाशीं चाकर राहून बेजबी केली. तें वख्तीं त्यानाजिक मालुमाती करून महाराजसाहेबांचें व नारो सुंदराचें खुर्दखत होतें तें दाखवून परवाना घेतला कीं, हरदो वादी यांची मनसुफी बरहक करणें. त्यावरून परगणे मजकुरास मशारनिल्हे शामजी पंडित गुमास्ते दिवाण व कानोजी पंडित गुमास्ते अमिनाचे येहीं परगणे मजकूरचे देशमूख व देश-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पांडिये यानीं हमशाही गांवास खुर्दखतें पाठविलीं कीं, पानशी याचा व रामजी गांवखंडेराऊ याचा मौजे मजकुरच्या कुळकर्ण्याचा अंमल कैसा आहे तो, आपलाले इमान राखोन पूर्वज स्मरोन हक्क असेल तें लिहून पाठवणें. त्यावरून हमशाही गांवचे मिरासदारी आदिस साक्ष साक्षीच्या लेहून पाठविल्या बितपशीलः—

परगणे पुणें.

१ मौजे लोणी काळभर तर्फ हवेली.
१ आळंदी तर्फ सांडस.
३ तर्फ कऱ्हेपठार परगणे पुणें.
१ पिपळें.
१ बाणपुरी.
१ आंबोडी.
३
१ सोनोरी बारा बलुतें.
६

कर्यात सासवड.

१ कसबा, देखील देशमुख, देशपांडे व स्थळकरी.
१ मौजे दिवें.
२

परगणे सुपें.

१ सुपें खुर्द.
१ कुंभारवळण.
२

यांनीं लेहून पाठविलें कीं, मिरास पूर्वी दिवें व मौजे मजकूर येथील ज्योतीष व कुळकर्ण गिधवीयाचें. गिधवीयानीं पानशीयासी मिरास करून दिल्ही. त्यावरून कित्येक दिवस पानशी चालवीत असतां, दरम्यान सोनोरीच्या मोकदम्यामध्यें व लुखोबा पानशी यामध्यें मुशाहिऱ्याबद्दल कटकट झाली. मग कृष्णाजी गांवखंडेराऊ वस्ती मौजे सासवड तेथें केवाडीयानें, दाणी यांनीं आपल्या शेतावर ठेविला होता. लुखोबा रुसोन राहिला ह्मणून लुखोबाचे मामा दाणी यांनीं पानशी यासी म्हणून कर (?) मजकूर ठेविला. तो पानशिया मुतालीक होय. आपणास ठावकें असे. ऐसे गोहीचे कागद ठाणां आलीयावर आपणास दुमाले चिट्ठी दिधली. कुळकर्ण आपले दुमाले केलें. महजर करावा तों देशमुख व देशपांडे औरंगाबादेस गेले. त्यांची वाट पहात आपला भाऊ मोरो विश्वनाथ पुण्यास राहिला. यावरी देशमुख व देशपांडे आले. त्यांपाशीं आपला भाऊ मोरो विश्वनाथ बोलिला कीं, साक्षीप्रमाणें आपणांस महजर करून देणें. ते बोलिले कीं, आम्हीं जें करूं त्यास तुह्मीं राजी आहां ऐसा कागद लेहून देणें. त्यावरून मोरो विश्वनाथ बोलिला जे साक्षी गुदरल्या आहेत; हल्लीं ज्योतीष खातों तैसेंच कुळकर्ण खाणें ह्मणून महजर करून द्याल तर मान्य असो. अगर परस्थळास पाठवाल तर जाऊं. परंतु निवडिलीया अमलास मोघम कागद मागतां, तो उगाच देववत नाहीं. यावरी रामाजी गोत मान्य करीना. आणि ठाणांतून गैर हजीर होऊन साहेबाचे शेवेसी आला. हे तकरीर सही. "

NATIONAL ARCHIVES OF INDIA

" तकरीर रामजी कृष्ण गांवखंडेराऊ यानें तकरीर केली जे, मौजे मजकुरचें कुळकर्ण आपलें मिराशी आहे. आपला आजा गाऊजी, आपला बाप कृष्णाजी व आपण ऐसें कुळकर्ण कारकिर्द दर कारकिर्द खादलें आहे. पलिकडे ठावकें नाहीं. नाईक पाटील होता तो आपणास मुशाहिरा नेदी, ह्मणून त्यामध्यें व कृष्णाजी गाऊजी आपला बाप त्यामध्यें करकर झाली. आपण पोट भरावयास गेलों. मागें लुखोबानें कुळकर्ण चालविलें. मागुती आपण येऊन कुळकर्ण चालवूं लागलों. त्यावर कारकिर्द महाराजसाहेब, रखमाजी पानशी कुळकर्ण चालवीत होता. तो त्रिंबक विश्वनाथें ठेविला होता. तों आपण महाराजांचें खुर्दखत आणिलें. तेणेंप्रमाणें ठाणाचें खुर्दखत आणिलें आणि रखमाजीस दूर करून कुळकर्ण चालविलें. ह्मणून तकरीर केली. सही. "

सदरहू दोघांच्या तकरिरा मनास आणून दोघा वादियास म्हटलें कीं, तुम्हीं गोतास राजी असाल तर गोतांत पाठवूं अगर परस्थळास राजी असाल तर परस्थळास पाठवूं. अगर हमशाई गावीचे मोकदम व मोख्तेसर व मौजे मजकूरचे मोकदम व बारा बलुते यांसीं राजी असाल तर यांचे गोहीवरून मनसुफी करून. जे गोष्टी तुम्हांस मानली ते सांगणें. त्यावरी रामजी गांवखंडेराव बोलिला कीं, पुणीयामध्यें मनसुबीकरितां आपणास खोटें केलें आहे, तरी साहेबीं भले लोक बैसवून बरहक निवाडा केला पाहिजे म्हणून रामजी बोलिला. मग गोविंद विश्वनाथ यास पुशिलें, तूं कोणे गोष्टीस राजी आहेस ? त्यावर गोविंद विश्वनाथ बोलिला जे, जे गोष्टीस रामजी राजी असेल तेच गोष्टीस मान्य असे. ऐसे राजीनामे लेहून दिल्हे. यावर सभासदीं हरदोजणाच्या तकरिराचीं उत्तरें मनास आणितां, गाऊजी गांवखंडेराऊ रामजीचा आजा बुढ्ढा असतां, कृष्णाजी गाऊजी, रामजीचा बाप पानशी यांनीं मुतालीक ठेविला. मौजे मजकूरच्या कुळकर्णाबद्दल ठेविला होता. त्यापलीकडे त्याचा कांहीं भोगवटा नाहीं. रामजी लहान होता. तो थोर जालीयावर महाराजसाहेबांचे खुर्दखत आणिलें. त्यामध्यें मालुमाती पांच पिढ्या कुळकर्ण चालाविलें, ऐसी मालुमात करून खुर्दखत आणिलें तर गाऊजी मजकूर रामजीचा आजा दाणी याचा पालक पुत्र विदेशी पांच पिढ्यांस जागा नाहीं, ऐसें रामजीच्या मुखें खरें झालें, वरकड हीं कलमें रामजीच्या मुखें निरोत्तर झालीयावर रामजी बोलिला जे, मौजे मजकूरचे मोकदम मोख्तेसर व बलुते हमशाही गांवीचे गोहीदार बोलावून आणून त्यांचे गोहीवरून निवाडा केला पाहिजे. म्हणून त्यावरून मौजे मजकूरचे मोकदम व मोख्तेसर व बलुते व हमशाही गोत हुजूर आणून त्यासी आण प्रमाण घालून पुशिलें. तीहीं गोही दिधल्या. बितपशीलः—

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कसबे सासवड येथील देशमुख व देशपांडे यांनीं व गांवलोक मिळोन रेऊ नाईक बिराजर देशमुख व अमाजी चिंचवडा नाईकवाडी व महार पाठविले.

मौजे पिपळें.

२ मोकदम.
१ चौगुला.
१ भानजी कुळकर्णी.
४

सुपेंखुर्द, परगणे सुपें.

१ मोकदम.
१ चौगुला.
२

मौजे कुंभार वळण परगणे सुपें.

१ मोकदम.
१ चौगुला.
२

मौजे बेलसर, कसबें सासवड.

नारो बहिरव कुळकर्णी उमर वर्षें ९३ एकूण १.

मौजे वणपुरी.

१ येमाजी मोकदम.
१ महार.
२

मौजे आंबोडी.

१ मावजी मोकदम.
१ भानजी कुळकर्णी याची आर्दास.
१ महार.
३

मौजे हिवरें, तर्फ कन्हेपठार, परगणे पुणें १.

मौजे दियें, कर्यात सासवड.

२ मोकदम.
१ खेऊजी उमर वर्षें ६० साठ.
१ परसोजी उमर वर्षें ४०.
२

१ कमळोजी बिन जानोजी चौगुला उमर वर्षें ४०.
१ खंडोजी काळा उमर वर्षें ७०.

१ माऊजी भाबकर उमर वर्षें ७०.
१ येस मेहेतर माळी उमर वर्षें ९०.

२ महार.
१ बाका उमर वर्षें ८०.
१ बरवा उमर वर्षें

मौजे सोनोरी.

२ मोकदम.
१ माणकोजी बिन हस पाटील.
१ मोरोजी बिन रतन पाटील.
२

१ जानोजी बिन दाऊजी बिरादर मोकदम.
१ संताजी चौगुला.
२ कुलवाडे.

११ बलुते.
१ नाव सुतार.
१ बहीर परणा.
१ पिलवरटा.
२ चांभार.
१ माऊजी.
१ निसणा.
२

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ लखमा कुंभार.
१ जैबा न्हावी.
१ बहिरा घडसी.
२ महार.
१ तुळज्या.
१ परसा.
१ नाना मांग.
११
१७
लंग
०

आर्दासा पाठवून दिल्हा आपल्या नांगरानिशी.
१ लोणी काळभर.
१ आळंदी.
२

येणेंप्रमाणें गोहीदारांस महारकूट व चांभारकुंड काढून मांगीमहारीचें वस्त्र तुमचे शिरीं आपलाले पूर्वज स्मरोन जैसें यथार्थ असेल तें सांगणें, ह्मणून शपथ घातली. यावर गोहीदारीं गोही दिधली जे, मौजे मजकूरचें ज्योतीष व कुळकर्ण गिधवे मिरासदार होते. त्यांहीं पानशी याच्या वडिलांस मिरास लेंकराचे लेंकरी दिल्ही, हें आपणास ठावकें आहे. हें सत्य ऐसें. खेरीज जानोजी बोलिले व जानोजी बिन बैजी बिरादर मोकदम मौजे मजकूर हा एक बोलिला कीं, रामजी गांवखंडेराऊ हा मिराशी कुळकर्णी ऐसें आपला बाप बैजीनें सांगितलें होतें, हें खरें. ऐशी गोही (साक्ष) गुदरली व समस्ताजणांची एकच गोही गुदरली, आणि एकल्या जानोजीची निराळी गोही झाली. सदरहु गोही झाली याबद्दल दोघांचीही कुसुर तुटावा, याबद्दल हरदोजणांस दिव्य नेमिलें. श्रीअमृतेश्वर मुक्काम मौजे मोहरी बुद्रुक तर्फ गुंजगमावळ तेथें दोघांनीं वेगळालें दिव्य करावें. तपेली दोन व ताह्मने दोन व रवे दोन, तेल तूप एकसारिखें वजन करून ताऊन बराबरीच दिव्य करावें. खरा होईल तो मिरास लेंकराचे लेंकरी खाईल. खोटा होईल तो मिराशी वेगळा. दोघांही खरे झाले तर दोघांसही निंब (निम) वांटून द्यावे. दोघेही खोटे झाले तर दुरीच करावें. ऐसा तह होऊन दोघां वादीयांस पुशिलें. सदरहूप्रमाणें राजी झाले. यावरी हुजरून आबाजी मोरदेव चिटणीस मिरासदार, मौजे चिमणगांव, परगणे वाई व मलकोजी बिन वाघोजी कदम हल्लीं चाकर हुजुरांत व गोहीदार सदरहुपैकीं मौजे मजकुरचे मोकदम व बलुते छ... रमजानी मोहरीस पाठविले. तेथें मोहरीचे मोक़दम व बाजे प्रण्णिक लोक व हमशाही गोत मिळोन दोघे वादी यांचीं उत्तरें मनास आणितां बोलिले बितपशीलः—

NATIONAL ARCHIVES OF INDIA

गोविंद विश्वनाथें सांगितलें जे, गिधवे पाहिले मिरासदार होते तेहीं आपल्या वडिलांस मिराशी करून दिल्ही हें सत्य.

रामजी कृष्णें सांगितलें जे, आपण मिरासदार. गिधवीयासी व पानशीयासी या मिराशीचा संबंध नाहीं. आपला आजा व बाप आपण कुळकर्ण खात आलों हें खरें.

येणेंप्रमाणें उत्तरें आयकोन गोहीदारांस पुशिलें. गोहीदारीं सदरहू लिहिले तेणेंप्रमाणें साक्ष दिल्ही. यावरून रामजी मजकूर खोटा जाहला. या उभयतांपासून दिव्य करावें नलगे; ऐसें थळीचे प्रण्णिक बोलिले. यावर आबाजी मोरदेव व मळकोजी हुजूरून पाठविले होते; हे व कोणी प्रण्णिक बोलिले जे, राजश्री... साहेबीं उभयतांस दिव्य करावयासी पाठविलें आहे. यापासून दिव्य न घेतां दोंघांचें भांडण दूर होत नाहीं. श्रीदेवावरी भार देऊन निवाडीयाबद्दल स्थळास पाठविलें आहे ती देवापुढें व अग्नीपुढें अकस कोसीस होणार नाहीं. दिव्यीं जें निवडेल तैसें दोघे वर्ततील. ऐसें बोलोन वेगळालीं तपेलीं, वेगळालीं ताह्मनें व वेगळालीं मंडळें व वेगळालीं तेलें, तुपें एकसारखीं व वेगळाले रवे एकसारिखे वजन करून बराबरीच दिव्य करविलें. हरदोजणांचे शिरीं चीरपत्रें बांधोन मंडळें चालत आहे. आधीं गोविंद विश्वनाथें रवा काढून बाहीर ठेविला. गोविंद विश्वनाथ खरा झाला. रामजीनें ताम्हनांत हात घालून रवा काढितां बोटें जळालीं ह्मणून रवा ताम्हनांतच टाकिला, पुरता रवा बाहीर काढिला नाहीं. बोटें भाजलीं; रामजी खोटा झाला. तेच समयीं तेथल्या लोकांस कळलें. मग विशवी घालून लाखोटे करून तिसरे दिवशीं मंगळवारीं हातां पाहिले तों गोविंद विश्वनाथ खरा झाला. रामजीचीं बोटें पोळलीं, तो खोटा जाहला. थळीचे निशाडीयाप्रमाणें निवाडपत्र घेऊन, हरदो घेऊन राजगडास आले. हुजरूनही तमाम खलके हात पाहिले तों गोविंद विश्वनाथ निर्मळ खरा झाला. यावरून मौजे मजकूरचें कुळकर्ण, ज्योतीषपण लेंकराचें लेंकरीं औलाद आफलाद चालवणें. रामजीचे हात पाहतांच पांचही बोटें भाजलीं, तो खोटा झाला. मिराशी वेगळा देवें केला. रामजीस अगर त्याचे भाऊबंद व दाईज गोत्रज असतील त्यांस मौजे मजकूरच्या कुळकर्णासी संमंध नाहीं. खोटा झाला तो दूर केला. अर्थाअर्थीं समंध नाहीं. येणेंप्रमाणें निवाडा झाला. त्यासी हिंदू होऊन अन्यथा करील त्यास काशीमध्यें गोहत्या व ब्रह्महत्येचें पातक असे; व मुसलमान होऊन अन्यसारिखे करील त्यास मक्केमध्यें सोर मारल्याचें दोजक असे. गांवखंडेराऊ कित्येक मालुमातीची व वकीलातीचे बळें कागद दिवाणांतील व गोताचे करून घेतले असतील, ते कुळी रद्द असेत. गोविंद विश्वनाथ यानें लेंकराचे लेंकरीं औलाद आफलाद परंपरेनें मौजे मजकुरचें कुळकर्ण व ज्योतीष खाऊन असावें. येणेंप्रमाणें निवाडा झाला आहे तर बरहुकूम निवाडा अंमल करणें. तालीक घेऊन अस्तल पत्र गोविंद विश्वनाथ यासी परतोन देणें म्हणून महजर कैलासवासी स्वामींचा १.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

"दानपत्र शके १५४९ प्रभवनाम संवत्सरें, अश्विन शुद्ध त्रयोदशी, भृगुवासर ते दिवशीं लुखोबा परशराम व विसाजी परशराम पानशी कुळकर्णी व ज्योतीषी मौजे दिवें कर्यात सासवड व मौजे सोनोरी, तर्फ कऱ्हेपठार, परगणे पुणें यासी रंगो त्र्यंबक व गणेश त्र्यंबक गिधवे, नमस्कार लेहून दिल्हे ऐसेजे, आपले वडिलीं वेदमूर्ती लक्ष्मीधरभट पानशी यासी दोनी गांव ज्योतीष व कुळकर्ण दान दिल्हें. आमचे वडील काशीस वास करावयासी गेले. त्यास त्यांचें देहावसान भागिरथीतीरीं झालें. त्यास सांप्रत शके १५२७ रंगभट राख्ये तेथें आले. त्यांनीं आम्हांस वर्तमान सांगितलें कीं, तुमच्या वडिलांची वृत्ति पानशी बळेंच खाताहेत. हे तिसरी पिढी चालत आहे. दत्तोबा राख्या त्यासी तुमचे वृत्तिबद्दल भांडला. त्यास लुखोबानें तोंडचेंतोंडीं मारला. त्यावरून आपण तुम्हांस वर्तमान सांगावयासी आलों. तुम्हीं जाऊन आपली वृत्ति खाणें. वृत्तिसाठीं संन्यासग्रहण सोडून वृत्तीस रक्षण करावें. ऐसा बहुतप्रकारें बोध करून आम्हांस इकडे पाठविलें. त्यास आपण येथें आलों, तुमची भेट झाली. तुम्हांस वर्तमान पुशिलें. त्यास तुम्हीं आमच्या वडिलांचे नांवाचें व दस्तुरचें दानपत्र दाखविलें कीं, आमचे वंशीचा अवलाद आफलाद कोणी तुम्हांस वृत्तीचा वाद सांगेल त्यास गोहत्येचें, मातृगमनाचें व सुरापानाचें, ब्रह्महत्त्येचें पातक असे. तुम्हीं लेंकराचे लेंकरीं सुखें वृत्ति खाणें. आमचे अवलाद आफलादेस तुम्हांसी भांडावयासी संमंध नाहीं. आपले वडिलीं लक्ष्मीधर भटाचे पाय धोवून दान दिल्हें व दानपत्र लेहून दिल्हें तें तुह्मीं आह्मांस दाखविलें. त्या आपणांस वडिलांचें पत्र प्रमाण झालें. त्यावर तुह्मीं बोलिलेस कीं, आपलेंही पत्र करून देणें. त्यावरून हें पत्र तुह्मांस लेहून दिल्हें असे. सुखें लेंकरांचें लेंकरीं खाणें. आपली जे अवलाद आफलाद होईल त्यास तुह्मांसी भांडावयाची गरज नाहीं. दोही गांवचें ज्योतीष, कुळकर्ण दरोबस्त सुखें खाणें. हे लिहिलें सही:—बितपशील रंगो त्र्यंबक गिधवे ओळी सुमार २५ पंचवीस सही.

गोही.

मोकदम मौजे दिवें निशाणी नांगर १
चाहुजी वंजार मौजे दिवें १

मालजी भापकर मौजे दिवें १
भिला वरटा
नाईकजी बिन मावजी पाटील ईबिन
बलजी पाटील काळे मोकदम मौजे
सोनोरी निशाणी नांगर १
येस माळी मौजे दिवें १

माव मेहेतर चांभार १
जानोजी चौगुले मौजे दिवें
व कुळवाडी मौजे सोनोरी १
खंडोजी गाढवे कुळवाडी
मौजे सोनोरी १
भिक सुतार १
बहीर परणा १
तिमनाक महार १

प्रमाणें दानपत्र बार असे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

" अजीजपत्र शके १५६० फिलकनाम संवत्सरें, माघ वद्य प्रतिपदा, मंदवासर मुक्काम राजगड, ते दिवशीं गोविंद विश्वनाथ पानशी यासी रामजी कृष्ण गांवखंडेराऊ वस्ती कसबे सासवड सुरुसन तिस्सा तिसैन अलफ सन १०७८. कारणें अजीजपत्र लेहून दिल्हें ऐसेंजे, मौजे सोनोरी, तर्फ कऱ्हेपठार, परगणे पुणें येथील कुळकर्णावर तुमचे चुलते लुखो परशराम यांनीं आपल्यास मुताळीक ठेविलें होतें. लुखोबामध्यें व पाटलामध्यें मुशाहिऱ्याबद्दल कटकट झाली. याजकरितां आपले कारकिर्दीपावेतों कुळकर्ण चालविलें. कित्येक कजिये तुह्मांसी बेइमान होऊन सांगितले. कागदपत्रही मालुमातीचे आणीत गेलों. त्यास हल्लीं तुह्मीं आह्मीं भांडत महाराजसाहेब यांजजवळ आलों. महाराजसाहेबीं हमशाही गोताच्या व पांढरीच्या साक्षी मनास आणितां, गिधवे यांचे दोन्ही गांव मौजे मजकूर व मौजे दियें गिधवे यांनीं पानशी यास दान दिल्हे आणि ते काशीस गेले. त्यावरून आपणांस खोटेंपण आलें. त्याउपरी जानोजी काळा बिरादर मोकदम मौजे मजकूर यानें लटकी साक्ष एकल्यानें आह्मांसारिखी दिल्ही. त्यावरून महाराजसाहेबीं हरदोजणांस दिव्य नेमून दिल्हें. मौजे मोहरी तर्फ गुंजणमावळ येथें दिव्य करावयासी पाठविलें. तुम्हीं व आपण वेगळालें दिव्य केलें. तुम्हीं खरे झालेस. आपणास रवा लागला, खोटा जाहलों. मिराशी वेगळा देवें केलें. देवाघरीं व राजघरीं व गोतघरीं खोटा जाहलों. तमाम खलके तुम्हीं खरे म्हणोन टाळी पिटली. मग सभानायकीं आपणांकडून तुम्हांस पत्र लेहून देविलें तें दिल्हें. तर सुखरूप लेंकराचें लेंकरीं तुम्हीं कुळकर्ण व ज्योतीषपण मौजे मजकुरचें खाणें. आपणांस व आपले वंशिच्यांस व दाईज गोत्रजांस तुम्हांसी वृत्तिविषयीं भांडावयासी संमंध नाहीं. आपले घरीं वतनाविषयीं कित्येक कागदपत्र असतील ते कुळरद्द असेत. सानिन हाल आपला कोणी तुम्हांसी कजिया करील तर गोताचा अन्यायी, दिवाणचा गुन्हेगार. तुम्हीं सुखरूप आपलें वतन खाणें, हें लेहून दिल्हें. सही बितपशील अजमासें ओळी ३१ अस्सल पत्रीं

गोही.

मुकुंद कान्हो देशपांडीये परगणे पुणें १
रंगो माणकेश्वर जोशी कुळकर्णी मौजे बोपगांव परगणे पुणें १
मोकदम मौजे दियें निशाणी नांगर १
वाघोजी वीर माने मौजे दियें १
वैजो मुकुंद कुळकर्णी मौजे मोहरी बुद्रुक तर्फ गुंजणमावळ १
विठल पिलदेव सुभेदार प्रांत मावळे १
नारो बहिरव कुळकर्णी व जोशी मौजे बेलसर १
माणकोजी व मोराजी पाटील मोकदम मौजे सोंनोरी निशाणी नांगर १
येस माळी मेहेतर मौजे दियें तुका महार १

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मालजी भापकर मौजे दियें १ नाना मांग १
जानोजी चौगुले मौजे दियें १ "

अजीजपत्र गोहीसाक्षीनिशीं

"स्थळपत्रें बेशमी श्रीसकलगुणसंपन्न सौजन्यसिंधुशिरोमणी परउपकारमूर्ती राजमान्य राजश्री राजमुद्रा व मोकदम शेटिये महाजन मौजे सोनोरी, तर्फ कऱ्हेपठार, परगणे पुणें गोसावी यांस—राजमुद्रा व मोकदम व शेटिये महाजन महास्थळ महाप्रयोशिक सभा समर्थ मौजे मोहरी बुद्रुक तर्फ गुंजणमावळ सुरुसन तिस्सा सितैन अलफ. नमस्कार व अनुक्रमें रामराम विनंती उपरी, राउळाचे गांवींचे कुळकर्ण अग्रवादी गोविंद विश्वनाथ पानशी व पश्चिमवादी रामजी कृष्ण गांवखंडेराऊ यांमध्यें मौजे मजकुरच्या कुळकर्णाचा कथला होता. याबद्दल हरदोजण राजश्री राजेसाहेब यांस राजगडास भांडत गेले. त्याउपरी राजेसाहेबीं ही गोष्टी मनास आणून निवाडा करीत होते. त्याउपरी हरदोजण दिव्य करावयास कबूल जाहले. मग साहेबीं बराबर आबाजी मोरदेऊ देऊन आपला हातरोखा आपणास पाठविला. कीं, गोविंद विश्वनाथ पानशी व रामजी गांवखंडेराऊ या दोघांस मौजे सोनोरीच्या कुळकर्णाबद्दल भांडण लागलें आहे, त्यास दिव्य करावें, ऐसा तह जाहला. हरदोजण दिव्यास कबूल झाले. तरी दोघांकडून दिव्य वेगळालेंच करवणें. ह्मणोन रोखा राजश्री आबाजी मोरदेऊ याबराबर देऊन पाठविले. त्याउपरी येथें दोघांनीं तकरिरा लेहून दिल्या.

"अग्रवादी गोविंद विश्वनाथ पानशी तकरीर केली कीं, मौजे सोनोरी, परगणे पुणें, येथील कुळकर्ण गिधवी यांचें, आपण उपाध्ये गिधवी यांचे, त्या उपरी गिधवे वाराणशीस जावयास निघाले, आणि आपले वडिलांस पाय धोवून दिधले. याउपरी आपले वडील भट होते त्यांस लिहितां येत नव्हतें. याबद्दल कित्येक मुतालीक ठेवीत गेले. त्यावरी आपले वडील लेहूं शिकलीयावरी कुळकर्ण चालवूं लागले. त्याउपरी मुशाहिऱ्याबद्दल मौजे मजकुरच्या मोकदमासी व आपल्या चुलत्यासी कसूर वाढला, याजबद्दल आपला चुलता लुखोबा घरीं रुसून राहिला. मग रामजीचा बाप कृष्णाजी गाऊजी शेत करून वोवाडीयानें होता. वस्ती सासवडीं असे. त्याउपरी कृष्णाजी मुतालीक करून ठेविला. यावरी आपला वडील चुलता मेला. त्यावरी कृष्णाजीनें चालविलें. त्याअलीकडे रामजी चालवीत होता. त्यावरी दोन वेळां हटकिलें; मग गैरहजीर झाला. आतां हल्लीं आपण रामजीस हटविलें त्यास रामजी म्हणतो कीं, कुळकर्ण आपलें हें गिधवी यांचेंही नव्हे व तुमचेंही नव्हे ह्मणतो, तरी हें लटकें. हा आपला मुतालिक खरा. आपणास गिधवी यानीं पाय धोवून मिराशी दिधली आहे हें खरें, आपली वृत्ति होय हे तकरिर केली. "

"पश्चमवादी रामजी कृष्ण गांवखंडेराव तकरीर केली ऐसीजे, मौजे सोनोरीचें कुळकर्ण आपली मिराशी होय. आपले वडिलीं पिढी, दरपिढी बाप, आजा व आपण खात

येतों. ऐसें असतां हल्लीं गोविंद विश्वनाथ पानशी उभा राहिला आहे कीं, मौजे मजकुरचें कुळकर्ण गिधवी यांचें. गिधवे वाराणशीस जातां आपल्या वडिलांस पाय धोवून दान दिल्हें आहे. कुळकर्ण आपलें ह्मणतो व आपणास मुतालीकही ह्मणतो. तरी आपण मुतालीक नव्हे हें आपलें मिराशी होय. मौजे मजकुरास गिधवी यास व पानशी यास संमंध नाहीं. ऐसें आपण दिव्य करीन. देव देईल तरी घेईन ऐसी तकरीर केली. "

सदरहूप्रमाणें हरदोजणीं तकरिरा केल्या. हरदोजण दिव्यास राजी जाले. मग सदरहूप्रमाणें दिव्य करावें. ज्यास देव देईल त्यानें घ्यावें, ऐसें आमचे स्थळीं झालें. मग सणवारी हाताचीं नखें काढून हात धोवून हातीं पिशव्या घातल्या. सवेंच आदितवारीं पहिले प्रहरीं तेल तूप आणून वेगळालें जोखून दोन्ही ताह्मनें मांडून टकबंदी अडीच अडीच शेर तेल तूप ऐसें तावून एक एका ताम्हनांत घातलें. ऐशीं ताम्हनें एक्याच पळामध्यें मांडून आंत रवे टाकून दोघांनीं बराबर दिव्य केलें. त्यावरी मागतीं दोघांचे हातीं पिशव्या घालून ठेविलें. सवेंच सोमवारीं जाहला मंगळवारीं हात पाहिले. बी हुजूर आबाजी मोरदेऊ याउपरी रामजी कृष्ण खोटा जाहला. अग्रवादी गोविंद विश्वनाथ पानशी दिव्यीं खरा जाहला. मौजे मजकुरचें कुळकर्ण गोविंद विश्वनाथाचे सांभाळीं केलें. रामजी कृष्णास पुढें लेंकराचे लेंकरीं कुळकर्णास अगर जोशपणास संबंध नाहीं, ऐसा निवाडा जाहला. ते वख्तीं सोनोरीकर व दियेंकर हजीर होते. कळलें पाहिजे व रामजीच्या जमानदाराकडून गोविंद विश्वनाथाचे पैके दिव्याचे टक्के, पावणेवीस टक्के सा रुके १९॥६ देविले पाहिजेत. व रामजी-पाशीं कुळकर्णाचे कांहीं कागदपत्र असतील ते रद्द असेत. राजगृहीचे व गोतपतीचे जे असतील ते कुळी रद्द असेत. तुही या निवाडिया प्रमाणें यांचें कुळकर्ण सांभाळीं करणें. शके १५९० कीलकनाम संवत्सरें, माहो शुद्ध त्रयोदशी, बुधवार एकूण पत्र वोळीखेरीज तकरिरा १०० शंभर रास हे विनंति. येणेंप्रमाणें चार पत्रें आणून दाखविलीं, तीं मनास आणितां निर्णय जाहलीं आहेत. याजकारितां स्वामी तुह्मांवरी कृपाळू होऊन हल्लीं हें नूतन पत्र करून दिल्हें असे. गिधवी यांनीं हरदू गांवींचें ज्योती-षपण व कुळकर्ण तुम्हांस दान दिल्हें आहे. त्याचे वंशीचा अगर गोत्रपुरुष कोणी असेल त्यास, व रामाजी गांवखंडेराऊ सोनोरीच्या कुळकर्णाकरितां भांडत होता तो दिव्यमुखें खोटा जाहला, त्याच्या वंशीच्यास अगर गोत्रपुरुषास व पूर्वी दियाच्या व सोनोरीच्या वृत्तीस पांडागला उभा राहिला होता, ते समयीं तुमचा वडील विसाजी परशराम पानशी यानें म्हैसलाप्रमाणें दिव्य केलें. तेव्हां पांडागला खोटा जाहला. त्यास खंडो मुरार पांडागला जेजूरकर याचे वंशीचा अगर त्याचा गोत्रपुरुष कोणी असेल त्यास हरदो गांवांशीं संबंध नाहीं. पांडागल्यापाशीं व गांवखंडेरावापाशीं वतनसंबंधें कागदपत्र असतील ते रद्द असेत. तुम्हीं आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें हरदु गांवींचें ज्योतीषपण व कुळकर्ण अनुभवून सुख-रूप राहणें, व जानोजी बिन हौजी काळा बिरादर मोकदम मौजे सोनोरी यानें रामजी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कृष्ण गांवखंडेराव वतनदार खरा म्हणवून लटकी गोही दिल्ही होती. याजकरितां महाराज राजश्री थोरले कैलासवासीं त्याची जीभ कापीत होते ते समयीं तुमचा आजा गोविंद विश्वनाथ यांनीं दरबार खर्च करून जानोजी मजकुरास सोडविलें. याकरितां त्यानें व समस्त गांवकरी यांनीं गोविंद विश्वनाथ यास सदरहू दरबारखर्चाचे ऐवजीं तरटीचें शेत गांव निसबतीनें जमीन डाग रुके ८६ चा इनाम करून दिल्हें आहे, तेही तुम्ही आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभवीत जाणें. सदरहू जमिनीचा राजभाग होईल तो गांवकरी यांनीं तुम्हांस शेत दिल्हें ते समयीं पत्र लेहून दिल्हें आहे त्याप्रमाणें गांवकरी देतील. गांवकऱ्यांच्या करारप्रमाणें सदरहू शेत अनभवून सुखरूप राहणें. शके ६८ दुर्मतीनाम संवत्सर, फाल्गुन शुद्ध चतुर्दशी, मंदवासर सुरुसन इसन्ने आर्बैन मया व अलफ येविषयीं पत्रें—छ १७ सफर———————

१ मोकदमास मौजे दियें व सोनोरी.
१ मुख्य पत्र.
१ देशमुख, देशपांडे.
१ देशाधिकारी.
४

वतनपत्र ६.

हिरोजी बिन शिवाजी इबिन भिकाजी इंगुलकर मोकदम, मौजे कामथडी, तर्फ खेडेंबारें प्रांत मजकूर यांसी दिल्हें वतनपत्र ऐसेजे, मौजे मजकुरचे मोकदमीबद्दल तुजमध्यें ब पिराजी बिन बावाजी कोंडे देशमुख तर्फ मजकूर यांजमध्यें कजिया लागला होता, याजकरितां तुवां हुजूर सन सबा सलासीनामध्यें स्वामीसन्निध शाहुनगरनजीक किले सातारा येथील मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, मौजे मजकुरची मोकदमी दरोबस्त वतन आपलें; आपले वडिलीं अनभविलें; त्यास आपला पणजा शंकराजी पाटीलकी करीत असतां, देशमुख मजकूर याच्या वडिलीं आपल्या वडिलांवर दंगा केला, त्यामुळें तो गांव टाकून परागंदा झाला. धामधुमेकरितां आपला आजा व बाप गांवावर आले नाहींत. मुलखास कौल झाला म्हणून आपण गांवास आलों, तों बावाजी मुसलमान पाटिलकी खात होता. मनास आणितां आपला पणजा परागंदा झालीयावर मागें देशमुखांनीं बावाजी मुसलमानास (सुमारें ओळी च्यार फाटल्या आहेत.) राजश्री नारो पंडित सचीव याजपाशीं उभा राहिलों. त्याजपाशीं तीन चार वर्षें होतों. तेव्हां त्यांनीं एक वेळ मौजे नसरापूर तर्फ मजकूर येथील मुक्कामीं पिराजी नाईक देशमुख यास आणून काजिया मनास आणिला. हरदोजणांच्या तकरीरा जमान घेऊन मौजे मजकूरच्या व महालच्या वतनदारांच्या साक्षी पाहिल्या. राघो मोरेश्वर देशपांडे तर्फ मजकूर याजकडे आपल्या कागदपत्राचे

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ठिकाण लागले. त्यानें याचेसें केलें. तों देशमुखांनीं त्यास दबविलें, त्या (सुमार एक ओळ फाटली आहे.) इनसाफ न झाला. तों पुढें राजश्री नारो पंडित मृत्य पावल. आपला इनसाफ होत नाहीं. तरी स्वामींनीं देशमुखास आणून त्याचा व आपला करिना मनास आणून इनसाफ केला पाहिजे, म्हणून विदित केलें. त्यावरून देशमुख मजकूर यास आणून इनसाफ करावा तों स्वामींची स्वारी मिरज प्रांतीं झाली. तूं स्वारीसमागमें होतास. पुढें सन आर्बैनांत स्वामींची स्वारी या प्रांतें झाली. तेव्हां शिवापूरचे मुक्कामीहून शिरवळास येतां, तुवां स्वारींत फिर्याद करून मुसलमानास दोही दिल्हीस. पुढें सन इहिदे आर्बैनांत राजश्री चिमणाजी पंडित सचीव यास आज्ञा करून देशमुख मजकूर यास तलब करून आणविलें. तो हुजूर आलीयावर त्यानें वर्तमान विदित केलें कीं, पुरातन मौजे मजकुरचें मोकदमीचें वतन आपलें. आपल्या वडिलीं मुसलमानास मौजे मजकुरची मोकदमी विकत दिल्ही आहे. इंगुलकराचा दाखला कांहीं नसतां कजिया करून मुसलमानास द्वाही दिल्ही आहे. तरी याचा बरहक निवाडा करावा म्हणवून विदित केलें. त्यावरून पंडित मशारनिल्हेस आज्ञा केली कीं, या हरदोजणांच्या तकरिरा व जमान घेणें; त्यावरून तुवां तकरीर दिल्ही बितपशीलः—

"तकरीर कर्दे बेशमी जबानी हिरोजी इंगुलकर आपलें वतन मौजे कामथडी, तर्फ खेडेंबारें येथील मोकदमी वडील वडील बाप कदम करीत आले. त्यास मातुश्री जिजाऊसाहेब यांचे कारकीर्दीस मल्हारजी पाटील याचा लेक खंडोजी, त्याचा लेक शंकराजी पाटील इंगुलकर पाटीलकी करीत होता व मौजे मजकुर मातुश्री आईसाहेबांचा गांव, तेथें देशमुख, देशपांडे याच्या हक्काचा दाखला नाहीं. सारा हक्क वसूल आईसाहेबांकडे उगवत होता. ते वख्तीं, राजश्री कानजी नाईक कोंडे तर्फ मजकुरची देशमुखी करीत होते. त्यास आमचे गांवीं शिमगियाचें पोस्त झालें. तेव्हां गांवकरी यांनीं पोस्त ठाकराचे हातीं देशमुखाच्या घरास पाठविलें. देशमुख बाहेर गेले होते. ठाकरानें पोस्त देशमुखीणीपाशीं दिल्हें, तो देशमुख बाहेरून आले. तो ठाकूर वेसवरी बैसला आहे. तेव्हां देशमुखांनीं पुसलें जे, तूं काय निमित्य आला होतास ? त्यास ठाकूर बोलिला जे, पोस्त गांवकरी यांनीं पाठविलें होतें तें घेऊन आलों होतों. त्यास कानजी नाईक बोलिले जे, कोणापाशीं दिल्हें ? ठाकूर बोलिला जे, देशमुखीणीपाशीं दिल्हें. त्याउपरी देशमुखीणीस पुशिलें जे, पोस्त तुजपाशीं दिल्हें कीं काय ? तेव्हां घरांतून बोलिली जे, पोस्त ठाकरानें आणून दिल्हें तें ठेविलें आहे. त्याजवरी काय कानजी नाईकीं संदेह चित्तांत आणिला हें न कळे. बायकोस जिवें मारिलें. ते वख्तीं किल्ले सिंहगडीं किल्लेदार होता त्यास वर्तमान जाहीर झालें. तेव्हां किल्ले मजकुरीहून स्वारी येऊन कानजी नाईकास कैद करून नेऊन अटकेंत ठेविलें. तेव्हां खुनाचा खंड होन १०० शंभर एकशें बांधला घ्यावयास अवकाश नाहीं. तेव्हां हातापायाचीं नखें व झिंपऱ्या वाढल्या. अंगास किन्ही पडलीं. त्यास सुतें पडलीं. हाल फार

NATIONAL ARCHIVES OF INDIA

झाले. तेव्हां नाईकवाडी आपल्या वडिलांकडे आले, आणि म्हणों लागले कीं, तुम्हीं देशमुखास सोडवणें. त्यास खंडोजी पाटील व शंकराजी पाटील बोलिले जे, गांव मातुश्री आईसाहेबांचा, येथें तुमचा कांहीं दाखला नाहीं. कुल हक्कदक आईसाहेबांकडे त्यांत त्यांचा कमाविसदार गांवांत आहे. आम्हीं सोडविलीयानें आईसाहेब आमचे हातपाय तोडितील. जनाबराबर थोडाबहुत हात लावूं. त्यास तो रागेंच उठोन गेला, आणि सिद्धीस सांगितलें कीं, देशमुखीचा हक्क पाटील खातो त्यास धरून आणून पारिपत्य करावें. म्हणजे देशमुख सुटेल. त्याउपरी सिद्धी बोलला जे, पांचजण शिपाई घेऊन जाऊन घेऊन येणें. त्यास नाईकवाडी बोलिला जे, तो चाळीसपन्नासांच्या हातास लागेना. त्याच्या वाडियांत कुत्रे चार ४ आहेत ते चार वाघच आहेत. त्याउपरी त्यांनीं पाळत लाविली. तो खंडोजी पाटील देवळीं नवरात्रीं बैसला होता. तेव्हां तिसरे माळेस जपून स्वारी तयार किले सिंव्हगडीं झाली; तेव्हां आपणास आमचे वोळखदेख होते त्यांनीं माणूस पाठविलें कीं, स्वारी तुह्मांवर देशमुखांनीं पाठविली, तुह्मीं काठी आड करणें. तेव्हां मध्यरात्रीस माणूस आले. तों देवाच्या तिन्ही माळा उतरून व मुखवटे उतरून मुलेंमाणसें सडी घेऊन वाडियास गेले. तों मागें स्वारी घरावरी व देवळावरी आली, वेढा घातला. देवळांत पाहूं लागले तों पाटील नाहीं. तेव्हां गांवीच्या महारास आणून पुसों लागले जे, पाटील काय झाला ? तेव्हां त्यानें हकिकत सांगितली कीं, तुमची स्वारी येते हे उबले ऐकोन ते अवशीच निघोन गेले. तेव्हां घरावर लगट केला. तो कुतरी स्वारीस अलंगो देईनात. तेव्हां मागती माणूस आले कीं, तुह्मीं लौकर निघणें. त्यावरी मौजे पांडे नजिक शिरवळ येथें उजेडतां गेले. मागें उन्हें पडलीयावरी स्वारीनें कुतरीयांस गोळ्या घालून मारिलें. आणि घरदार बिशाद लुटिली. सरकारचें कोठार आपले ताबीज होतें तेंही लुटिलें. सारी मवेशी नेली. त्याउपरी तिसरे दिवशीं घरीं खंटिलें. तेव्हां देव्हारीयाचे व चुलीचे आडभिंतींत होनाचा व कागदपत्राचा हंडा पुरीला होता, तोही काहडिला. आणि देशपांडे मोरो बल्लाळ याच्या वडिलांच्या गुजारतीनें कुल मवेशी व कागदपत्र घेऊन गेले. त्याउपरी आपला वडील खंडोजी पाटील हा धाय घेऊन मेला. मागून कौल करार कोणी द्याल तो न दिल्हा. शंकराजी पाटील परागंदा झाला. त्यास हा काळपर्यंत देवळीं घट मुढा बसतो, माळ पडत नाहीं. आह्मीं देवावरी माळ घालितों, घट बसवीत नाहीं. येणेंप्रमाणें करीना पांढरीस पुसावा. सदरहूप्रमाणें करिना देशपांडियाच्या मुखें व भोंवर गांवच्या मुखें व सरपाटील मल्हारजी डिमका याच्या मुखें खरा करून देऊं. जर ते देशमुखाचे भिडेनें सांगेनात तरी ही तकरीद आपले मस्तकीं बांधोन दिव्य रवा काढूं. ते वेळेस मातुश्री आईसाहेब शिवनेरीस होती. धणी कोणी नाहीं परागंदा झालों. मग काळदुष्काळानें मेली गेली. हे तकरीर सही येणेंप्रमाणें भगवंतराव महादेव देशकुळकर्णी तर्फ मोसेखोरें यांच्या दस्तुरचा लेहून दिल्हीस. त्यावरी देशमुखमजकूर यानें तकरीर दिल्ही. बितपशीलः—

NATIONAL ARCHIVES OF INDIA

, तकरीर कर्दे बेशमी पिराजी नाईक कोंडे देशमुख, तर्फ खेडेंबारें व पाटील मौजे कामथडी तर्फ मजकूर सुरुसन इहिदे आर्बैन मया व अलफ. साहेबांचे शेवेसी करिना लेहून दिल्हा ऐसाजे, मौजे मजकुरची पाटिलकी आपली म्हणवून हिरोजी इंगुलकर साहेबापाशीं फिर्याद झाला. त्यावरून साहेबीं आपल्यास हुजूर आणून आज्ञा केली कीं, ये गोष्टीचा , करिना कैसा आहे तो लेहून देणें. ऐशियास तर्फ मजकुरी आमच्या पाटिलकीया देखील भाऊबंद गांव पुरातन आहेत. त्यास आपले वडील बोपजी व जाखोजी नाईक यांचे वेळेस कारकिर्दी मलिकअंबर ते समयीं बोपजीचे लेक हरजी, मुलजी व जाखोजी यांनीं देशमुखीचे गांव व पाटिलकीचे गांव वांटून घेतले. तेव्हां मौजे मजकुरची पाटिलकी जाखोजीचे वांटणीस आली. त्यांनीं खादली. पुढें जाखोजीनें कांहीं कसालीयामुळें मुसलमानास विकिली. त्याचें नांव अल्लीभाई बहिलीम त्याचा लेक, सुलतान पाटील त्याचा लेक वल्ली पाटील, वल्लीचा लेक हल्ली बावाजी ऐसे चार पुरुष मुसलमान खात आहेत. पलीकडे आपले वडील जाखोजीनें पाटिलकी खादली. त्यापलीकडे आपले वडील कोंडे बोपजी व जाखोजीचे वडील खात आले. पाटिलकी पुरातन आपली. बारा गांवचे चाळीस गांव जाहले तेव्हांपासून आपल्या कुळाकडे पाटिलकी आहे. याप्रमाणें खात असों. दरम्यान कजिया कोणाचा झाला नाहीं. ऐकिला नाहीं. पाटिलकी आपली खरी. आपल्या वडिलीं बहिलीम मुसलमान अल्लीभाई यास विकली. त्याचा वंश खात आहे, हें खरें, हा करिना लेहून दिल्हा सही छ २९ रजब बि॥ कलम महिपत जगन्नाथ गोबड कुळकर्णी मौजे मजकूर येणेंप्रमाणें पिराजी मजकूर यानें तकरीर दिल्ही. यावर जमानाविषयीं आज्ञा केली. तेव्हां जमान हरदोजणांचे छ २९ रजबी सन इहिदे आर्बैनांत घेतले, बितपशीलः—

तुंवा जमान भगवंतराव महादेव देशकुळकर्णी तर्फ मोसेखोरें यास हजीर जमान दिल्हे त्याचा जमान कतबा. कलम १.

पिराजी मजकूर यानें बहिरजी बिन बाळाजी सिलिबकर देशमुख तर्फ गुंजणमावळ यास वर्तावयाचा जमान दिल्हे त्याचा कतबा. कलम १.

येणेंप्रमाणें जमानकतबे घेतलीयावरी मनास आणून हरदोजणास पुरसीस केली कीं, कोणत्या इनसाफास राजी तें सांगणें. तेव्हां तुंवा विदित केलें कीं, माझ्या वतनासी कजिया देशमुख सांगतात. गोहीदारास त्याचा शह आहे. त्याहीमध्यें येणेंप्रमाणें गोहीदार हुजूर आणून त्यास सत्य घालून पुसावें. त्याचे साक्षीस आपण राजी असों. ह्मणोन राजी झालास. तेव्हां आज्ञा केली, कोणते गोहीदार ते नांवनिशीवार लेहून देणें, आणविले जातील. आणि ते सांगतील त्याप्रमाणें ऐको, ऐसा राजीनामा लेहून देणें. त्यावरून तुंवा राजीनामा लेहून दिल्हा. बितपशीलः—

NATIONAL ARCHIVES OF INDIA

बेशमी हिरोजी इंगुलकर सुरुसन इहिदे आर्बैन मया अलफ शेवेसी राजीनामा लेहून दिल्हा ऐसाजे, येणेंप्रमाणें नांवनिशीवार गोत सांगेल त्यास राजी असों. असामी बितपशीलः—

मौजे मजकुरचे वतनदार.

१ वलबोजी वाल्हेकर चौगुला.
१ खंडोजी वाल्हेकर चौगुला.
१ खंडभट जोशी.
१ खंडोजी परीट.
१ चांभार.
३ महार.
  १ खंडनाक थोरला.
  १ खंडनाक धाकटा.
  १ भागी महार.
  ३
१ मांग.
९

तर्फ मजकूरचे नांवनिशीवार वतनदार.

१ मोरो बल्लाळ देशपांडे याचा लेक राघो मोरेश्वर.
१ मल्हारजी पाटील डिमका मौजे शिवरें.
२

येणेंप्रमाणें अकराजण हे सत्य स्मरोन सांगतील त्यास राजी असों. यांतील एकजण न आला तर आपण राजी नाहीं. सदरहूप्रमाणें आले तर राजी असों. छ १० साबान राजीनामा सही येणेंप्रमाणें. तुंवा राजीनामा लेहून दिल्ही-यावर पिराजीस पुरशीस केली कीं, हिरोजी इंगुलकर सदरहु अकराजण गोहीदाराचे साक्षीस राजी होऊन राजीनामा लेहून दिल्हा. त्यास त्याप्रमाणें तूं राजी होत असि-लास तरी राजी होऊन राजीनामा लेहून देणें. तेव्हां त्यानें विदित केलें कीं, हिरोजीनें जे अकराजण लेहून दिल्हे ते व आणखी भोवर गांवीचे पांच गांवीचे पांच पाटील एकूण सोळाजण आणवावे त्यास राजी असों. ह्मणोन पिराजी मजकूर यानें राजीनामा छ १४ साबानी दिल्हा नांवनिशीवार—

११ इंगुलकरानें लेहून दिल्हें तें.
५ भोवरगांवीचे पाटील.
  १ गंगाजी पाटील बोरगा मौजे करंदी.
  १ रामजी पाटील लेकवळे मौजे देगांव.
  १ बाकाजी अथवा दुलाजी पाटील राजाणे मौजे खडकी.
  १ उबाजी पाटील खुटवड मौजे उंबरें.
  १ महादजी पाटील गण्डे मौजे हरचंद्री.
  ५

NATIONAL ARCHIVES OF INDIA

येणेंप्रमाणें आणवून त्यांचे साक्षीनें सत्यपूर्वक निर्वाह होईल त्यास राजी असों. ह्मणोन राजीनामा पिराजी मजकूर यानें दिल्हा. त्यावरून मनास आणून सदरहूप्रमाणें नांवनिशीवार जिल्हेकडून आणविले ते हुजूर आले. पुढें निर्वाह करावा तों पिराजी मजकूर यानें अर्ज केला कीं, आपली स्त्री मृत्यु पावली, दुसरें लग्न होणें आहे, नेमस्त केलें आहे, लग्नास जावयास आज्ञा द्यावी. तेव्हां त्यास निरोप दिल्हा. ह्मणून सदरहु गोतासही माघारे जावयास आज्ञा दिल्ही. लग्न झालीयावर पिराजी नाईक यानें गावें, तो आला नाहीं. मग पुन्हां जिल्हेकडून तलब करून हुजूर आणविला. आणि हरदोजणास पुरशीस केली कीं, कोणत्या इनसाफास राजी असाल तें विदित करणें. त्यास तुंवा विदित केलें कीं, आपण पेशजी नांवनिशीवार गोत लेहून दिल्हें आहे त्याचे साक्षीस रजावंद आहे. त्या उपरी हुजूर कयास केला कीं, देशमुखाच्या शहमुळें गोही साक्षमुळें निर्वाह होतां दिसत नाहीं. यास्तव इंगुलकरानें रवा दिव्य करावें. खरा जाहला तर वतन अनभवील. खोटा जाला तर वतनास संबंध नाहीं. ऐसा स्वामींनीं निश्चय केला. आणि हरदोजणास येणेंप्रमाणें आज्ञा केली. त्यास तुंवा मान्य केलें व पिराजीनेंही मान्य केलें कीं, हिरोजी इंगुलकर यानें दिव्य करून खरा जाहला तर पाटिलकी सुखरूप अनभवावी. आपणास व मुसलमानास संबंध नाहीं. मुसलमानाची समजाविश आपण करूं. येणेंप्रमाणें करार हरदोजणाच्या राजीपणें केला. तेव्हां राजीनामे दिव्याचे लेहून देणें आणि दिव्यामुळें खरा खोटीयाचे वर्तावयाचे जमान देणें ह्मणून आज्ञा केली. त्यावरून हरदोजणांनीं पेशजीचे जमान खरें करून दिल्हें कीं, दिव्यामुळें जो निर्वाह होईल त्याप्रमाणें वर्तवूं. त्यावर राजीनामा दिव्याचा तुंवा दिल्हा

दस्तक बेशमी हिरोजी इंगुलकर सुरुसन इसन्ने आर्बैन मया अलफ. मौजे कामथडी, तर्फ खेडेंबारें येथील पाटिलकी कामथी याची, त्यास ते आपल्या वडिलाचे अजोळ, त्यानें आपल्या वडिलास वतन दिल्हें आहे त्याचा भोगवटा जाहला. नांवनिशी बितपशीलः—

संताजी कामथा यानें आपला निपणजा मल्हारजी पाटील यास वतन दिल्हें त्यानें अनभविलें १.

भिकाजी बिन शंकराजी याचा भोगवटा राहिला १.

शिवाजी बिन भिकाजी याचा भोगवटा नाहीं १.

हल्लीं हिरोजी बिन शिवाजी आपण वाद सांगत असोन १.

त्याउपरी खंडोजी बिन मल्हारजी यानें वतन अनभविलें.

१ त्या उपरी शंकराजी बिन खंडोजी यानें वतन अनभविलें. मग परागंदा जाहला अजी. सबब कानजी नाईक कोंडे देशमुख तर्फ मजकूर यानें कांहीं बदअमली केली होती त्याजबद्दल किल्ले सिंहगडीं शिद्धी किल्लेदार होता त्यानें बंदी ठेविलें. त्यास आपले वडील भाग्यवान होते. त्याची चहाडी दिवाणांत केली. स्वारी किल्ल्याहून आली त्यामुळें परागंदा जाहलों. पुरुष दोन; तिसरे डोईस आपण हजीर जाहलों १.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

येणेंप्रमाणें करिना आहे. या गोष्टी रवीयाचे वेळेस वदोन रवा काढूं. रवीयामुळें खरा जाहलों तर वतन अनभवूं. खोटा झालों तर वतनास संमंध नाहीं. दिवाणाची गुन्हेगारी देऊं. हें लेहून दिल्हें सही छ १६ माहे साबान. येणेंप्रमाणें तुंवा राजीनामा लेहून दिल्हीयावर पिराजी मजकूर यास पुरशीस केली कीं, हिरोजी मजकूर यानें उच्चारपूर्वक रवा करीन ऐसें राजीनामीयांत लेहून दिल्हें त्यास राजी असशील तर तेणेंप्रमाणें राजीनामा देणें. तेव्हां पिराजी मजकूर यानेंही कबूल करून राजीनामा दिल्हा. दस्तक बेशमी पिराजी नाईक कोंडे देशमुख, तर्फ खेडेंबारें व पाटील मौजे कामथडी, तर्फ मजकूर सुरुसन इसन्ने आर्बैन मया अलफ. हिरोजीनें राजीनामा लेहून दिल्हा आहे त्याप्रमाणें उच्चार करून रवा काढावा. आपण रजावंद असों. हा राजीनामा सही छ १६ साबान. येणेंप्रमाणें हरदोजणांनीं राजीनामे लेहून दिल्हीयावर हुजरून मौजे पाली येथें श्री————यासी रवा दिव्य करावें ऐसा करार करोन तेथील पारपत्यगार यास राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि यांचें पत्र देविलें; व त्यांनीं बाळाजी महादेव सुभाचे कारकून दिल्हे व जिल्हेकडील बाळाजी दादाजीस पाठविलें व हुजरून हुजरे संताजी बोरकर व जोत्याजी शिंदा व बाबाजी ताटचा ऐसे दसकत देऊन पालीस हरदोजणास रवाना करणें, म्हणून रघू राजिवडा कलमबारदार यास आज्ञा केली. तेव्हां पिराजी मजकूर यानें बिबाजी कोंडे याजकडून विदित केलें कीं, आपणाजवळ एक कागद पुरातन आहे. तो मनास आणावा ह्मणून कागद दाखविला. तेव्हां स्वामींनीं आज्ञा केली कीं, अजि बारा वर्षें जाहलीं बेव्हार पडिला आहे. कागदपत्र येथून मागें नाहीं ह्मणत होता. आणि आतां इंगुलकर दिव्यास तयार जाहला, आतां कागद दाखविता तर ठेवणें. जें होणें तें दिव्यामुळें होईल. त्यावर पिराजी मजकूर यानें बोली घातली कीं, याउपरी दिव्य राहवावें. निमे पाटिलकी इंगुलकरास देतों. हें वर्तमान स्वामींस विदित जाहलें. त्यावरून तुजला येविषयीं आज्ञा केली कीं, निमे वतन देतात घेऊन समजणें. तेव्हां तुंवा हुजूर अर्ज केला कीं, आपण अजि बारा तेरा वर्षें बेव्हार सांगतो खराब जाहलों. मागें समजाविश केली नाहीं. रवा काढावयास सिद्ध जाहलों, आतां निमे देतात, त्यास आतां घ्यावेंसें नाहीं. रवामुळें खरा झालों तर अगदींच वतन अनभवीन. नाहींतर देशावर जाईन. मातुश्री जिजाऊसाहेबांचा सरदेशमुखीचा इसाफती गांव, तेथें देशमुख, देशपांडे यांचा हक्क नाहीं. म्हणून माझ्या वडिलास यांनीं मागें परागंदा केलें. आतां दिव्य करीन. दिव्यामुळेंच जें होणें तें होईल. ऐसा तुंवा अर्ज केला. तेव्हां तुझा करार देखोन दिव्यास हरदोजणास सदरहूप्रमाणें बराबर देऊन पाठविलें. तेथें गेलीयावर साहा दिवस मुक्काम जाहला. तेव्हां तेथील पद्धतप्रमाणें समस्तांनीं बैसोन आश्विन वद्य एकादशी, मंदवारीं छ २४ साबान, सन इसन्ने आर्बैन मया अलफ. ये दिवशीं तुझे हात साबणानें धोवून चिन्हें हातचीं लेहून हातास पिशवी घालून लाखोटा करून चौकी देऊन ठेविलें. दुसरे दिवशीं छ २५ साबान, रविवारीं, आश्विन वद्य द्वादशीस पद्धत-

प्रमाणें शास्त्रसंमतें समस्तांनीं श्रीचे देवळीं बसोन तेल, तूप एकत्र करून, ताऊन, तुजकडून उच्चार करविला. त्याचें चिरपत्र तुझें माथा बांधिलें जे, संताजी कामथा याची मौजे कामथडीची पाटिलकी. त्यास पुत्रसंतान नाहीं. त्यानें लेकीस व जावई मल्हारजी इंगूलकर या दोघांस संताजीनें आपण पाटिलकी दिल्ही. मल्हारजी आपला वडील; त्याचा, वंश आपण हें सत्य, ऐसा उच्चार करून रवा कहाडिला. त्याजवर तुझ्या हातास पिशवी घालून लाखोटा करून ते दिवशीं तेथेंच ठेविलें. दुसरे दिवशीं तुजला व पिराजीस हुजरे घेऊन हुजूर आले. त्यावरी स्वामीसंन्निध जिल्हेदारांनीं हरदुजणास आणिलें. तुझे हातचा लाखोटा राजश्री कृष्णाजी त्र्यंबक जिल्हेकडील यांजकडून फोडविला. पिशवी काहाडून हाताची चौकशी बरें रेवसीनें सभेकडून करविली. समस्तांनीं हात पाहिला. उत्तम हात निघाला. त्यावरी पिराजी मजकूर यास हात दाखविला. त्यानेंही चौकशीनें पाहून विदित केलें कीं, हात उत्तम; कांहीं लांछन नाहीं. हिरोजी पाटील इंगूलकर दिव्यास खरा उतरला, ऐसे बोलिला. तेव्हां मागती आज्ञा केली कीं, पुर्ती चौकशी करून त्रिवार काय तें बोलणें. तेव्हां पिराजी मजकूर त्रिवार बोलिला कीं, हिरोजी पाटील इंगूलकर दिव्यास खरा जाहला आपण खोटा जाहलों. मौजे कामथडीची पाटिलकी याची खरी; तरी त्याची पाटिलकी त्याचे हवाला करणें. आपण खोटा जाहलों. याउपरी आपल्यास व मुसलमानास मौजे मजकूरचे पाटिलकीशीं संमंध नाहीं. मुसलमानाची समजाविश आपण करूं. याप्रमाणें सभास्थानीं पिराजीनें विदित केलें व सभा मंडळींनींही विदित केलें कीं, इंगूलकर खरा जाहला व स्वामींनींही तुझा हात पाहिला, उत्तम निघाला. खरा झालास ऐसें जाणून, तुजला हुजरून शिरपाव दिल्हा आणि पिराजीकडून व मुसलमानाकडून येजितखतें देविलीं. तीं त्यांनीं आलाहिदा आपले रजावंदीनें दिल्हीं असेत. व पिराजी मजकूर याचा जमान बहिरजी नाईक सिलीबकर याजकडून तुजला येजित पत्र देविलें कीं, पुढें काळकला मुसलमान अगर कोंडे यांनीं कजिया केलाच, तरी आपण त्यास आपलें वतन देऊं. तुह्मांसी कजिया करावयास संमंध नाहीं. येणेंप्रमाणें तिघांचीं येजिज पत्रें देविलीं. त्याजवरी मुसलमानास पुरशीस केली कीं, तुजला देशमुखांनीं पाटिलकी विकत दिल्ही ऐसें ह्मणत होतास, त्याचे कागदपत्र जे असतील ते हजीर करणें. तेव्हां त्यानें अर्ज केला कीं, कागदपत्र होते ते, घर जळालें तेव्हां जळाले. ऐसी शपथ केली; तेव्हां त्यास मुक्त केलें. काळकला कागदपत्र त्याजपाशीं निघाले तर ते रद्द असेत. व पिराजी मजकूर यानें पेशजी दिव्यास जाते समयीं कागद काढिला होता, तो आणवून फाडविला. काळकला त्याजपाशीं कागद असीला तर रद्द असे. येणेंप्रमाणें विल्हे लागलीयावर मौजे पाली येथील दिव्याचें जयपत्र तेथील वतनदाराचे साक्षीनिशीं तुजला त्यांनीं दिल्हें आहे. तेंही अलाहिदा तुजपाशीं आहे. तर सदरहूप्रमाणें पिराजी मजकूर व मुसलमान खोटा जाहला. त्यास मौजे मजकूरचे पाटिलकीशीं संमंध नाहीं. तूं तकरिरेप्रमाणें दिव्यामुळें खरा जाहलास याजवरून तुजवर स्वामीं

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कृपाळू होऊन मौजे मजकुरचें पाटिलकीचें वतन तुझे दुमाला वंशपरंपरेनें केलें असे. आणि हें वतनपत्र तुजला सादर केलें असे. तरी मौजे मजकुरच्या पाटिलकीच्या वतनाची सेवा दंडकप्रमाणें करीत जाणें. वतनसंबंधें हक्क लाजिमा, मानपान, इनाम पासोडी व बाजे उत्पन्न काळी व पांढरीचे सुदामतप्रमाणें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभवून सुखरूप राहणें. या वतनसंबंधें तुझ्या माथां जीवनमाफीक शेरणी दुतर्फा रुपये ५०० पांचशें करार करून वसूल हुजूर घेतला असे. कीर्दीस बार छ ९ रजब, पत्रें आषाढ शुद्ध द्वितीया, सौम्यवासरे, शके ६९ दुंदुभीनाम संवत्सरें, चिटणिशी (पत्रें).

१ वतनपत्र.
१ देशमुख व देशपांडे.
१ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी.
१ राजश्री चिमणाजी नारायण सचीव.

४

वतनपत्र ७.

जानोजी बिन हिरोजी इंदुलकर पाटील, तिसरी तकशीम वडीलपण तर्फ इंदुलकर, मौजे करंजे, तर्फ सातारा, परगणे मजकूर हुजूर शाहूनगर नजीक किल्ले मजकूर येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, इंदुलकर तर्फ मजकूरची तिसरी तक्षीम पाटिलकी वडीलपण संभाजी बिन अंतोजी इंदुलकर यांचें वतन. त्यास संभाजी पाटील यास गोसावी यांचें कर्ज जाहलें. मुलेंमाणसें गोसावी याचे बंदीं पडलीं. तो वृद्ध अशक्त जाहला. वतन हर कोणास विकून मुलें, माणसें सोडवावीं, याअर्थें रायगडास आला, आणि थोरले कैलासवासी राजश्री स्वामीं यासंन्निध अर्ज केला जे, कर्जानिमित्य आपली तक्षीम विकतों. कोणी घेईल त्यास देतों. त्यावरून आपले बाप हिरोजी इंदुलकर राजश्री स्वामींसंन्निध सेवा करून होते. त्याला आज्ञा राजश्री स्वामींनीं केली कीं, वतन तुह्मांस पाहिजेसें असेल तरी विकत घेणें. त्यावरून इंदुलकर तर्फ मौजे मजकूर चावर १५ पैकीं आप्पाजी बिन बापूजी चावर ५ व हणगोजी बिन आप्पाजी चावर ५ एकूण दाहा चावर दोनी तक्षीमीचे भाऊ सचंत्र आहेत. बाकी पांच चावर पाटिलकी वडीलपणं संभाजीचे, आपला बाप हिरोजी इंदुलकर यानें विकत घेतलें. संभाजीचे कर्जदारास राजश्री स्वामींसंन्निध होन दिल्हे, बितपशील—

हणवंतगीर	भद्रगीरी	खाना नाईकवाडी याचे घोडीबाबत कजिया
२००	३००	माणकोजी बिन दुलबाजी इंदुलकर २१७.

एकूण सातशेंसत्रा देऊन संभाजीची तक्षीम विकत घेतली. दिवाणाचे कागदपत्र शेरणी देऊन घेतले व गांवास येऊन, गोतास जेवण करून, वस्त्रें गांवकऱ्यांस व देशक यास दिल्हीं आणि महजर करून घेतले. त्याप्रमाणें वतन अनभवीत आलों. त्याउपरी महाराज राजश्री

NATIONAL ARCHIVES OF INDIA

शिवाजी राजे यांची इतराजी हिरोजी इंदुलकर आपले बाप यावरी होऊन मौजे आरे तर्फ परळी येथें मारिले. घर दिवाणांत कैद केलें. तेव्हां वतनाचे कागदपत्र होते ते गेले. आपण ते समयीं दाहा दिवसांचा होतों. मोगलाई जाहली. धामधुमीचा प्रसंग. मुतालीक वतनावरी होता तोही देशावरी गेला. आपली आई मौजे दंवडज तर्फ निरथडी येथें जाऊन राहिली. करंज्याच्या वतनावर हसाजी पाटील व संभाजीचा धाकटा भाऊ आमची तिसरी तक्षीम व वडीलपण करीत होता. त्यास स्वामी खेडकडुसाहून फत्ते करून सातारियास वेढा घातला, ते प्रसंगीं हसाजी गडावरी चाकरीस होता. त्यास तो गोळी लागून मृत्य पावला. आपले कोणी वतनावरी नव्हते. येसजी बिन आप्पाजी पाटील आमची तक्षीम करूं लागला. त्याउपरी पांच सात वर्षांनें आपण मौजे मजकुरास आलों. आपली तक्षीम करूं लागलों. त्या वडीलपणाच्या काइद्यास कजिया केला, परंतु त्यांनीं रेटाई करून आपलें चालों दिल्हें नाहीं. आपलें वडीलपण खरें आहे. मुतालीक विभापा वतन चालवीत होता. तेव्हां भोगवटा आहे. त्याउपरी हसाजी इंदुलकर त्याजप्रमाणें करीत आला. मुतालिकाजवळ वतन खरीदी केलें. ते समयींचा एक कागद साक्षपत्र सुभेदार व हवालदार व देशक यांच्या शिक्क्यानिशीं व निम्मेचे भाऊ कीरदंत व कुळकर्णी व चौगुले व बलुते व शिवधडे पाटील यांचे साक्षीनिशीं पत्र आहे, तें आपण तलास करून आणिलें आहे. तें मनास आणून भोगवटा पाहून आपले वडीलपणाचे काइदे आपल्या दुमाला केले पाहिजे ह्मणोन विदित केलें व साक्षपत्र आणून दाखविलें. त्यास भोगवटा मनास आणितां तिसरी तक्षीम संभाजी बिन अंतोजी इंदुलकर याचें वडीलपण देखील खरें; त्यानें आपले संतोषें हिरोजी इंदुलकर यास विकत दिल्हें. हें खरेंखुरें ऐसें कळों आलें. त्यावरून तिसरी तक्षीम पाटिलकी वडीलपण तश्रीफ नांव नागर व होळीची पोळी, देऊळचा घट, वात वाजंतर व महार व सेवाधार व बाजे कानूकायदे तुझे दुमाला केले असत. येसजी इंदुलकर यास वडीलपणाशीं संमंध नाहीं. सदरहू तिसरी तक्षीम पाटिलकी वडीलपण तूं आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभवून दंडकप्रमाणें वतनाची सेवा करून सुखरूप रहाणें. या वतनसंबंधें तुझे माथां शेरणी दुतर्फा रुपये २०० दोनशें करार केले असेत. त्याचा वसूल हुजूर जाहला असे. छ २२ रमजान, शके ७० रुधिरोद्गारी संवत्सरे, सन आर्बा आर्बैन मया अलफ. पत्रें चिटणिशी. कार्तिक शुद्ध नवमी, भृगुवासर हेविषयीं.

१ मुख्य पत्र.
१ देशमुख व देशपांडे.
१ देशाधिकारी.
१ मौजे करंजें तर्फ मजकूर.

४

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वतनपत्र ८.

बावाखान बिन इस्मालखान गोरी निमे मोकदम वडील तर्फ मौजे कात्रज, तर्फ कर्यात मावळ याजमध्यें व पोलादशाहा बिन नूरशाहा सैद याजमध्यें मौजे मजकुरचे सदरहू निमे मोकदमीचा कजिया लागला होता. याजकरितां पोलादशाहा सैद सन इहिदे अर्बैन या सालांत जिल्हेकडे फिर्याद झाला कीं, मौजे मजकुरची निमे मोकदमी वडील तर्फ आपली, त्यास आपली वडील साखराई सैदीण इनें वतन अनभविलें. तिचा वंश आपण आहों. पुस्त दरपुस्त आपले वडील, वडील वतन अनभवीत आले असतां, ये आमदानीस बावाखान गोरी आपणासीं कजिया करतो. त्यास आणवून त्याचा व आपला करिना मनास आणून बरहक. इनसाफ केला पाहिजे. त्यावरून पंडित मशारनिल्हेनीं बावाखान याजला तलब करून हुजूर आणून येबाबें पुरशीस केली, तेव्हां यांनीं आपले वर्तमान जाहीर केलें कीं, मौजें मजकुरची दरोबस्त मुकदमीचें वतन गोरी मुसलमान आपले वडील वडील त्याचे त्यास निमे मोकदमी धाकटी तर्फ इचा खावंद आलाहिदा आहे. निमे मोकदमी वडील तर्फेचा खावंद आपण आहों. आपले वडील वडील खात आले. त्यास आपला वडील मिराजी बिन मींयाजी गोरी व त्याची औरत साखराई गोरी ही वडील व मिराजीचा सख्खा धाकटा भाऊ हुसेन गोरी त्याचा वंश आपण, त्यास मिराजीचें नक्कल झालें. मिराजीचे व त्याचे मागें साखराईनें पाटिलकी केली. त्याचे मागें आपला वडील हुसेन गोरी यानें व त्याच्या वंशानें निमे मोकदमी वडीलपण वडीलतर्फेचें वतन अनुभविलें. त्याप्रमाणें आपलें वतन गोरीचें खरें; सैदाचें नव्हे. पोलादशाहा सैद यासी कांहीं वतनासी संमंध नाहीं. तो झोंडपणें गळा पडतो. तरी याची चौकशी करून बरहक इनसाफ केला पाहिजे म्हणवून बावाखान गोरी यानें जाहीर केलें. त्यावरून सदरहूप्रमाणें दोघांच्याही तकरिरा व कतबे पंडितमशारनिल्हेनीं घेतले व जमान मागितले. त्यावरून हरदोजणांनीं सन इहिदेंत जमान दिल्हे. बितपशीलः—

पोलादशाहा यानें जमान मालिक पाटील मुसलमान कसबे खेड शिवापूर, तर्फ खेडेंबारें यासी दिल्हे बरहुकूम कतबा. छ १७ जमादिलाखर १.

बावाखान यानें जमान रहिमान व दावजी तुपे देसाई व मोकदम मौजे कडधें, तर्फ पौनमावळ यासी दिल्हे कतबा. छ ४ रमजान १.

येणेंप्रमाणें जमान कतबे जिल्हेकडे दिल्हे. त्यावरी याची चौकशी मनास आणावयाकरितां मौजे मजकुरचे वतनदार, थळकरी व बलुते व तुह्मांस पंडित मशारनिल्हेनीं हुजूर आणवून येबाबें त्यास पुराशिसा पृथकाकारें नांवनिशीवार करून पूर्वील कैफियत कैशी आहे तें लेहून देणें. हें पुसोन त्यानीं सांगितल्याप्रमाणें त्याचे करिने लेहून घेतले. त्याची चौकशी मनास आणितां ठिकाण न लागेसें जाहलें, व कागदपत्र पूर्वील दो(हो) वादीयाकडे

NATIONAL ARCHIVES OF INDIA

असतील ते आणविले. त्यास राजश्री दादोजी कोंडदेव याचे कारकिर्दीचा महजर मौजे मजकुरचे मोकदमीचा होता तो आणविला. तो बावाखान यांनीं आणून दाखविला. तो पाहतां, त्यांत अर्थ कीं, मुसलमानाचें मोकदमीचें वतन खरें; त्यास दोघे भाऊपणीयांत भांडों लागले ह्मणवून दोघांस दोन तर्फा निमेनिम करून दिल्या आहेत. नांवें मात्र दोघांचीं लिहिलीं आहेत, यामुळें सैद किंवा गोरी हें ठिकाण लागेना. भोगवटा पूर्वील मनास आणितां पांढरींतील गोही साक्षमुळें साखराईनें पाटिलकी केली आहे, तिचा दाखला पुरला. परंतु साखराई सैदीण किंवा गोरी हें ठिकाण गोही साक्षमुळें अगर कागदपत्रामुळें लागेनासें जाहलें. तेव्हां सदरहू वर्तमान सालमजकुरीं पंडित मशारनिल्हेनीं हुजूर विदित केलें. तें सविस्तर मनास आणितां हरदोजण साखराईचे म्हणतात ते गोरी किंवा सैदीण हें ठिकाणीं लागत नाहीं. तेव्हां यासी क्रिया दिव्य मशीदीचें रांजणगांवीचें द्यावें, ऐसा निश्चय करून पंडित मशारनिल्हेस आज्ञा केली कीं, दोघांस रांजणगांवीचे मशीदीचे क्रियेस पाठविणें, तेथून क्रियेमुळें निर्वाह होईल त्याप्रमाणें विल्हे लावणें. त्यावरून पंडित मल्शारनिल्हेनीं या हरदोजणांस पुरशीस केली; तुमचा कजिया आजि दहा पांच वर्षें पडिला आहे, निवाडा होत नाहीं. याउपरी तुह्मीं क्रिया दिव्यास रजावंद होत असाल, तरी राजी होऊन राजीनामे व वर्तावयाचे जामीन देणें, ह्मणजे रांजणगांवास हरदोजणांस पाठवून देऊं; तेथें क्रियेमुळें निर्वाह होईल त्याप्रमाणें वर्तणें. त्यावरून या हरदोजणांहीं निश्चयास राजी झाले आणि राजीनामे लेहून दिल्हे बितपशील.:—

दस्तक बेशमी पोलादशाहा बिन नुरादशाहा सैद, मौजे कात्रज, तर्फ कर्यातमावळ, सुरुसन सलास आर्बैन मया व अलफ. साहेबांचे शेवेसी. राजीनामा लेहून दिल्हा ऐसाजे, बावाखान गोरी याचा व आपला मौजे मजकुरचा पाटिलकीचा कजिया लागला आहे. साखराई हे शाहाबुद्दीन आपला वडील याची बायको तिचे वंशीचा आपण आहों, ऐसें असोन बावाखान गोरी वगैरे ह्मणतात जे, ते साखराईचा वंश आपण आहों. साखराई गोरी याची बायको ऐसें ह्मणतात. याचा दाखलाही पाहतां ठिकाण लागेना, याकरितां साहेबीं क्रिया नेमिली. त्यास हरदुजण क्रियेस रजावंद जाहलों असों. मशीदीच्या रांजणगांवास जाऊन मशीदीची क्रिया करून

दस्तक बेशमी बावाखान बिन इस्मालखान गोरी, मौजे कात्रज, तर्फ कर्यातमावळ, सुरुसन सलास आर्बैन मया अलफ. साहेबांचे शेवेसी. राजीनामा लेहून दिल्हा ऐसाजे, पोलादशाहा सैद याचा व आमचा मौजे मजकूराचा पाटिलकीचा कजिया आहे. त्यास गोही दाखले पाहतां ठिकाण लागला नाहीं. पहिले गांवीची पाटिलकी साखराईनें केली आहे. तिचें अडनाव गोरी ऐसें आहे. ते साखराईचे वंशीचे गोरी आपण आहों. ऐसें असोन पोलादशाहा ह्मणतो कीं ते साखराई सैदाची आहे. याबद्दल निवाडा होईना, याजकरितां हल्लीं आपण क्रियेस राजी जाहलों आहों. साहेबीं मशीदीचे रांजणगांवास आह्मांस व पोलादशाहास पाठविलें. हरदोजण

NATIONAL ARCHIVES OF INDIA

क्रियेस खरा जाहलों तरी सारी पाटिलकी आह्मीं खाऊं. जरी क्रियेस खोटे जाहलों तरी दरोबस्त पाटिलकी गोरी यांनीं खावी. आपणास पाटिलकीशीं संमंध नाहीं. साखराई पाटलीण हे आपल्या वडिलांची बायको खरी, सैद साव मिराशा आपले चुलते व मींयाजी आपला आजा सैद; हें क्रियेनिशीं खरें करून देईन. आपण क्रियेस खरे जाहलों, तरी बावाजी वगैरे गोरी यासी पाटिलकीशीं गरज नाहीं. आपण खोटा निघालों तरी आपणास वतनाशीं संमंध नाहीं. हा कतबा लेहून दिल्हा सही. ताजा कलमः—बावाजी गोरी यांनीं क्रिया करून खरा जाहला तरी दरोबस्त पाटिलकी गोरी यांनीं खावी. सैदास पाटिलकीशीं संमंध नाहीं. आपल्यास वर्तावयासी साहेबांपाशीं पहिले जमान दिल्हे आहेत. तोच करार आहे. हें लिहिलें, सही निशाणी नांगर बिकलम धोंडो नामदेव लांडे देशपांडीये कर्यातमावळ, छ २२ रबिलाखर राजीनामा १.

तेथें जाऊन मशीदीची क्रिया होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. जरी पोलादशाहा क्रियेस खरा जाहला आणि आपण गोरी खोटे जाहलों तरी दरोबस्त पाटिलकी पोलादशाहा सैद यानें खावी. आपल्यास पाटिलकीशीं संमंध नाहीं. साखराई मिराजीची बायको, मिराजी व मींयाजी गोरी हे आपले वडील आहेत. त्याचा वंश आपण आहों. ऐसें आपण क्रिया करून खरें करून देऊं. आपल्यास क्रिया लागली ह्मणजे दरोबस्त पाटिलकी सैदानीं खावी. आपल्यास संमंध नाहीं. हा कतबा लेहून दिल्हा सही. आपलेस वर्तावयासी जमान पहिलें कडधाचा पाटीलसाहेबांसी दिल्हा आहे तोच करार आहे. हें लिहिलें सही. निशाणी नांगर बिकलम धोंडो नामदेव लांडे देशपांडीये कर्यात मावळ, छ २२ रबिलाखर राजीनामा १.

येणेंप्रमाणें हरदोजणांनीं राजीनामे व जमान पेशजीचे खरे असत ह्मणून सदरहूप्रमाणें लेहून दिल्हे. क्रियेस रजावंद जाहलों असे. त्यावरून हुजूरून राजश्री मोरो नारायण सुभेदार प्रांत कर्डेरांजणगांव यास आज्ञापत्र खास दस्तूर सहीचें सादर केलें कीं, या हरदोजणांपाशीं कसबे रांजणगांवचे मशीदीची क्रिया घेवविणें. खरा खोटा याचें स्थळपत्र हुजूर पाठवणें ह्मणोन हुजूरून बराबर संताजी बोरकर देऊन जिल्हेकडील लोक व पत्रें देऊन रांजणगांवास दोघांस रवाना करविलें. हुजूरच्या लोकांनीं हरदोजणांस सुभा नेलें. सुभेदार मजकूर यानें आपलें पत्र सुभाचे लोक देऊन कसबे मजकुरास पाठविलें. तेथील पारिपत्यगार व गांवचे वतनदार जमा करून त्यांस हुजूरचे आज्ञेचें वर्तमान लोकांनीं सांगितलें. यावर आज्ञापत्रावरून कसबे मजकुरचें समस्तांनीं बसोन या दोघांच्या राजीपणें स्थळचे पद्धतीप्रमाणें क्रिया बावाखान याजकडून करविली. पोलादशाहानें याजपासून क्रिया घेतली. पंधरा दिवस तेथें मशीदींत हरदोजण ठेऊन हुजूरचे लोकांचे गुजारतीनें जाहलें वर्तमान बावाखान गोरी व पोलादशाहासीं खरें करून त्याचीं जयपत्रें दोघांस दोन कसबे मजकुरचे

NATIONAL ARCHIVES OF INDIA

समस्तांनीं दिल्हीं. तीं हरदोजणांनीं घेऊन उपरांतिक क्रिया घेतली. ह्मणून गांवची बखर व सुभाचीं पत्रें व या हरदोजणा(स) हुजूरच्या लोकांनीं हुजूर आणिलें. हरदोजण हुजूर आले. दोघांजवळ स्थळचीं जयपत्रें दोन होतीं, तीं दोघांनींही हुजूर हाजीर केलीं. तीं छ ६ रजबी मनास आणिलीं. वितपशील अस्सलप्रमाणें:—

"छत्रपती स्वामी पंतसचीवसाहेब."

"जयपत्रें, शके १६६४ दुंदुभीनाम संवत्सरे, श्रावण कृष्ण ८ गुरुवासरे ते दिवशीं ते हुजूर गोत मोकदम व शेटे महाजन, कसबे रांजणगांव, तर्फ मजकूर सरकार जुन्नर, सुरुसन ११५२ या विद्यमानें अग्रवादे बावाखान वल्लद इस्मालखान गोरी व पश्चमवादी पोलादशाहा वल्लद नूरशाहा सैद, मौजे कात्रज, तर्फ कर्यातमावळ, प्रांत मावळ, जयपत्र ऐसेजे, मौजे मजकूरची मुकदमी दरोबस्त मुसलमानांची तर्फा दोन, त्यांपैकीं निमेचा धाकटा खानाजी गोरी बाकी वडील तर्फ निमे मोकदमी त्याचे. हरदोजणांत भांडण कीं, दोघेही ह्मणतात कीं, साखराईचे वंशीचा येबाबेचे वडील तर्फे निमे मोकदमीचे हरदोजणांत सातारा महाराज राजश्री————चे दरबारीं पडिला त्यास तेथें मजकूर मनास आणतां राजदरबारीं दिव्य करावयाचा निश्चय जाहला. महाराज राजश्री स्वामींनीं व राजश्री साहेबीं आपलीं पत्रें राजश्री पंतसुभेदार साहेबांस देऊन मलठणास बराबर हुजरे देऊन पाठविलें. त्यास मलठणीं राजश्री सुभेदार साहेबीं सदरहू त्रिवर्ग, सरकारचे लोकांसमागमें देऊन पाठविले. त्यास राजश्री साहेबांचे आज्ञापत्रीं हुकूम केला कीं, मौजे कात्रज, तर्फ कर्यातमावळ येथील निमे तक्षीम वडीलपणाची, त्यांत पोलादशाहा सैद व बावाखान गोरी या दोघांत कजिया लागला आहे. गोहीसाक्षमुळें निर्वाह होत नाहीं. याकरितां राजश्री स्वामींनीं मशीदीची क्रिया नेमून कसबे मजकुरास हरदोजणांस पाठविले आहेत. येविषयीं मोरो नारायण सुभेदार, परगणे मजकूर यासी पत्र सादर आहे. तें मनास आणून हरदोजण कसबे-मजकुरास पाठवितील. तरी समस्त मिळोन पद्धतप्रमाणें क्रिया घेऊन, खरा कोण व खोटा कोण हें लेहून पाठविणें, ह्मणवून राजश्री साहेबीं आज्ञापत्र कसबे मजकुरास सादर केलें. व राजश्री सुभेदार साहेबीं कसबे मजकुरास ताकीदपत्र सादर केलें कीं, मौजे कात्रज, तर्फ कर्यातमावळ, येथील पाटिलाचा कजिया आहे. त्यास महाराज राजश्री स्वामीं यांनीं व राजश्री यांनीं कर्यात मजकुरास दिव्य करावयास पाठविले आहेत. तरी याचें वर्तमान मनास आणून, दिन शुद्ध पाहून, श्रीचें दिव्य यापासून तेथील पद्धत असेल त्याप्रमाणें घेणें. आणि होईल तें वर्तमान बयाजवार हुजूर अर्जदास लेहून पाठविणें. येविषयीं दिवसगत न लावणें. बहुत जलदीनें याचा निर्गम करणें. ह्मणोन राजश्री सुभेदार साहेबीं पत्र सादर केलें. त्यावरून मग राजश्री साहेबांच्या हुकुमावरून हरदोजणांसीं पुशिलें कीं, तुह्मीं श्रीचे क्रियेस रजावंद आहांत कीं काय? त्यास हरदोजण राजी होऊन राजीनामा

NATIONAL ARCHIVES OF INDIA

लेहून दिल्हा कीं, बावाखान गोरी यानें न्हाऊन धुवून श्रीदेवाची क्रिया करावी. साखराई गोरी आपली वडील, तिचे वंशिक, आपण, तिची अवलाद वडील तर्फेस निमे मोकदमचे खावंद पोलादशाहा सैद याचा कांहीं तालुका नाहीं ह्मणोन श्रीदेवाची क्रिया करून पोलादशाहा सैद याच्या हातीं उदी उचलून देतों. ह्मणोन बावाखान गोरी क्रिया करावयासी राजी जाहला व येणेंप्रमाणें पोलादशाहा सैद बावाखान याजपाशीं क्रिया घ्यावयासी राजी जाहला. राजी जाहलियावरी हरदोजणांस ह्मटलें कीं, श्रीदेवळांत दहा आणि पांच, पंधरा रोज वाती लावून बैसावें लागेल. ज्यास क्रिया लागेल तो खोटा. स्थळ मजकुरची पद्धत पंधरा रोज बैसावयाची आहे. दशरात पंचरात लेहून देणें. त्यास हरदोजणांनीं दशरात पंचरात लेहून दिल्हें कीं, दाहा आणि पांच—पंधरा रोज श्री देवळांत जेणेंप्रमाणें क्रिया करावयाचा निश्चय जाहला आहे, त्याप्रमाणें क्रिया करून, वाती लावून पंधरा रोज श्रीचे देवळांत बैसोन, ज्यास क्रिया न लागे, वतन खाई; ज्यास क्रिया लागेल तो खोटा, वतनासी संमंध नाहीं. ह्मणून हरदोजणीं दशरात पंचरात लेहून ठेवून राजीनाम्याच्या मजकुराप्रमाणें व दशरात पंचरातच्या मजकुराप्रमाणें इस्तकबील, श्रावण शुद्ध ८ गुरुवार तागाईत श्रावण वद्य ८ गुरुवारपावेतों पंधरा दिवसांचा नेम करून, श्री देवाची क्रिया करून, वाती लावून, हरदोजण श्री देवळांत बसले. त्यास रक्षण सरकारचे लोक व कसबे मजकूरचा मुजावर हेाता. त्यास पंधरा रोज नेम गुजरल्या उपरी दोघां वाद्यांची रुबरू सैदअल्ली मुजावर कसबे मजकूर यासी बोलावून, सत्य घालून सरकारच्या लोकाविद्यमानें पुरशीस केली. कोणास काय अजमत जाहली ते जाहीर करणें. त्यास मुजावर मजकुरानें हकिकत जाहीर करून लेहून दिधली कीं, पहिले दिवशीं क्रिया केली तेव्हां उदी घेते वेळेस पोलादशाहा सैद कापला. त्याउपरी तिसरे दिवशीं पोलादशाहाचा दिवा जळाला नाहीं. तेल पालथें जाहलें. तीन वख्त दिवा लाविला परंतु लागला नाहीं. बोलबोल दिवा जळाला. रोज आठ बावाखान गोरीचा दिवा चांगला जळाला. त्याउपरी नववे दिवशीं सैदाचा दिवा विझाला. चौदावे पंधरावे दिवशीं पोलादशाहा मुरकुंडी घालून निजला कीं, हींव वाजतें व पंधरावे दिवशीं पोलादशाहाचा दिवा जळाला नाहीं. दिव्यांचे भडके जाहले. येणेंप्रमाणें हकिकत सरकारचे लोक त्रिवर्ग यांचे रुबरू मुजावर मजकुरानें पोलादशाहा सैद यासी श्रीदेवाची अजमत घडली ते जाहीर केली. बावाखान गोरी यासी क्रिया लागली नाहीं. खरा निघाला. त्यास हरदोजणांनीं राजीनाम्यांत व दशरात पंचरातींत लेहून दिल्हें आहे कीं, ज्यास क्रिया लागेल तो खोटा, वतनासी संमंध नाहीं. ज्यास क्रिया न लागे तो खरा, त्यानें वतन खावें. त्यास लेहून दिल्हीयाप्रमाणें निश्चय केला कीं, बावाखान गोरी श्रीदेवाच्या घरांतून खरा निघाला. त्यानें निमे मोकदमी निमे तक्षीम खावी. पोलादशाहा सैदयासी श्रीदेवाची अजमत जाहली तो खोटा, वतनासी संमंध नाहीं. हें जयपत्र लिहिलें. सही निशाण नांगर बिकलम अनाजी यादव जोशी कुळकर्णी कसबे मजकूर.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

याप्रमाणें याजपाशीं व पोलादशहापाशीं एकाच मजकुराचीं निवाडीयाचीं जयपत्रें दोन दिल्हीं, तीं दोन्ही मनास आणितां, एकच अर्थ दोहींचा लिहिला. त्यांत सारांश कीं, पोलादशहा सैद यास क्रिया लागली, खोटा जाहला. त्यास वतनासी संबंध नाहीं. बावाखान गोरी खरा जाहला, त्यानें वतन अनभवावें, ऐसें लिहिलें असें. तेव्हां पोलादशहा सैद यासी हुजूर पुरशीस केली कीं, क्रिया जाहली, तूं खरा जाहलास किंवा खोटा जाहलास? याचें वर्तमान जाहीर करणें. तेव्हां त्यानें जाहीर केलें कीं, आपणांस क्रिया लागोन देवाची अजमत घडली. आपण खोटा जाहलों. याउपरी मौजेमजकूरचे पाटिलकीच्या वतनासीं संबंध नाहीं. आपला अगर आपले निसबतीच्या कोदास वतनासी संबंध नाहीं. बावाखान गोरी क्रियेमुळें खरा जाहला. त्यास कांहीं अजमस घडली नाहीं. गोरीचें वतन खरें; साखराई गोरी खरी. मौजेमजकूरचें मोकदमीचें वतन दरोबस्त गोरीचें खरें जाहलें. त्याचें त्याच्या दुमाला केलें पाहिजे. याप्रमाणें हुजूर सभास्थानीं श्रुत केलें, तें मनास आणून बावाखान गोरी यास त्याजकडून आलाहिदा येजितखत देविलें आणि स्थळचें जयपत्र याचें याजकडे देविलें. आणि पोलादशहा सैद खोटा जाहला ह्मणवून त्यास दूर करून, बावाखान गोरी खरा जाहला याजकरितां स्वामी कृपाळू होऊन, जयपत्राप्रमाणें मौजेमजकूरची वडील तर्फ निमे मोकदमीची बावाखान गोरी याची–याच्या दुमाला करून, शिरपाव देऊन वृत्तिपत्र गोरी मजकुरास सादर केलें असे. तरी साखराई गोरीचा वंश बावाखान गोरी, त्यास निमे वडील तर्फेचा मानपान, होळीची पोळी वगैरे उत्पन्न काळी पांढरींतील हक्क आदा व पालणूक देणें, मागणें. घरें, शेत, मिराशीची इनाम वगैरे जे सुदामतप्रमाणें चालत आलें असेल त्याप्रमाणें बावाखान गोरी यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतन चालवून गांवची लावणी उगवणी याचे हातें करून दंडकप्रमाणें वतनाची सेवा घेणें. पोलादशहा सैद वगैरे सैद यास याउपरी मौजेमजकूरच्या वतनासी अर्थाअर्थीं संबंध नाहीं. त्यानें स्थळचें निवाडपत्र आणिलें होतें, तें हुजूर घेतलें असे. तें खोटें आहे, तें गोरी मुसलमान यांचें वतन दरोबस्त खरें असे. या निमे वतनसंबंधें बावाखान गोरी याचे माथां जीवन माफिक दुतर्फा शेरणी रुपये ३०० तीनशें करार केले असेत. याची उगवणी जिल्हेकडे जाहली असे. या पत्राची प्रती लेहून घेऊन अस्सल पत्र भोगवटीयास परतोन देणें. छ—सन खमस अर्बैन, पत्रें, वैशाख वद्य तृतीया, सौम्यवासरे, शके ७० रक्ताक्षीनाम संवत्सरे. येविषयींचीं पत्रें:–

१ मुख्यपत्र.
१ देशमुख, देशपांडे.
१ निमेचा मोकदम पोलादशहा बिन नूरशहा.
१ देशाधिकारी.
१ राजश्री पंतसचीव.

५

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वृत्तिपत्र ९.

बार छ १० मोहरम सन सलास सलासीन.

यादी राजपत्र कृष्णाजी बिन नरसोजी बोडका मोकदम, मौजे गहुजें, तर्फ कर्यात-मावळ, सुरुसन इसने सलासीन मया अलफ. दिल्हें वृत्तीपत्र ऐसेजें, मौजेमजकूरची मोकदमी दरोबस्त पुस्तदरपुस्त आपली आहे. ऐशीयास दहावीस वर्षें धामधुमेकरितां गांव उजाड पडला होता. अलीकडे मोगलाचा सल्ला जाहला ते समयीं आपण गांवावरी आलों आणि कौल घेऊन वसाहती केली. ते समयीं सोमाजी बिन बापुजी बोडका आटपडीकुडे होते. तेथून मौजेमजकुरास येऊन रयतावियानें कौल घेऊन वोवाडा घातला. ते वेळेस आपले व बावाजी बोडका आपले निमेचा धाकटा भाऊ याचें भाऊपणाचें भांडण लागलें होतें. प्रसंगीं सोमाजी देशांतून येऊन कजिया केला कीं, हे दोघेही धाकटे, आपण दोघांहून वडील आहों, ऐशी तकरीर मौजेमजकूरच्या गोतापाशीं केली. त्यावरी राजश्री अनंदराऊ बहिरव किले सिंहगडीहून गांवास आले आणि हक्क जव्हारीचे गोत जमा करून, करिना मनास आणितां सोमाजीची वंशावळी आपले वंशावळीस मिळविली नाहीं. आपला मूळपुरुष येसजी पाटील त्याचे दोघे, वडील बावाजी त्याचा वंश आपण; धाकटा रामजी त्याचा वंश हिरोजी व बावाजी हे दोन वंश खरे. तिसरा भाऊ आपणास ठाउका नाहीं. ऐसें आपण लेहून दिल्हें. सोमाजीनें लेहून दिल्हें कीं, मूळपुरुष सोनजी त्याचे पुत्र तिघे. वडील कोंडाजी त्याचा वंश आपण, दुसरा बाबाजी त्याचा वंश कृष्णाजी; तिसरा रामजी त्याचा वंश बावाजी याप्रमाणें वंशावळी आहे. ऐशी तकरीर लेहून दिल्ही. याउपरी राऊ मशार-निल्हेनीं पांढरीच्या व भोवरगांवीच्या मुखें दाखले मनास आणितां मूळ-पुरुष येसजी पाटील यास लेक दोघे. वडील बाबाजी व धाकटा रामजी, याचा वंश कृष्णाजी व हिरोजी व बावाजी आहेत. तिसरा वडील कोंडाजी. सोमाजीनें आपला वंश लेहून दिल्हा त्याचा थांग लागत नाहीं. ऐसें खरें जाहलें. त्यावरी गोतास निरोप देऊन राऊ किल्ल्यास आले. सोमाजी गांवीहून निघोन राजश्री पंताजीपंत याकडे येऊन, पागेस चाकरी राहून, त्याचीं पत्रें गडास व जमीदारास घेतलीं; आणि बरोबर हुजऱ्या घेऊन आला. तीं पत्रें त्यांनीं मनास आणितां, वडीलपण व निमे मोकदमी सोमाजीकडे व निमे कृष्णा-जीस देऊन, पत्रें करून देणें ऐसी जोर बजोर हुकूम पत्रें आलीं. तेव्हां आपण गैरहजीर झालों. आपले भाऊ गिरजोजी व चाहूजी यांसी जोरावारीनें नेऊन, याचा निमे मोकदमीचा कागद लेहून घेऊन, निमे मोकदमी व वडीलपण सोमाजीस देऊन, गोताचा कागद करून दिल्हा. त्याप्रमाणें राजश्री पंताजीपंत यांनींही आपलीं पत्रें करून दिल्हीं. त्या तागा-ईत आपण आज आठ नऊ वर्षें बाहेर पडिलों आहों. सोमाजी मौजेमजकूरची मोकदमी खात आहे. तरी साहेबीं सोमाजीस आणून, गोतमुखें बरहक्क निवाडा करून आपलें वतन आपलें तुमाला केलें पाहिजे म्हणून तुंवा हुजूर सातारीयाचे मुक्कामीं येऊन विदित केलें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

त्यावरून सोमाजी बोडका यास आणून तुह्मां हरदुवादीयांस पुरशीस केली कीं, मौजे-मजकूरच्या पाटिलकीच्या करिनीयाचे कतबे व तकरिरा लेहून देणें. त्यावरी तुह्मीं व सोमाजीनें तकरिरा व कतबे लेहून दिल्हेत. विल्हे लावून सोमाजीस आज्ञा केली कीं, तूं कोणत्या इनसाफास रजावंद आहेस हें सांगणें. त्यावरून सोमाजी मौजेमजकूरच्या समाकुळ पांढरीस व देशमुख, देशपांडे व भोवरगांवीच्या गोतास रजावंद आहे. तें सत्य स्वरोन बरहक्क इनसाफ करितील त्याप्रमाणें आपण वर्तोन ह्मणून बोलिला. त्यावरून तुह्मांसही याचप्रमाणें पुरशीस करितां, तुह्मीं सदरहू गोतास राजी झालेस. त्यावरून तुह्मां हरदोजणास राजीनामे व जामीन मागितले. त्यास तुह्मीं राजीनामे देऊन जमान दिल्हे बितपशीलः—

तुजला जमान मोकदम मौजे तरस साळुंब्रे तर्फ पुणें हवेली.	सोमाजीस जमान मोकदम मौजे शिवली तर्फ पौनमावळ.

येणेंप्रमाणें हरदोवादीयांस सदरहू जामीन घेतले आणि तर्फ मजकूरच्या देशमुख व देशपांडे व मौजेमजकूरची समाकुळ पांढरी व भोवरगांव देखील हवेली पुणें येथील गांवचे पाटील हुजूर आणविले. त्यावरून सदरहूप्रमाणें गोत हुजूर आलें. त्याउपरी सदरहू गोत व परगणे सुपें येथील महादजी नाईक काटे देशमुख व विठ्ठल बाबुराव देशपांडे व अंबरोजी भापकर पाटील, मौजे लोणी वगैरे गोत नेमून, सदरहू गोतावरी व तुह्मां हरदोवादीयांचा इनसाफ दिल्हा. त्यावरी गोतानें तुह्मां दोघां वादीयांचे राजीनामे घेऊन, वंशावळी लेहून देणें ह्मणून पुरशीस केली. त्यास तुह्मीं आपली वंशावळी लेहून दिल्ही, ती गोतानें मनास आणून सोमाजीस वंशावळी लेहून देणें ह्मणून पुरशीस केली. त्यावरून सोमाजीनें आपली वंशावळी लेहून दिल्ही. त्यावरी दोन्ही वंशावळी मनास आणितां, तुमच्या वंशावळी बावाजी देखील दाखल्यामुळें खऱ्या झाल्या. सोमाजीचे वंशावळीचा थांग लागेना. ऐसें गोतानें पसंत करून, सदरहू झाला करिना हुजूर विदित केला. याउपरी दुसरे दिवशीं सोमाजी सदरहू गोतास गैरराजी होऊन, श्री—चे क्रियेस रजावंद झाला कीं, पांढरी ज्यास हातीं धरून वोढून काढील तो खरा; ऐसें बोलिला. त्यावरी तुह्मी बावाजी देखील श्री—चे क्रियेस राजी आहां कीं काय? ह्मणून पुरशीस केली. त्यास तुह्मीं सदरहूप्रमाणें राजी होऊन, राजीनामे लेहून दिल्हे व सोमाजीनेंही राजीनामा लेहून दिल्हा. फिरोन दुसरे दिवशीं सोमाजी श्री—चे क्रियेस गैरराजी होऊन कसबे रांजणगांवीचे मशिदीच्या दिव्यास रजावंद झाला; त्याप्रमाणें तूंही राजी झालास. आणि हरदोवादीयांनीं राजीनामे लेहून दिल्हे. त्यावरी तिसरे दिवशीं सोमाजी मशिदीच्या दिव्यास नाकबूल होऊन मागतीं श्री—चे क्रिया मागों लागला. तेव्हां त्यास आज्ञा केली कीं, परस्परें वादे वादे यांनीं एकाच्या हातावरी एकानें पाणी घालावें, खरा होईल तो वतन अनभवील, ऐसा नियत केला. ते समयीं हे गोष्टीस सोमाजी गैरराजी होऊन अग्नि दिव्य करीन ह्मणून बोलिला. त्यावरून तुह्मा व सोमाजीचा राजीनामा लेहून घेतला. त्याप्रमाणें अग्निदिव्य नेमून द्यावें तों मजलसीच्या मतें गोही-

साक्ष अगर कागदपत्र नसिला तरी अग्नि दिव्य नेमून द्यावें. सांप्रत मौजेमजकूरची समाकुळ पांढरी व देशमुख व देशपांडे व भोवरगांवीचे गोत व तर्फ हवेली पुणें येथील गांवगन्नाचे गोत हुजूर आले आहेत. त्यास शपथपूर्वक पुरशीस करावी आणि गांवगन्नाचे पाटील व मौजेमजकूरचे बलुते पृथकाकारें सत्य स्मरोन सांगतील, तें मनास आणून निवाडा करावा. सोमाजीस अग्नि दिव्य नेमून द्यावें ऐसें नाहीं. याप्रमाणें मजलसीच्या व गोताच्या विचारें खरें झालें. त्यावरून समाकुळ पांढरी व भोवरगांवीचे गोत बैसवून, त्यांच्या माथां बेलभंडार घालून, सोमाजीची हकीकत काय असेल ती सत्यपूर्वक बेताळीस स्मरोन विदित करणें. त्यावरून पांढरीनें व भोवरगांवच्या गोतानें पृथकाकारें सांगितलें कीं, कृष्णाजी व हिरोजी व बावाजी हे वडिलातागाईत मौजेमजकूरची मोकदमी आजीपावेतों अनभवीत आले आहेत. सोमाजीचें आदिअवसान आपल्यास ठावकें नाहीं, अगर आपल्या वडिलांनींही कांहीं सांगितलें नाहीं, ह्मणून सदरहू गोतानें साक्ष दिल्ही. त्याप्रमाणें नांवनिशींवार साहिदीनामा लेहून घेतला. आणि दुसरे दिवशीं तुजला व सोमाजीस व समाकुळ पांढरीस व भोवरगांवीचे गोतास हुजूर राजश्री—स्वामीसन्निध नेऊन उभें केलें. व तुह्मां हरदोवादीयांचे कतबे व तकरिरा व राजीनामे गोताचा साहिदीनामा होता तो वाचून दाखविला. त्यावरून राजश्री स्वामींनीं अवघ्या गोताच्या मुखें मनसुफी मनास आणून साहिदीनामा पाहिलीयावरी आज्ञा केली कीं, सोमाजीचा भोगवटा या आठा नवा वर्षांपलीकडे पांच सहा डोया नाहीं व कागदपत्रही नाहींत. व पांढरीच्या व हक्क जव्हारीच्या साक्षीनशीं कोंडाजीचा वंश सोमाजी, कृष्णाजी व हिरोजी व बावाजी याच्या घरांतील नाहीं. आणि सोमाजी दोन चार मनसुफीस राजी होऊन गैरराजी झाला. ते सोमाजी झोंडपणें गळां पडतो. त्यास सोमाजी खोटा आहे ऐसें झालें. त्यावरी सोमाजीस पुरशीस केली कीं, तूं कोणे ठिकाणेहून आला आहेस हा करिना विदित करणें. त्यास सोमाजी बोलिला कीं, आपण आटपाडीस होतों त्यास मुलखास कौल झाला ते समयीं आपण बावाजी बोडका याच्या बोलें रयतावीयाचा कौल घेऊन, गांवावरी येऊन राहिलों, ऐसें बोलिला. त्यावरी राजश्री—स्वामींनीं सोमाजीस आज्ञा केली कीं, तूं जिकडून आलास तिकडे जाणें. तुजला मौजेमजकूरचे मोकदमीशीं संबंध नाहीं. तरी येजितखत लेहून देणें ह्मणून आज्ञा केली. त्यावरून सोमाजी बोडका यानें आपले खुष रजावंदीनें हाजीर मजालशीस राजश्री—स्वामीसन्निध छ. २९ जमादिलाखर व मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा, भृगुवारीं येजितखत तुझ्या व हिराजीच्या नांवें लेहून दिल्हें कीं, आपण नाहक कृष्णाजी व बावाजीच्या गळां पडलों होतों. त्यास आपण आपले तकरीरेवरून व गोताचे साक्षीनशीं व भोगवटाही झाला नाहीं. यामुळें आपण व आपले भाऊ खंडोजी बोडका ऐसें खोटे झालों. याउपरी आपण अगर आपले वंशीचा कोणी कृष्णाजी व बावाजीसीं मोकदमीचा वाद सांगेल, तो गोताचा खोटा व दिवाणचा गुन्हेगार; ऐसें येजितखत लेहून तुजला दिल्हें. त्यावरी राजश्री—स्वामींनीं तुझी मोकदमी तुझे दुमाला

NATIONAL ARCHIVES OF INDIA

करून शिरपाव देऊन, वतनपत्रें करून द्यावयाची आज्ञा करून, कृष्णाजी व हिरोजी व बावाजी बोडके यांस जिल्हेचीं पत्रें करून देणें ह्मणून राजश्री———स्वामींनीं आज्ञा केली. त्यावरून सोमाजी तुझ्या गळां झोंडपणें पडत होता तो खोटा झाला. याकरितां मौजे-मजकूरचे मोकदमीचें अगदीं वतन तुजला व हिरोजी व बावाजी बोडका याचे दुमाला कलें असे. तरी तुह्मीं दोघे भाऊ येणेंप्रमाणें मौजेमजकूरच्या मोकदमीचे मान वांटून घेणें बितपशीलः—

तुजकडे मान बितपशील आधीं.	हिरोजी व बावाजी यांकडे मान बितपशील मागें.
१ नांगर.	१ होळीची पोळी.
१ दसरीयाचा मान.	१ दिपवाळीचा मान.
१ शिराळशेट.	१ गौरीचा मान.
१ पासोडी निमे.	१ पासोडी निमे.
१ खोबऱ्याची वाटी निमे.	१ खोबऱ्याची वाटी निमे.
१ तश्रीफ आधीं.	१ तश्रीफ मागें.
१ विडा आधीं.	१ टिळा.
१ चांभारापासून पायपोस जोडा.	१ चांभाराकडून पायपोस जोडा.
१ फांटीयाची मोळी आधीं.	१ ह्मैस, घर, पालक.
१ ह्मैस, घर, पालक.	१ फांटीयाची मोळी मागें.
१०	१०

येणेंप्रमाणें तुजकडे व हिरोजी व बावाजी बोडके यांजकडे सदरहू दाहा दाहा मान दिल्हे असेत. तरी सदरहू वांटणीप्रमाणें निमे निमे मान व काळी पांढरी व वतनामुळें हक्क लाजिमा उत्पन्न होईल तें व कोळी याकडील पाणी निमें निमेंप्रमाणें, मौजे-मजकूरचे मोकदमीचें वतन दोघे भाऊ पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभवीत जाणें. वतनसंमधें तुझे माथां शेरणी रुपये———कुलबाब दुतर्फा दोघांकडे करार केली असे. सदरहूची उग-वणी करून पावलीयाचे जाब घेणें. तेणेंप्रमाणें मजुरा असे ह्मणून. याविषयीं पत्रेः—

१ वतनपत्र.
१ देशमुख, देशपांडे.
१ देशाधिकारी.
१ कुळकर्णी, चौगुला व रयान.
१ राजश्री पंतसचीव.

५

एकूण पांच पत्रें देणें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वतनपत्र १०.

राघो नारायण व खंडो नारायण प्रभू उपनाम कर्णीक देशपांडे, पेण पंचमहाल, परगणे साकसें, प्रांत कल्याण, तळकोंकण यांसी दिल्हें वतनपत्र ऐसेजें, तुह्मीं शाहूनगर-नजिक किल्ले सातारा येथील मुक्कामीं स्वामीसन्निध येऊन विनंति केली कीं, परगणे मजकूरचे देशपांडेपणाचें दरोबस्त वतन पुरातन आपलें; आपले वडील वालजी झिमाजी व आप्पाजी झिमाजी हे वृत्ती अनभवीत असतां, देवजी दत्ताजी व गणेश दत्ताजी प्रभू यांचे वडील केशव प्रभू यासी देशपांडेपणाची गुमास्तगिरी सांगितली. तो मुशारा घेऊन देशपांडेपणाचें कामकाज करीत होता. वालजी प्रभू घांटावर चाकरीस गेले. मागें केशव प्रभूनें देशमुख व आधिकारी यांसी मिलताव करून देशकुळकर्णाचें दप्तर आपले घरीं घालून, रयतेची समजाविस करून कारभार करूं लागला. वालजी झिमाजी घांटावरून घरास आला. त्यांनीं केशव प्रभू गुमास्ता याचा कारभार देखून, चित्तांत असह्य मानून त्याचे घरचें दप्तर आपले घरीं आणून, वृत्तीचा कारभार करूं लागले. त्यावरून केशव प्रभू गुमास्ता यासी असह्य झालें. देसाई व अधिकारी यांसी अंतस्थ करून यासी विरुद्ध अतिशय वाढविला. वालजी व आप्पाजी यांसी मारून वृत्ती आपण करावी ऐसा इत्यर्थ करून देसाई व अधिकारी यांसी संकेत करून, वालजी व आप्पाजी कसबे वासी परगणे मजकूर येथें राहात होते. त्याजवरी देशमुखाची स्वारी नेऊन वालजी प्रभू वासीमध्यें वनस्पती म्हणवून शेत आहे तेथें जिवें मारिला. व आप्पाजी प्रभू पळोन ठाणें पेण येथें जात होता, तो कुकड-खिंड ह्मणवून आहे, तेथें लोक ठेविले होते त्यांनीं व वाशीहून धांवणें त्याचे पाठिलागास गेले. त्यांनीं मिळोन आप्पाजी शेत खिंडींत जिवें मारिला. ऐसे दोघेही भाऊ मारिले. आप्पाजी प्रभूची बायको सगर्भ होती. तीस मारावें म्हणवून लोक फिरोन वासीस गेले. तों ती बायको मोकदम मुसलमान बाईको वासीस होती, तिचे घरीं जाऊन तिजला शरण आली. तिनें अभय देऊन संदुकेंत घालून वरती आपण बैसली. स्वारीच्या लोकांनीं तमाम गांवांतील घरें शोधिलीं. मोकदमिणीच्या घरचाही झाडा घेतला, परंतु ती बायको सांपडली नाहीं. लोक उठोन गेले. त्याउपरी रात्रीची होडी व माणसें देऊन जलमार्गें फिरंगाण तर्फेस पावती केली, तेथें थारा धरून राहिली. प्रसुत झालियावरी तिजला पुत्र जाहला. त्याचें नांव गोविंद प्रभू. हें बायकोस पळविलीयाचें वर्तमान केशव प्रभूस कळतांच देशमुखास सांगून मोकदमिणीस जिवें मारिली. तिचे दोघे लेंक मारिले. त्याजवरी गोविंद प्रभू प्रौढ झाला. वतनाचें वर्तमान आईच्या मुखें सविस्तर ऐकोन मलिकअंबराकडे जाऊन फिर्याद जाहला. त्यांनीं त्याची हकीकत मनास आणून, वतनाची तहकिकात करून वृत्तीचे परवाने करून दिल्हे. ते घेऊन घरास आला. माईस परवाने दाखविले. वतनावर जावें तों माय ह्मणों लागलीजे, तूं एकटा वतनावरी गेलियानें अपाय होईल. तुजला अपाय झालियानें वंश बुडतो; याजकरितां वतनावरी जाऊं नको. तुझे पोटीं संतान झालियावरी वृत्तीवर जाण्याचा विचार

करणें. ऐसा कित्येक प्रकारें बोध करून शपथ घालून राहविलें. वतनावरी येऊं दिल्हें नाहीं. गोविंद प्रभू जे वेळेस वतनावरी यावयाचा विचार आपले माईसीं करी, ते समयीं ती शपथ घालून राहववी. याचप्रकारें कांहीं दिवस जाहले. इतक्यांत घर जळालें. त्यामध्यें मलिकअंबरी परवाने होते ते दग्ध जाहले. गोविंद प्रभूनें आपलें लग्न केलें. संसारिकास गुंतोन राहिला. त्यामुळें त्याचें येणें वतनावरी जाहलें नाहीं. तेच प्रांतीं राहिला. तेथें त्याचे पोटीं पुत्रसंतान जाहलें. पुत्र चौघे. त्यांचीं नांवें बितपशीलः—

बापूजी प्रभू १. विठल प्रभू १. पांडुरंग प्रभू १. गोपजी प्रभू १.

येणेंप्रमाणें चौघे पुत्र यांमध्यें गोपजी प्रभू व विठल प्रभूचा पुत्र सूर्याजी प्रभू ऐसे दोघे चुलते पुतणे महाराज राजश्री–थोरले कैलासवासी स्वामीचे सेवेसी किल्ले रायगड येथें जाऊन फिर्याद केली. इतकियांत दसरियाचे मुहूर्तेंकरून कैलासवासी स्वामी कर्नाटकचे स्वारीस जावयासी निघाले. पोलादपुरचे मुक्कामीं गोपजी व सूर्याजी विठल यांनीं विनंति केली. त्यास साहेब मसलतीहून आलियावरी तुमचा इनसाफ करितील, ऐसें म्हणोन घरास जावयासी या हरदूजणास आज्ञा दिल्ही. थोरले स्वामी कर्नाटकचे स्वारीहून आलियावरी गोपजी व सूर्याजी प्रभू यांनीं उभें रहावें, तों संसार कसालीयामुळें एक दोन वर्षें फावलें नाहीं. तों थोरले महाराजांस कैलासवास जाहला. याउपरी महाराज राजश्री–सिंहासनारूढ जाहले. त्यासंनिध गोपजी व सूर्याजी विठल फिर्याद जाहले. वतनाचें वर्तमान साकल्य निवेदन केलें. त्यावरून देवजी दत्ताजी व गणेश दत्ताजी यांचे वडील गोपाळ दत्ताजी व वामनाजी गोविंद यांसी मसाला करून हुजूर नेले, आणि राजश्री प्रल्हाद निराजी न्यायाधीश होते, त्यास आज्ञा केली कीं, यांच्या वृत्तीचा निवाडा मनास आणून विदित करणें. त्यावरून त्याहीं व राजश्री———पंडितराव यांनीं तकरिरा मनास आणून महालच्या सडी नेऊन, साक्ष मोझे मनास आणिले तों गोपजी प्रभू व सूर्याजी प्रभू यांची वृत्ती खरी; गोपाळ दत्ताजी व वामनाजी गोविंद यांच्या वडिलास मुतालकी सांगितली होती. त्यांनीं यांचे खून करून वृत्तीचा उपभोग घेऊ लागले. ऐसें खरें झालें. हें वर्तमान राजश्री–स्वामीपाशीं पंडितराव व न्यायाधीश पंत मशारनिल्हे यांनीं निवेदन केलें. तें मनास आणून वतनपत्रें करून द्यावयाची आज्ञा केली. तों राजश्री–स्वामी यांची स्वारी संगमेश्वरास जाहली. तिकडूनच मोगलाईंत जाणें जाहलें. पत्रें व्हावयाचीं तैशींच राहिलीं. उपरांतिक महाराज राजश्री–स्वामी चेंजी प्रांतें स्वारीस गेले. या प्रांतीं मोगलाई जाहली. त्यास आपले वडील पांडुरंग प्रभू गोपजी प्रभूचे भाऊ याचा पुत्र रघोजी प्रभू त्याचा पुत्र नार प्रभू आपले बाप हे कल्याणास मोगलाईकडून खान महंमद यास सुभा होता त्याचे नायेब गुलाम मोहीदिन सैयद कल्याण भिवंडी येथील अंमल करीत होते, त्यापाशीं उभे राहिले. वतनाची हकीकत कुली जाहीर केलीयावरी देवजी दत्ताजी व गणेश दत्ताजी यांचा बाप दत्ताजी गंबाजी यास मसाला करून कल्याणास नेलें. त्याची व याची हकीकत ऐकोन मजालसी

लोक व बालीमवाली व काजी व वतनदार यांजवरी मनसुफी घातली. त्याहीं साक्ष मोझे गोही मोकाबले मनास आणिले, व दत्ताजी गंबाजी यानें कल्याणाहून आपला भाऊ बाजी गंबाजी होता त्यास कागद लिहिला होता कीं, दुष्ट स्वप्न वार्ता; इब्राइमखान देसाई याचा कांहीं संवाद आहे. पुढें काळ कला प्रसंग पडेल ऐसें दिसतें. इतके दिवस बोलिलों नव्हतों. सांप्रत बोलावेंसारिखें जाहलें. याकरितां मदनाजी काकाजी याचें पत्र घेणें कीं, तुह्मांसी आह्मांसी अर्थाअर्थीं संबंध नाहीं. आपण कोपरवलीचा कुळकर्णी हें खरें. जो वाद सांगत असेल तो व तुह्मी जाणा. आपणांस देशकुळकर्णाचा तालुका नाहीं, ऐसा कागद लिहिला होता तोच बजिन्नस सांपडला. तो पंचाईतास दाखविला. त्यावरून दत्ताजी गंबाजी खोटा जाहला. आपले बाप नारो रघुनाथ यासी दरोबस्त देशकुळकर्णाचा महजर करून दिल्हा. तो महजर आपणापाशीं असतां, देवजी दत्ताजी व गणेश दत्ताजी यांचा बाप दत्ताजी गंबाजी व चुलता बाजी गंबाजी हे दोघे भाऊ राजश्री कान्होजी आंगरे सरखेल होते त्याजकडे कुलाबियास गेले. तेव्हां आपला बाप नारो रघुनाथ कल्याणचा महजर घेऊन जाऊन सरखेल मशारनिल्हेस दाखविला. तो महजर पाहून पंचाईतावर इनसाफ सोंपविला. परगणे मजकूरचे देशक नेऊन तकरिरा मनास आणिल्या. त्यास आपले बाप नारो रघुनाथ याहीं सांगितलें कीं, वादीयाचे वडील, आपले वडिलानीं गुमास्ते ठेविले असतां, त्यांचे खून करून वतन चालवूं लागले. त्याची साक्ष मनास आणितां, अंताजी अंकुशराव देसाई परगणे मजकूर व वरकड वतनदार होते त्यांजवर सत्य घालून साक्षी पुसों लागले. तेव्हां देसाई मजकुरानें साक्ष दिल्ही जे, नार प्रभू वतनदार खरा. याच्या वडिलानीं दत्ताजी प्रभूच्या वडिलास गुमास्तगिरी सांगितली होती. त्यास आपल्या वडिलानीं दत्ताजी प्रभूच्या वडिलाचा प्रतिपक्ष धरून नार प्रभूच्या वडिलाचे खून केले. वाशीकर मोकदमीण नार प्रभूच्या वडिलाचे मायेंत होती. ह्मणून तिचे पाठीकडून काळीज काढून मारिली. तिचे दोघे मूल मारिले. आणि दत्ताजी प्रभूचा वडील केशव प्रभू गुमास्ता ठेविला होता त्याची वतनावर स्थापना केली, हें खरें. तैसेंच वाशीकर मोकदम बावाखान यानें साक्ष दिल्ही कीं, नार प्रभू वतनदार खरा. याच्या वडिलानिमित्य आपली पूर्वजीण देशमुखानीं मारिली. तिचे दोघे लेंक मारिले हें खरें. त्यावरी वेठ प्रभू कुळकर्णी मौजे उंबरडे व विठ्ठल भाव प्रभू बाळाजी गंभीरराव अदकारी तपे छतिसी परगणे मजकूर यानींही साक्ष दिली कीं, वतन नारो रघुनाथ याचें खरें. दत्ताजी व बाजी प्रभू यांच्या वडिलानीं यांचे खून करून वतनाचा उपभोग करितात. याप्रमाणें साक्षी पुरल्यावरी पंचाईतांनीं सदरहू करिना राजश्री सरखेल मशारनिल्हेस दाखल केला. त्यावरून त्याहीं आपणांसमक्ष सर्वांस नेऊन, साक्ष मोझे मनास आणिले; आणि वतन नार प्रभूचें खरें, दत्ताजी प्रभू व बाजी प्रभू यांस वतनासीं संबंध नाहीं ऐसें बोलले. तो विसोबा नाईक व रंगोबा नाईक पैठणकर हे पंचाईतींत होते, परंतु ते समयीं रदबदल करूं लागले कीं, दत्ताजी गंबाजी व बाजी गंबाजी यांचा भोगवटा जाहला आहे;

NATIONAL ARCHIVES OF INDIA

याकरितां निमेनिमप्रमाणें वतन दोघांस देऊन समजाविस करावी. आपणापाशीं न्याय जाहला, त्याचा कजिया मागती दुसरीकडे न जाये ऐसें करावें ह्मणून बोलिले. ते गोष्टी राजश्री सरखेल मशारनिल्हेनें ऐकोन आपले बाप नारो रघुनाथ यास सांगितलें कीं, निमें वतन तुह्मी घ्या, निमें वतन दत्ताजी प्रभू व बाजी प्रभू यांस देतों. त्यास आपल्या बापानीं उत्तर केलें कीं, आपलें दरोबस्त वतन असतां निमें काय ह्मणोन घ्यावें ? तेव्हां राजश्री सरखेल याचा निकर्ष दिसून आला. ते समयीं आपले बाप नार प्रभू यानीं चित्तांत विचार केला जे, ज्याचे सत्तेमध्यें आपलें वतन त्याचें न ऐकतां परिणाम बरा नाहीं. ऐसें चित्तांत आणोन निमें वतन कबूल केलें. त्यावरून राजश्री सरखेल मशारनिल्हेनीं निमे वतनाचा गोत महजर आपल्या शिक्क्यानिशीं करून दिल्हा. त्याजप्रमाणें आपले बाप वतनचा उपभोग करूं लागले. दत्ताजी गंबाजी व बाजी गंबाजी यांस निमे वतनाची सनद करून देत होते ते त्यांनीं घेतली नाहीं. त्याउपरी दत्ताजी प्रभू व बाजी प्रभू मृत्य पावले. उपरांतिक दत्ताजी प्रभूचे पुत्र देवजी दत्ताजी व गणेश दत्ताजी हे, राजश्री बाजीराव पंडित प्रधान होते याजपाशीं फिर्याद झाले. त्यावरून त्याहीं आपले बाप नारो रघुनाथ यासीं तलब करून नेले. व साक्ष मोझ्याबद्दल परगणे मजकूरचे देशक नेऊन दोन चार मज्यालसी केल्या. ते समयींही कल्याणच्या व राजश्री सरखेल मशारनिल्हे याच्या महजराप्रमाणें साक्षी पुरल्या. परंतु मखलाशी होऊन निवाडा जाहला नाहीं, तोंच आपले बाप नारो रघुनाथ मृत्य पावले. उपरांतिक पंडित मशारनिल्हेनीं आपणांस नेऊन पुरशीस केली कीं, तुम्हीं वतनाचें भांडण भांडतां कीं नाहीं ? त्यास आपण उत्तर केलें जे, वतनाचा कजिया सोडीत नाहीं. बरहक्क इनसाफ रुबरू करावे; अगर पंचाईत नेमून द्यावी; त्यास आपण रजावंद आहों ह्मणून बोलिलों. त्यावरी मनसुफीची मखलाशी होणेंच आहे, तों पंडित मशारनिल्हे व राजश्री चिमणाजी पंडित यांसी देवाज्ञा जाहली. त्याजउपरी सन आर्बा आर्बैन मया व अलफ या सालीं राजश्री बाळाजी पंडित प्रधान या संनिध सातारियाचे मुक्कामीं आपले मनसुफीचा प्रसंग पडला. याजकरितां पंडित मशारनिल्हेनीं परगणे मजकूरचे देशक आणवून, आपले रुबरू साक्ष मोझे मनास आणून, आह्मां हरदू वादीयांस राजश्री सदाशिव पंडित यांजकडे पुण्यास रवाना केलें. आणि ते सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक करावयासी सांगितलें, त्याजवरून पुण्यास गेलों. तेथें आह्मां हरदू वादीयांची समजावीस करून विल्हे करावयाचा विचार पंडित मशारनिल्हेनीं केला. त्यास गणेश दत्ताजी म्हणों लागला जे, दरोबस्त वतन आपलें आहे. आपण समजाविशीस राजी नाहीं. त्याजवरून पंडित मशारनिल्हे त्यास बोलिले जे, दरोबस्त वतन आपलें ह्मणतोस, तरी दिव्य करिशील कीं काय ? तेव्हां गणेश दत्ताजी दिव्यास रजावंद जाहला. तेव्हां श्री वज्रजोगणी येथील स्थळ दिव्यास नेमून राजश्री त्रिंबक विनायक सुभेदार, प्रांत कल्याण यास दिव्य घ्यावयाविषयीं पत्रें देऊन रवाना केलें. तेथें कल्याणास हरदूवादे गेलों. त्यास सुभेदार मशारनिल्हेनीं आह्मां हरदू-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वादीयांस राजीनामे वर्तणुकेस जमान मागितले. त्यावरून राजीनामे लेहून देऊन वर्तणुकेस जामीन दिल्हे बितपशीलः—

गणेश दत्ताजी यांनीं गणेश निळकंठ देशकुळकर्णी तर्फ नागोठणें यासी जामीन दिले १.

आपण त्रिंबकराव बावाजी व लक्षुमणराव भिकाजी अधिकारी तर्फ हमरापूर यास जमान दिले १.

येणेंप्रमाणें जामीन दिल्हे. याउपरी गणेश दत्ताजीनें दिव्य करावयास जावें तों तेथील ब्राह्मणसभेच्या विचारें गणेश दत्ताजीचा भोगवटा होत आला आहे यास दिव्य बोललें नाहीं ऐसा निर्णय जाहला. तो सुभेदाराहीं व ब्राह्मण मंडळींनीं पत्रें लिहून पुण्यास पत्रें रवाना केलीं. तों राजश्री--पंतप्रधानही सातारियाहून पुणीयास गेले आणि सुभेदारास प्रत्योत्तर पाठविलें कीं, दिव्य तहकूब केलें. हरदू वादीयांसी माघारें पाठविणें. त्यावरून सुभेदाराहीं आह्मां वादीयांस पुण्यास जावयास सांगितलें. याजकरितां आपण श्रावणमासीं पंडित मशारनिल्हेसन्निध पुण्यास हाजीर जाहलों. तेथेंही सर्व सभेच्या मतें गणेश दत्ताजीनें दिव्य करावेंसें नाहीं. आह्मीं दिव्य करावें ऐसा इत्यर्थ जाहला. त्याजप्रमाणें आपण दिव्य करावयास रजावंद जाहलों. गणेश दत्ताजीही आमच्या दिव्यास रजावंद जाहला. त्याजवरून पंडित मशारनिल्हेनीं स्वारीमध्यें श्री गोदातीरीं दिव्य घ्यावयाचा करार केला. पंडित मशारनिल्हे स्वारीस चालिले तेव्हां आह्मीं हरदूजण वादे गोदातीरास समागमें गेलों. तेथें वर्तणुकेस जामीन कल्याणीं घेतले होते तेच करार करून, आह्मां हरदू वादीयांजवळून कतबे लेहून घेतले बितपशीलः—

गणेश दत्ताजीनें कतबा लेहून दिल्हा जे, पहिलेपासून वतन आपलें. आपले वडिलापासून आजितागाईत आठ पुरुष वतन खात आलों आहों. राघो नारायण याच्या वडिलाची गुमास्तगीर आपले वडिलांनीं केली नाहीं हें खरें आहे. त्यास राघो नारायण यांनीं दिव्य करावें. दिव्यास लागले तरी दरोबस्त वतन आपण खाऊं. दिव्यास खरे निघाले तरी दरोबस्त वतन त्यांनीं खावें. आपल्यास अर्थाअर्थीं संबंध नाहीं. येणेंप्रमाणें कतबा दिला १.

आपण कतबा लेहून दिल्हा कीं, पहिलें वतन गोळकाचें होतें, त्याजवळून आपल्या वडिलांनीं विकत घेतलें आणि गणेश दत्ताजी याच्या वडिलास गुमास्तगिरीस ठेविलें होतें. तेच बळाऊन मारे करून वतन अनभवूं लागले हे गोष्ट खरी आहे. आपण दिव्य करीन. दिव्यास लागलों तरी वतनासीं संबंध नाहीं. दरोबस्त वतन गणेश दत्ताजीनें खावें. दिव्यास खरा जाहलों तरी दरोबस्त वतन आपण खाऊं. गणेश दत्ताजी यास अर्थाअर्थीं संबंध नाहीं. येणेंप्रमाणें कतबा लेहून दिल्हा १.

येणेंप्रमाणें कतबे लेहून घेऊन कसबे कोपरगांव परगणे कुंभारी श्री गोदातीर येथें श्रीशुक्लेश्वर देवासन्निध दिव्य नेमून थोर थोर पंडित, शास्त्रज्ञ, उभय गंगातीरचे व कसबे मजकूरचे व राजश्री--पंत प्रधान यां समागमें होते, त्यांचे संमतें शास्त्रार्थ पाहून शके

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१६६६ रक्ताक्षीनाम संवत्सरे, पौष शुद्ध दशमी, बुधवारीं मज राघो नारायणाच्या हातास पिशव्या घालून दोन्ही हातावरी लाखोटे केले. दुसरे दिवशीं गुरुवारीं प्रातःकाळीं एकादशीस श्रीसंनिध गोदातीरीं पंडित मशारनिल्हे व ब्राह्मणमंडळी व मातबर लोक गोदातीर व कोंकण व बाजे प्रांतीचे वतनदार वगैरे यांसह बैसोन समस्ता हुजूर हातीच्या पिशव्या काढून हातावरी साली घालून दोनी हात घांसून धोवविले. आणि दोही हातांचीं चिन्हें लेहोन ठेवोन लोखंडाचा गोळा पंचाशत पळाचा, ह्मणजे वजन १६६॥२ एकशें साडेसाहासष्ट तोळे दोन मासे वजन करून, कोळशे यांत घालून, अग्नीमध्यें भाते लाऊन, त्रिवार तप्त करून, कपाळीं भाळपत्र बांधून, अश्वत्थाचीं सात पानें हातावरी ठेऊन, कच्चा सुतानें गुंडाळोन गोळा सांडसानें धरोन, मज राघो नारायणाच्या हातावर ठेऊन सात मंडळें चालोन जाऊन आठवे मंडळीं गोळा ठेवावयाची आज्ञा केली. त्याजप्रमाणें गोळा हातावर घेऊन, सात मंडळें चालून जाऊन आठवे मंडळीं गोळा ठेवावयाचें नियंत स्थळ केलें होतें तेथें ठेविला. तों नियंत स्थळकुंडांत कणीक अगोदर घातली होती ते जळों लागली. भुलोजी पाटील ढमढेरे तळेगांवकर याच्या हातीं सरमडाच्या पेंढ्या दिल्या होत्या त्या त्यांनीं गोळ्यावर टाकितांच सरमडाच्या पेंढ्यांनीं अग्नि घेऊन ज्वाळा निघों लागल्या. मग आपले दोनी हात सर्व सभा आदिकरून पंडित मशारनिल्हेनीं पाहिले व गणेश दत्ताजी यास दाखविले. तों हातास अणुमात्र अग्निस्पर्श जाहला नाहीं. उपरांतिक मागतीं दोही हातांस पिशव्या घालून लाखोटे केले. आणि दोन प्रहर दिवस व चार प्रहर रात्र ठेऊन दुसरे दिवशीं द्वादशीस शुक्रवारीं प्रातःकाळीं मजालसीस नेऊन हातीच्या पिशव्या काढून, सर्व सभा आदिकरून पंडित मशारनिल्हेनीं हात पाहिले. गणेश दत्ताजी यास दोनी हात दाखविले. तिळतुल्य ढक्का हातास लागला नाहीं. फोड, पुटकळी किंवापि हातास न आली. दिव्य करविलें ते समयीं हातांचीं चिन्हें लेहून ठेविलीं होतीं, त्याप्रमाणें हात रुजू पाहिले. पूर्व चिन्हास तिलप्राय अंतर पडलें नाहीं. येणेंप्रमाणें तप्त दिव्य मज राघो नारायणापासून घेतलें. श्रीनें व श्रीगंगेनें आम्हांस खरें करून आमचें वतन आम्हांस दिल्हें. त्यावरून राजश्री पंत प्रधान यानीं आपलीं पत्रें करून आपल्यास दिल्हीं आहेत. व देवजी दत्ताजी व गणेश दत्ताजी भांडत होते ते खोटे जाहले. त्यांनीं आपणास येजितखत लेहून दिल्हें आहे. हें महाराजाहीं मनास आणून परगणे मजकुरचें देशकूळकर्ण व गांवगन्नाचीं कुळकर्णे व टिपनिशी व गौळियाचें कुळकर्ण व पुरातन वतनें आपलीं आहेत त्याप्रमाणें पत्रें करून देऊन वतनें वंशपरंपरेनें चालविलीं पाहिजे. म्हणून विनंति करून राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांची राजश्री कानोजी आंगरे सरखेल होते त्यांनीं महजर करून दिल्हा आहे. तो व कल्याणीं मोगलाई अंमलदार होते त्याचा महजर व येजितखत आणून दाखविलें तें येजितखत बितपशीलः—

"येजितखत शके १६६६ रक्ताक्षीनाम संवत्सरे, पौष शुद्ध त्रयोदशी, शनवार ते दिवशीं राघो नारायण व खंडो नारायण देशपांडे परगणे साकसें ऊर्फ पेण यांसी देवजी दत्ताजी

72677

NATIONAL ARCHIVES OF INDIA

व गणेश दत्ताजी प्रभू सुरुसन खमस अर्बैन मया व अलफ सन हजार ११५४ कारणें येजितखत लेहोन दिल्हें ऐसेजे, तुमचा व आमचा परगणे मजकूरच्या देशपांडेपणाचा कजिया पूर्वी महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति स्वामींच्या कारकिर्दीस तुमचे वडील व आमचे वडील भांडले होते. तुमचे वडील ह्मणत होते कीं, पहिलें वतन गोळकाचें होतें त्यापासून आपल्या वडिलानीं विकत घेतलें, आणि गणेश दत्ताजी याचे वडील गुमास्तगिरीस ठेविले होते. तेच बळावून मारेचुरे करून बळें वतन खाऊं लागले; परंतु दरोबस्त वतन आपलें व आपले वडील म्हणत होते कीं दरोबस्त वतन आपलें आहे. आपण पिढी दरपिढी खात आलों आहों. भोगवटा आपला आहे. ये गोष्टीचें भांडण पडलें होतें. परंतु विल्हे लागलें नाहीं. त्यावर कल्याणचा सुभा, खान महंमद यासी होता. त्याचे नायब गुलाम मोहिद्दीन कल्याणीं राहत होते. त्यापाशीं तुमचे बाप व आमचे बाप भांडत गेले. तेथें जव्हारचे हमशाही वतनदार यांच्या रुबरू इनसाफ करून दरोबस्त वतनाचा महजर तुमच्या बापास करून दिधला. त्यावर राजश्री कानोजी आंगरे सरखेल यापाशीं आमचे बाप दत्ताजी प्रभू व चुलते बाजी प्रभू फिर्याद गेले. त्यावरून तुमचे बाप नार प्रभूहीं कल्याणचा महजर घेऊन सरखेलीपाशीं कुलाबियास आले. ते समयीं राजश्री सरखेल यानीं वतन दो जागां करून तुह्मांस निमें दिल्हें. त्याची सनद करून तुह्मांस दिधली. निमें वतन आह्मांस देत होते, परंतु आपले बापानीं कबूल केलें नाहीं. आपले बाप व चुलते मृत्य पावले. त्यावर आपण, श्रीमंत राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांजपाशीं उभे राहिलों. श्रीमंतांनीं तुमच्या बापास व तुम्हांस हुजूर आणून दोन चार मजालसी केल्या, परंतु विल्हे लागलें नाहीं. त्यावरी सालगुदस्तां श्रीमंत राजश्री बाळाजी बाजीराव पंडित प्रधान साहेबांपाशीं सातारीयाचे मुक्कामीं तुमची आमची मनसुबीचा प्रसंग पडिला. त्याजवरून परगणे मजकूरचे जमीदार व देशक कुल सातारीयास हुजूर आणून ग्वाही साक्ष मनास आणून उभयतांची समजाविस करावी ऐसा इत्यर्थ केला. त्यास आपण बोलिलों कीं, दरोबस्त वतन आपलें आहे; समजाविशीस आपण राजी नाहीं. त्यावरून श्रीमंतांनीं आपणांस आज्ञा केली कीं, दरोबस्त वतन तुझें आहे म्हणतोस, तरी तूं दिव्य करणें. त्यास आपण दिव्य करावयास रजावंद जाहलों. त्यावरून कल्याण सुभे यास पत्रें देऊन दिव्य करावयासी पाठविलें. तेथें दिव्याचे जमान आपण दिल्हे व तुह्मीं आमच्या दिव्यास राजी होऊन जमान दिल्हे. त्यास तेथील ब्राह्मणसभेच्या विचारें जाहलें कीं, गणेश दत्ताजीचा भोगवटा आहे, त्यास दिव्य बोलिलें नाहीं. ह्मणून ब्राह्मणांनीं व सुभेदारानीं श्रीमंतांस पत्रें पाठविलीं. व तुह्मीं व आह्मीं हुजूर आलों. हुजूरही सभेच्या विचारें जाहलें कीं, तुह्मांस भोगवटा नाहीं, तुह्मीं दिव्य करावें; व आपलेही चित्तास आलें कीं, तुह्मीं दिव्य करावें ह्मणून तुमच्या दिव्यास राजी जाहलों. व तुह्मीही दिव्य करावयासी राजी जाहलेस. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, स्वारीमध्यें श्रीगंगेच्या मुक्कामीं दिव्य घेतलें जाईल. त्यावरून श्रीमंतांसमागमें तुह्मी व आह्मी स्वारीबरोबर गोदातीरास आलों. तेथें तुह्मांपासून कतबा लिहून

NATIONAL ARCHIVES OF INDIA

घेतला. तुह्मीं कतबा लिहून दिधला. पहिलें वतन गोळकाचें होतें त्यापासून आपले वडिलांनीं विकत घेतलें. गणेश दत्ताजीचे वडील गुमास्तगिरीस ठेविले होते तेच बळावून मारे-चुरे करून वतन खाऊं लागले, ही गोष्ट खरी आहे. आपण दिव्य करीन. खरा जाहलों तरी दरोबस्त वतन खाईन. खोटा जाहलों तरी वतनासी संबंध नाहीं. दरोबस्त वतन गणेश दत्ताजीनें खावें. ऐसा कतबा तुम्हीं लेहून दिल्हा. व आपण कतबा लेहून दिधला कीं, पहिलेपासून दरोबस्त वतन आपलें. आपल्या वडिलापासून आजतागाईत आठ पुरुष वतन खात आलों आहों. राघो नारायण याचे वडिलाची गुमास्तगिरी आपले वडिलांनीं केली नाहीं, हें खरें आहे. त्यास राघो नारायण यानीं दिव्य करावें. दिव्यास खरे निघाले तरी दरोबस्त वतन त्यानीं खावें, आपल्यास संबंध नाहीं. दिव्यास लागले तरी दरोबस्त वतन आपण खावें, ह्मणून कतबा लेहून दिधला. त्यावरून श्रीमंतांनीं थोर शिष्ट ब्राह्मण पंडित शास्त्रज्ञ समागमे होते त्यांस व महास्थळ कसबे कोपरगांव परगणे कुंभारी व उभय गंगातीरीचे ब्राह्मण यांचे मतें धर्मशास्त्र पाहून, दिव्याचा निश्चय करून पौष्य शुद्ध दशमी, बुधवारीं तुमच्या दोही हातांस थैल्या घालून लाखोटे केले. त्यावरी दुसरे दिवशीं पौष शुद्ध एकादशी, गुरुवारीं प्रातःकाळीं कसबे कोपरगांवीं श्रीगंगतीरीं श्रीशुक्लेश्वरसंनिध ब्राह्मणसभा व श्रीमंत राजश्री पंतप्रधान व मातबर लोक गंगथडीचे व कोंकण प्रांतीचे वगैरे वतनदार यां हुजूर, हातीच्या पिशव्या काढून, हातास साली लावून धोवून, दोही हातांचीं चिन्हें लेहून घेतलीं आणि तप्त दिव्य लोखंडाचा गोळा शास्त्रप्रमाण पंच्याशतपळाचा, ह्मणजे, एकशें साडेसाहासष्ट तोळे, दोन मासे वजन करून, त्रिवार तप्त करून, तुमचे कपाळीं भाळपत्र बांधोन अश्वत्थाचीं सात पानें कच्चे सुतानें गुंडाळून तुमच्या हातावर ठेविलीं. आणि गोळा सांडसानें धरून त्यावरी ठेविला. तुह्मीं सात मंडळें ओलांडून आठव्या मंडळांत गोळा टाकिला तेथें अग्नीच्या ज्वाळा निघाल्या. त्यावरी तुह्मीं मजालसींत येऊन हात दाखविले. त्यास तुमच्या हातांस अणुमात्र कांहीं ढक्का लागला नाहीं. हें सर्व सभेनें व आपण पाहिलें. त्यावरी मागतीं दोही हातांस थैल्या घालोन, लाखोटे करून दोन प्रहर दिवस व चार प्रहर रात्र ठेविले. मग द्वादशी, शुक्रवारीं प्रातःकाळीं सदरेस आणून पिशव्या काढून मागतीं दोनी हात सभेनें व आपण पाहिले तों चोखट हात निघाले. तिळतुल्य ढक्का लागला नाहीं, व फोडही आला नाहीं. श्रीनें व गंगेनें तुह्मांस खरें करून तुमचें वतन तुह्मांस दिल्हें. आपण लायेणी भांडत होतों, ते खोटे जाहले. याउपरी देशपांडेपणाचें वतन परगणे मजकूरचें तुमचे तुह्मीं पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप असणें. आपल्यास अगर आपले वंशीचे भावाबंदांस अर्थाअर्थीं संबंध नाहीं. आपणापाशीं वतनी कागदपत्र होते, ते पूर्वी श्रीमंतांपाशीं कुळी दिधले आहेत. कदाचित् कांहीं राहिले असिले तरी ते रद्द असत. हें येजितपत्र लिहिलें सही तेरीख १२ जिल्हेज बिकलम."

येणेंप्रमाणें येजितखत व सदरहू पत्रें आणून दाखविलीं. त्यांजवरून मनास आणितां

महाराज राजश्री आबासाहेब यासन्निध राजश्री प्रल्हाद निराजी न्यायाधीश व पंडितराव होते, त्यांचे विद्यमानें वतन तुमचें खरें जाहलें. याचा दाखला, राजश्री कानोजी आंगरे सरखेल होते त्याचा महजर तुह्मांजवळ आहे. त्यामध्यें महादाजी गणेश तल्होजकर कुळकर्णी हे न्यायाधीश मशारनिल्हेजवळ ते वेळेस होते. त्यांनीं साक्ष दिल्ही त्याजवरून पुरला. उपरांतिक कल्याणीं मोगलाई अंमलदार होते त्यांनीं काजी व बाजे वतनदारांवर इनसाफ टाकिला. त्यांनीं साक्ष मोझे मनास आणिलें. याखेरीज गणेश दत्ताजीचा बाप दत्ताजी गंबाजी यानें आपला भाऊ बाजी गंबाजी यास मदनाजी काकाजी याचे हातचें पत्र, आपण कोपरवळीचे कुळकर्णी देशपांडेपणासी संबंध नाहीं ह्मणून, त्यापासून लेहून घेणें. दुष्ट स्वप्न पडिलें आहे; काळकला कळत नाहीं. ह्मणून संकेतपूर्वक पत्र लिहिलें होतें. तेंच बजिन्नस तुमचे बाप नारो रघुनाथ यासी सांपडलें. तें त्यांनीं पंचाईतास दाखविलें. त्यावरून दत्ताजी गंबाजी आपल्या हातच्या दस्ताऐवजानशीं खोटा जाहला. तुम्ही खरे जाहलेस. ऐसें असोन फिरोन राजश्री कानोजी आंगरे सरखेल होते त्यापाशीं फिर्याद जाहले. तेव्हां तुमचे बाप नारप्रभू यानीं कल्याणचा महजर नेऊन सरखेल मशारनिल्हेस दाखविला. त्यावरून त्यानीं तुमच्या वतनाची चौकशी पुरशीस करणें तैशी केली. एकदोन वेळां तेथें मनसुफीचा फड पडिला, तेंव्हांही तमाम वतनदारांचे साक्षीनें वतन तुमचें खरें जाहलें! गणेश दत्ताजीचे वडील गुमास्ते, त्यानीं तुमचे बडिलाचे खून देशमुख परगणे मजकूर याजकडून करविले. ते ग्वाही ज्यानीं खून केले त्याचेच वंशज अंताजी अंकुशराव देशमुख परगणे मजकूर यानीं दिल्ही. तैसेच वाशीकर मोकदमीण तुमच्या वतनाबद्दल मारिली होती ते साक्ष बावाखान मोकदम वाशीकर यानीं दिल्ही कीं, नारप्रभूच्या वतनाबद्दल आपली पूर्वजीण देशमुखाच्या वडिलानीं मारिली. तिचे दोघे लेंक मारिले. वरकड भोवर महालकरी यांनींही वतन नारप्रभूचें खरें ह्मणून साक्षी दिल्या. ऐशियास गणेश दत्ताजीचा भोगवटा होत आला. याजकरितां सरखेल मशारनिल्हेनीं तुमच्या बापास निमें वतन दिल्हें, आणि निमें गणेश दत्ताजीच्या बापास देत होते; तें त्यानें कबूल केलें नाहीं. खोटा असतां लायेणी (?) कजिया करीत होता. उपरांतिक मृत्य पावला. त्यामागें त्याचा लेंक गणेश दत्ताजी राजश्री बाजीराव पंडित प्रधान होते त्यांजपाशीं फिर्याद जाहला. त्यानींही दोन चार मजालसी करून साक्ष मोझे मनास आणिले; परंतु गणेश दत्ताजीचा मूळ वतनदारीचा दाखला पुरला नाहीं. गुमास्तगिरीचा दाखला पुरला. त्यास इनसाफाची मखलाशी झाली नाहीं, तों तुमचे बाप नारो रघुनाथ मृत्य पावले. उपरांतिक तुह्मांस पंडित मशारनिल्हेनीं नेऊन वतनाचा वाद सांगतां कीं काय ह्मणून पुशिलें. तुम्हीं वाद सांगावयासी रजावंद होऊन, वाद सांगो लागला. इनसाफ होणेंच आहे. तों पंडित मशारनिल्हेस व राजश्री चिमणाजी बल्लाळ यांसी देवाज्ञा झाली. उपरांतिक राजश्री बाळाजी पंडित प्रधान यानीं परगणे मजकूरचे देशक जमा करून आपले रुबरू साक्ष मोझे मनास आणिले. तेव्हांही मूळ

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वतन तुमचें खरें, गणेश दत्ताजी गुमास्ता, ऐसें जाहलें. त्यावरून पंडित मशारनिल्हेनीं राजश्री सदाशिव चिमणाजी यांजकडे तुम्हां हरदू वादीयांस पुण्यास रवाना केलें. ते तुम्हां हरदू वादीयांची समजावीस करीत होते. ते समयींही गणेश दत्ताजी समजावीस रजावंद जाहला नाहीं. दिव्य करावयास राजी जाहला. त्याजवरून श्री वज्रजोगिणीचें स्थळ दिव्यास नेमून देऊन कल्याणास पाठविलें. तेथें ब्राह्मणांच्या संमतें गणेश दत्ताजीचा भोगवटा जहाला. याजकरितां त्याजला दिव्य बोलिलें नाहीं ऐसें जाहलें. तो निर्णय त्यांहीं पंडित मशारनिल्हेस लेहून पाठविला. त्यावरून तुम्हां हरदू वादीयांस पंडित मशारनिल्हेनीं फिरोन आपणांजवळ नेलें; तेव्हां सर्वांचे मतें तुम्हीं दिव्य करावें ऐसा इत्यर्थ जाहला. त्याप्रमाणें तुम्ही दिव्यास रजावंद जाहलां. त्यावरून पंडित मशारनिल्हेनीं स्वारीस जातेसमयीं तुम्हां हरदू वादीयांस समागमें नेऊन, श्री गोदातीरीं कसबे कोपरगांव परगणे कुंभारी येथें श्रीशुक्लेश्वरसंनिध, उभय गंगातीरीचे व आपलेजवळील शास्त्रज्ञ ब्राह्मण यांचे विचारें धर्मशास्त्र विज्ञानें, स्वारीसंमतें पंचाशत पळें ह्मणजे वजन लोखंडी गोळा तोळे १६६॥= एकशें साडेसाहासष्ट तोळे, दोन मासे याचा, कोळसे अग्नि लावून, भातियानें फुंकोन, त्रिवार तप्त करून, तुज राघो नारायणाचे हात धुवून, चिन्हें लेहून ठेऊन, तुमचे कपाळीं भाळपत्र बांधून, तुमच्या हातावरी अश्वत्थाचीं सात पानें ठेवून, कच्चा सुतानें गुंडाळून, सदरहू तप्त गोळा सांडसानें धरून, तुज राघो नारायणाच्या हातावरी ठेऊन, सात मंडळें चालोन जाऊन आठवे मंडळीं गोळा ठेवावयासी सांगितलें. त्याजप्रमाणें तूं सात मंडळें चालोन जाऊन आठवे मंडळीं कुंड करून, कणीक घालून गोळा ठेवावयासी नियंत स्थळ केलें होतें तेथें ठेविला. तेव्हां कणीक जळों लागली. भुलोजी पाटील ढमढेरे तळेगांवकर यांनीं सरमाच्या पेंढ्या गोळ्यावर ठेविल्या. त्यांनीं अग्नि घेऊन अग्नीच्या ज्वाळा निघों लागल्या. याप्रमाणें शालिवान शके १६६६ रक्ताक्षीनाम संवत्सरे, पौष्य शुद्ध एकादशीस तुम्हांपासून तप्त दिव्य घेतलें. उपरांतिक तुमचे हात सर्व सभेनें व गणेश दत्ताजीनें पाहिले. अणुमात्र अग्निस्पर्श जाहला नाहीं. फिरोन तुमच्या दोही हातांस थैले घालून लाखोटे केले. दुसरे दिवशीं द्वादशीस समस्तांनीं व वादीयानें तुमचे हात पाहिले. पूर्वींचीं चिन्हें लेहून ठेविलीं होतीं. त्यांस तिळप्राय पालट जाहला नाहीं. शुद्ध खरे दिव्यास उतरलां. सत्यपूर्वक पुरातन वतन तुमचें होतें तें श्रीनें तुह्मांस खरें करून दिल्हें. गणेश दत्ताजी लायेणी कजिया करीत होता. तो खोटा जाहला. त्यानें येजितखत तुह्मांस लेहून दिल्हें. याउपरी त्यास व त्याचे भाऊबंदांस वंशपरंपरेनें तुह्मांसी व तुमचे वंशपरंपरेसी वतनाचा कजिया करावयासी अर्थाअर्थीं संबंध नाहीं. तुह्मी दिव्यास खरे झालां, त्याप्रमाणें परगणे मजकूरचें देशपांडेपणाचें वतन दरोबस्त तुमचे तुह्मांस करार केलें असे. तरी सदरहू वतन व गांवगन्नाचीं कुळकर्णे व गौळियाचें कुळकर्ण व टिपनिशी पुरातनप्रमाणें आपले दुमाला करून घेऊन दंडकप्रमाणें वतनाची सेवा करून सदरहू वतनास हक रुसूम व इनामत, इसाफत गांव, बाग,

NATIONAL ARCHIVES OF INDIA

आंबराई, शेत, सिलोत्तर, घर, ठिकाण, मानपान, तश्रीफ, कानुकायदे, हक्क, लाजिमा, पुरातन असेल त्याप्रमाणें घेऊन तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतनें अनुभवून सुखरूप राहणें. या वतनसंबंधें तुमचे माथां शेरणी स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा कुलबाब, कुलकानु रुपये———करार केले. याचा वसूल निमे हुजूर व निमे जिल्हेकडे झाला असे जाणिजे. येविषयीं पत्रें:—

१ मुख्य वतनपत्र.
१ देशमुख अधिकारी परगणे मजकूर.
१ देशाधिकारी लेखक वर्तमान व भावी.
१ मोकदमानी व खोत पाटील व शेटे महाजन व रयान.
१ राजश्री प्रधानपंत.
१ राजश्री मानाजी आंगरे वजारतमाहा.

६

पत्र छ ३ जमादिलाखर सन समान आर्बैन, प्रभवनाम संवत्सरे.

निवाडपत्र ११.

कित्ता निवाडपत्र चिटणिशी छ २४ रबिलाखर, कसबा इंदापूर येथील महार व मांग यांस वृत्तीचें भांडण लागलें होतें. याबद्दल हुजरून यांसी पैठणच्या थळास पाठविलें. यासी गोदनाक व बहिरनाक महार यांनीं व ताननाक गोदनाक मांग यांनीं राजीनामे लिहून दिल्हे कीं, निर्बंधीं निवडेल त्यास आपण राजी असों. त्यावरून हाजीर मजालसी यानीं पंडितापासून निर्बंध काढवून निर्बंधीं पाहतां निघाले जे, पड पडेल ते महारांनीं न्यावी, आपली जीवनवृत्ती करावी. प्रेताचें वस्त्र व ८४ चार रुक्के घेणें ते महारांनीं घ्यावे व महालक्ष्मीची सुवाशीण व पेढीयाची घागर गांवासभोंवतीं फिरवावी हे वृत्ती महाराची आहे. भूमीपुत्र महार. त्यानें घागर पेढीयाची गांवाभोंवती फिरवावी. मांगास संबंध नाहीं. मांगानें नाडें कातडीयाची व तांती करून आपली उपजीविका चालवावी. ऐसे निर्बंधीं निर्वाह झाला. त्यानें प्रमाणें पैठणहून सडी आली. त्याप्रमाणें हल्लीं महार व मांग यांचा निवाडा करून दिल्हा असे. यांविषयीं पत्रें सदरहू पंचाईतीचा महजर व मौजे खडकी प्रांत— येथील निवाडपत्र आहे. त्याप्रमाणें सदरहू हरदोजण महार व मांग कसबे मजकूर याचा निवाडा करार केला असे.

अभयपत्र १२.

अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान तहा वाघोजी बिन हिरोजी येबिन गंगाजी पाटील भिसे, मौजे पानवाडी तर्फ निरथडी, प्रांत पुणें, सुरुसन सीत खमसैन मया अलफ. दिल्हें अभयपत्र ऐसेजें तुवां कसबे पुणें येथील मुक्कामीं हुजूर येऊन विदित केलें कीं, वाघोजी बिन हिरोजी येबिन येल्होजी पाटील

NATIONAL ARCHIVES OF INDIA

भिसा, मौजे मजकूर हा आपल्याशी कजिया करीत होता. कीं, तूं आपला हाड भाऊ नव्हेस. तुजला काळीमध्यें शेत नाहीं व पांढरीमध्यें घर नाहीं. आपण त्याजला म्हणत होतों कीं, वडील बूड धाकोजी भिसा, याची तक्षीम एक. त्याचा वंश लिंगोजी भिसा, मौजे दौंड, तर्फ पाटस, प्रांत मजकूर येथें हल्लीं नांदत आहे. त्याचे धाकटे बूड गणोजी भिसा, त्याचा वंश रामजी बिन फिरंगोजी व आपण, आम्हां धाकटे तिसरे बूड हरजी भिसा, त्याचा वंश तूं वाघोजी, ऐसें म्हणत होतों. परंतु तिघे एक जथी नव्हों. आडनांवचे भाऊ आहों. ऐसें भांडण भांडीत साहेबांकडे आलों. साहेबीं हरदोजणाचें वर्तमान मनास आणून, पंचाईत नेमिली. त्यास वाघोजीनें अर्ज केला कीं, आपण येथील पंचाईतीस राजी नाहीं. आह्मीं आपआपणांत, मौजे करंजे येथील थळास जाऊन समजतों. ते गोष्ट आपणही कबूल केली. तेव्हां साहेबीं थळ मजकुरास जावयाची आज्ञा दिल्ही. मग वाघोजी व आपण शके सोळाशें पंचाहत्तर, श्रीमुखनाम संवत्सरीं, आषाढ मासीं करंजापाशीं गेलों. गोतास वाघोजीनें व आपण हकिकत जाहीर केली. गोतानें वाघोजीपासून व आपल्यापासून तकरिरा घेऊन, वर्तणुकेस जमान घेतले; आणि पुसिलें कीं, तुह्मीं कोणे गोष्टीस राजी आहां. तेव्हां वाघोजी बोलिला कीं, आपण वातीचे क्रियेस रजावंद आहों. ते गोष्टीस आपणही रजावंद होऊन वाघोजीनें व आपण राजीनामे लिहून दिल्हे. तेव्हां गोतानें दिक्कत घेतली कीं, वातीचे क्रिया करणें तेव्हां सरकारचें पत्र पाहिजे. तेव्हां वाघोजी व आपण मागती साहेबांकडे पुणियाचे मुक्कामीं येऊन, हकिकत जाहीर करून, शिक्क्यानशीं सरकारचें ताकीद पत्र करंजेकरास, वातीची क्रिया करवावयासी घेऊन थळास गेलों. गोतास साहेबांचे पत्र दिल्हें. तों श्रावण मास गेला. भाद्रपद मासांत क्रिया करतां नये ह्मणून गोतानें सांगितलें. सांप्रत हरदोजण घरास गेलों. त्यावर सालगुदस्ता श्रावणमासीं दिवाण हुकूम घेऊन करंज्यास गेलों. मागती पंचाइतांनीं दिक्कत घेतली कीं, दिवाणचा अमीन पाहिजे. अमीन घेऊन येणें. त्याचे साक्षीनशीं निवाडा होईल. त्यावरून फिरोन साहेबापांशीं येऊन अमीन द्यावयासी अर्ज केला. साहेबीं, राजश्री बगाजी साबाजी कमाविसदार, कसबे सासवड, हे अमीन दिल्हे. त्यास घेऊन करंजीयासी गेलों. करंजेकर थळ नाईक यानीं भोवरगांवचे गोत जमा करून, हरदोजणांचे रजावंदीनें वातीची क्रिया श्रीसंनिध नेमिली. त्याप्रमाणें आपला पुतण्या भवानजी बिन रखमाजी यानें व वाघोजी भिसा यानें आपल्या बोलीप्रमाणें उच्चार करून, श्रीपाशीं चिठ्या लेहून ठेविल्या आणि विहिरींत उभयतांनीं आंघोळी करून, पांच पांच तोळे कणकेचे दिवे दोघांनीं दोन करून, दर दिवियासी अर्ध तोळाप्रमाणें तेल घालून, बरोबर श्रीपाशीं उभयतांनीं वाती लाविल्या. वाघोजीची वात अगोदर अवघें तेल जळालें विझाली. त्यावर आपला पुतण्या भवानजी याची वात तीनशें टाळी वाजत तोंवर होती. आपण खरें झालों. म्हणून गोतानें आपलें खरे वातीस फूल दिल्हें. आपल्या दिव्यांत तीन मासे तेल बाकी राहिलें. आपण म्हणत होतों ती गोष्ट

NATIONAL ARCHIVES OF INDIA

खरी झाली. वाघोजी म्हणत होता, ती गोष्ट लटकी झाली. त्याजवरून करंजेकर पुजारी यांनीं व गोतानें, आपल्यास थळपत्र करून दिल्हें. व वाघोजीनें आपलें येजितपत्र लेहून दिल्हें आहे, तें मनास आणून आपल्यास सरकारचें पत्र करून, दिल्हें पाहिजे म्हणून, त्याजवरून थळपत्र व येजितपत्र, मनास आणून अभयपत्र दिल्हें."

१३. न्यायाधिशीकडील बारनिशींतील उतारे वगैरे.

रवासुदगी न्यायाधिशीकडील, सुरुसन इहिदे सीतैन मया व अलफ. किरकोळी कागद.

वाद्यास बोलावणी केली, बरहुकूम सनदा. छ ३ जिल्काद रवाना छ ९ मिनहू. भवानजी व मायाजी जासूद जथे, बावाजी नाईक रवाना कोंकणांत कागदाचे लखोटे सुमार.

१ जंजिरे, रत्नागिरीस, मोराजी शिंदे यासी.
१ चिमणाजी माणकर, नामजाद अंजनवेल यास.

२

जोडी रोजमुरा सरकारांतून आदा वाद्याकडील आला नाहीं. दस्तक छ १० जिल्कादचें नदीपार करून देणें, ह्मणोन वाद्यांचें नांवनिशीचें फेरिस्त अलाहिदा आहे १.

सदाशिव गोसावी वरूडकर यांस पत्र, राजश्री शास्त्रीबावाचे नांवें कीं, तुह्मीं करार करून गेला कीं, खासा स्वारी पुण्यास दाखल जाहलीयावरी हाजीर होऊं. ऐसें असतां स्वारी येऊन दोन महिने जाहले. त्रिंबक गोसावी मागती फिर्याद जाहला आहे. याजकरितां पत्रदर्शनीं निघोन येणें. ढील केलीयास सरकारचा कसाला होईल म्हणोन, कृष्ण ब्राह्मण यांजबरोबर रवाना. छ ३० माहे जिल्कादी. पत्र १.

छ २७ जिल्कादी. रवानगी बरहुकूम पत्र, छ १७ मिनहू सिदू गंगाधर खेडकर यानें आपली सून जिवें मारिली त्याचे चौकशीबद्दल. पत्रें.

१ तसलमात तुकोजी लांडगे जासूद जथे बावाजी नाईक, राजश्री माधव विश्वनाथ यांस सातारा.

१ तसलमात राघोजी गवळी व राणोजी लांडगा जथे बावाजी नाईक, रवाना कल्याण.

१ बाजी शंकर सुभेदार कल्याण, सुनेचा बाप बदलापुरीं आहे, त्यास त्याचे स्त्रीसुद्धां रवाना करणें ह्मणोन.

३

मौजे आथूरणें व कळंब, परगणे इंदापूर, येथील शिवेचा कजिया आहे त्याबद्दल.

१ राजश्री देवराव मेघःशाम यांस पत्र कीं, मौजे आथूरणेकर व कळंबकर या दोन गांवीचे पाऊणशें वर्षांपलीकडील थळझाडे व कच्चे लागवणसुद्धां, पाटील, कुळकर्णी हुजूर रवाना करणें व परगणें मजकुरचे देशमुख, देशपांडे यांसी ताकीद करून, या दोहीं गांवचें व लासुरणें गांवचें एकूण तीन गांवचें थळझाडें

NATIONAL ARCHIVES OF INDIA

शिवेच्या कजियाचे कागदपत्र, जे असतील ते त्यांजपाशीं देऊन, रवाना करणें ह्मणोन. पत्र,

१ मौजे लासुरणें, परगणें मजकूर यांस आज्ञापत्र कीं, मौजे आथुरणी व कळंब या दोहीं गांवचे शिवधडेकरी तुह्मीं आहां व साक्षीदारही आहां, तरी मौजे मजकुरचें जुनें थळझाडें पाऊणशें वर्षांपलीकडील घेऊन येणें, ह्मणोन ताकीदपत्र,

२

सदरहू दोनीं पत्रें रवाना रसानगी छ २ माहे जिल्हेज जासूद आबजी जथे भिकाजी नाईक दोहीं वाद्यांकडून रुपये ६ साहा देऊन रवाना केले. पत्रें २.

पत्रांत

लाळ्ये यांनीं पुण्यांत येऊन, यजुर्वेदी ब्राह्मणासी दोन तीन शरीरसंबंध केले. तें वर्तमान सालगुदस्तां हुजूर कळलीयावर, चौकशी मनास आणितां, धोंडाजी बिन मुधाजी लाळ्या यानें गणेश कृष्ण सराफ माध्यान्दिन यासी आपली कन्या देऊन लग्न केलें? त्यास चार पांच वर्षें झालीयावर, धोंडाजी मजकूर लाळ्या ऐसें गणेश कृष्ण यासी कळलें. परंतु ते गोष्टी प्रगट न करतां स्त्रीचा अंगिकार करून राहिला. त्या लग्नास आठ दाहा वर्षें जाहलीं. त्यावरी सालगुदस्तां गोविंद बिन नरहर भालेराव व रघुनाथ बिन शंकराजी व टामाजी बिन जनार्दन तुरे, वस्ती मौजे गोलेगांव, परगणे दौलताबाज, श्रीधर बिन नागेश बारखावा, वस्ती मौजे देवळाणें, परगणे मजकूर, एकूण पांच असामी लाळ्ये यांनीं पुण्यास येऊन, पेशजी गणेश कृष्ण याजजवळ शरीरसंबंध केला. त्याचा दाखला दाखवून, रघू लाळ्या याची कन्या परशराम ब्राह्मण यजुर्वेदी, वस्ती पुणें यांस दिल्ही. व श्रीधर लाळ्याची बहीण, कोंडभट यजुर्वेदी ब्राह्मण, वस्ती विठ्ठलवाडी नजिक पुणें यांस दिल्ही. गणेश मजकुरानें, हे आमचे शरीरसंबंधीं ह्मणोन, खोटी साक्ष दिल्ही. त्या अन्वयावरून सदरहू लग्नें दोनीं जाहलीं. त्याउपरी आगांतुक ब्राह्मणाच्या मुखें, हे लाळ्ये गोळक ऐसें कळलें. त्यावरून अवघ्या सदरहू आसाम्या हुजूर आणून, शोध मनास आणितां, ब्राह्मणासी व यासी शरीरसंबंध होत नाहीं व अन्न व्यवहार होत नाहींत. हे गोळकसे दिसों लागले. यांनीं आपली जात लपवून, ब्राह्मणास मुली दिल्ह्या, हें अकर्म केलें. या अपराधाबद्दल, सदरहू अवघ्या लाळ्यांपासून, गुन्हेगारीचा खंड घेऊन, अटकेंत ठेविलें. आणि परशराम सराफ व कोंडभट यजुर्वेदी ब्राह्मण यांजपासून, राजदंड घेऊन, धर्मशास्त्रमतें प्रायश्चित्त देऊन, शुद्ध केलें. लाळ्याच्या मुली लाळ्याजवळ राहिल्या. याजकरितां गोविंद लाळ्या हा खाशा वाड्यास नमस्कारोक्त प्रदक्षिणा नित्य करूं लागला. त्यावरून मनास आणितां सदरहू लाळ्यांनीं विदित केलें कीं, पूर्वी आह्मीं उत्तम यजुर्वेदी ब्राह्मण होतों. त्यास मेघोराम यानीं वेरूळक्षेत्रीं कोटि होम केला, त्यास एकशें पंधरा वर्षें जाहलीं. त्या यज्ञांत, कृष्णाजी ब्राह्मण उपनाम लाळ्या यास आमंत्रण सांगितलें; परंतु तो न येतां, पूर्णाहुती

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जाहली. व ब्राह्मणाच्या पंक्ति एक दोन भोजन करून उठल्या. कृष्णाजी आला तो मागून, भोजन न करी रुसोन चालिला. तेव्हां समस्ता ब्राह्मणाहीं भोजनाचा आग्रह केला. परंतु कृष्णाजीनें ऐकिलें नाहीं. त्या हट्ट, निग्रहामुळें, समस्ता ब्राह्मणाहीं, कृष्णाजी लाळ्या व त्याजबरोबर जितके यज्ञमंडपांतून, गृहस्थ व भिक्षुक उठोन गेले तितक्यांस बहिष्कृत केलें. त्या दिवसापासून कृष्णाजी व आह्मीं, चाळीस पन्नास असामी उठोन गेले तितकियांस कृष्णाजीच्या समागमामुळें, अवघ्यांसच लाळे ऐसें अभिधान ठेऊन, ब्राह्मण्यास अपकार केला. परंतु आह्मीं गोळक नव्हे. अद्यापही वेरूळकर क्षेत्रस्थ ब्राह्मण, आमच्या घरीं येऊन, वेदोक्त कर्म चालावितात. आणि आपल्या हातें स्वयंपाक करून, भोजन करितात. आणि आह्मीं त्यांच्या घरास गेलीयास, आपंक्त पात्रें घालून, आमचा त्यांचा वाडपी एक, मागून वाढप एक धार एक पात्रानें होते. आह्मांत वेदाध्यायनी ब्राह्मण आहेत. त्यांचें तीर्थ व गंधही दाहा बारा वर्षांपलीकडे घेत होते. अलीकडे घेत नाहींत. याप्रकारें आचार चालतो. परंतु पूर्वी आह्मीं ब्राह्मण होतों. अलीकडे या अभिश्रापानें, घरें मोडत मोडत वीस पंचवीस राहिलीं. याकरितां गोत्रघटितामुळें, शरीर-संबंध करावयाचा विलाज, आपला आपल्यांत राहिला नाहीं. पुरुष लग्नाव्यतिरिक्त राहतात, परंतु मुली उपवरी जाहल्यावरी काय करावें! याजकरितां वेरूळचा पूर्वील दाखला मनास आणून, साहेबीं आमचा अपराध मुक्त करून, आमचा उद्धार करावा. ह्मणोन तपशिले विनंति केली. त्यावरून तुह्मांस हें पत्र सादर केलें असे; तरी याचीं घरें वेरूळ प्रांतीं सदरहू गांवीं आहेत, सर्व दाखला तेथें पुरेल, याजकरितां वेरूळचे शिष्ट ब्राह्मण व जमेदार वगैरे वृद्ध यांसी हे तपशिलवार सत्य सुकृत, त्यांचे माथां ठेऊन पुसावें. एकशें पंधरा वर्षांपलीकडे अन्न व्यवहार व शरीरसंबंध, ब्राह्मणासी व यासी कसे चालत होते व पहिले हे कोण? अलीकडे आरोप आला कीं काय? आरोप यावयासी कारण काय? व अलीकडे हा काळपावेतों ब्राह्मणाची व यांची चाल कसकशी होत आहे? ब्राम्हण किंवा गोळक किंवा कोण हा शोध पुर्ता करून, ठिकाण लावून देतील त्याप्रमाणें, पूर्वील संबंधाचाही शोध करून, तपशिलवार ते सांगतील त्याप्रमाणें, त्या क्षेत्रस्थांच्या हातें चौकशीनें लिहिलें घेऊन, वर्तमान हुजूर लिहून पाठविणें. मनास आणून आज्ञा करणें ती केली जाईल. ह्मणोन राजश्री नारो बाबाजी नामजाद, परगणे नेवासें वगैरे महाल यास पत्र. छ २६ जिल्काद बरहुकूम रवानगी. छ ५ जिल्हेज, शंकराजी बिन बाळोजी जासूद जथे भिकाजी नाईक, रोजमुरा परभारा लाळ्याकडून रुपये ६ देऊन, रवानगी केली १.

खंडोजी बिन सुलतानजी जासूद जथे चांगोजी नाईक यांस रोजमुरा आषाढ मास, माहे जिल्कादचा रोजमुरा. रुपये.

२॥॰ बहिरजी पांढरे याजकडून.
२॥॰ येसोजी व शहाजी बाबर याजकडून.

५॥॰

NATIONAL ARCHIVES OF INDIA

एकूण चिट्टी छ ३ माहे जिल्हेज, अधिक श्रावणमास, शुद्ध चतुर्थी, साक्षीदार पुळुंजेंचे पाटिलकीच्या कजियाच्या निवाडीयाबद्दल आणिले, त्याजवर रखवालीस सबब मशारनिल्हेकडून रोजमुरा देविला. ५॥ रुपये.

छ ८ माहे जिल्हेज, बहिरजी पांढरे याचा व येसाजी व शहाजी बाबर याचा, मौजे पुळुंज, येथील पाटिलकीच्या निवाड्याबद्दल साक्षीदार हुजूर आणविले, त्यापैकीं दया महार, मौजे मजकूर यास हगवण लागली, सबब औषधास रुपये ·।· पावला, खंडोजी जासूद याजजवळ देविला त्याच्या चिटच्या.

८ बहिरजी पांढरे.

८ येसाजी व शहाजी बाबर.

·।·

रघुनाथभट बिन द्वारकाभट, वस्ती कसबे पुणें याच्या घरीं, गोविंदा ब्राह्मण यानें चोरी केली. गोविंदा समागमें अभक्ष होता. त्याच्या संशयाबद्दल रघुनाथभट व त्याची स्त्री सोयराई व गोविंदा यास, राजश्री बाबुराव फडणीस यानीं आणून, चौकशी करितां अभक्ष गोविंदा जवळ होता. रघुनाथभट व त्याचे स्त्रीकडे दोष येविषयींचा नाहीं. म्हणून राजश्री बाबूराव यानीं रामकृष्ण चोपदार याजबरोबर सांगोन पाठविलें. त्याजवरून रघुनाथभट यांचे घरीं पूर्ववत प्रमाणें अन्न व्यवहारें करीत जाणें म्हणोन, शास्त्रीबावांचें नांवाचीं पत्रें.

१ मल्हार जोशी वेव्हारे व नाना लेंबे व सखु भणंग यास, छ ७ जिल्हेज.

१ शिव जोशी व समस्त वेव्हारे, उपाध्ये व महाजन, कसबे मजकूर यास, छ १३ जिल्हेज.

२

छ १२ जिल्हेज, बहिरजी पांढरे याचा व येसोजी व शहाजी बाबर याचा, मौजे पुळूंज येथील पाटिलकीच्या निवाडीयाबद्दल साक्षीदार दया महार आणविला, त्यास हगवण लागली सबब तो आपले सोयऱ्याचे घरीं मौजे————येथें जात आहे. त्यास औषधास रुपया १ एक देविला आहे. तरी कानोजी जासूद याचे गुजारतीनें रुपया १ एक देणें, म्हणोन चिट्टी तसलमात कानोजी. १.

श्री

यादी बार पत्रें न्यायाधिशीकडील सुरुसन इसन्ने सबैन मया अलफ. माहे सफर, वैशाख मास.

राजश्री पंतप्रतिनिधी किल्ले विशाळगड यास, शास्त्रीबावाचें नांवें पत्र कीं, जिवभट व गंगाधरभट आठल्ये याचा व बाळभट आठल्याचा, मौजे शिपोशी, तर्फ देवळें, येथील इनामाचे विभागाचा कजिया लागोन, मनसुबी सरकारांत पडली आहे. त्यास येविषयींची मनसुफी पेशजी आपणाकडे पडली होती. तेव्हां हरदो वाद्यांचे अस्सल कागद पत्र आपण

NATIONAL ARCHIVES OF INDIA

घेतले आहेत ह्मणून, हरदो वाद्यांनीं सांगितलें. त्यावरून आपणास लिहिलें आहे. तरी याचे कागदपत्र अस्सल घेतले असतील त्याचें फेरिस्त घालून, आपले माणसाबरोबर सरकारांत पाठवून द्यावे. ह्मणून छ १ रोजचें पत्र १.

तसलमात जिवभट.

श्री

विनंती उपरी राजश्री भिकाजी राजे शिर्के व लक्ष्मणजी राजे शिर्के, या उभयतांचा कोंकणांतील वतनाचा कजिया आहे. त्याचा निवाडा पुण्यांत होत आहे. त्यास राजश्री रामशास्त्री यांचें पत्र आलें कीं, पेशजी कैलासवासी शाहूमहाराज यांचे वेळेस, कान्होजी शिर्के यानीं श्री कृष्णेचें दिव्य केलें. तेव्हां दिव्यास खरा, खोटा कोण जाहला तें व राजपत्रें करून दिल्हीं तीं, दप्तरीं बार असतील तीं लेहून काढून पाठवणें. तरी मजमूचे दप्तरीं बार असेल ते लेहून पाठवावें. रवाना छ २ जमादिलावल, सुरुसन इसन्ने समानीन मया व अलफ, हे विनंती.

श्रीगजानन.

स्वारी राजश्री बापुजी गणेश ताहा मोकदम, मौजे भाडळें, संमत कोरेगांव, प्रांत वाई, सुरुसन तिस्सा मयातैन व अलफ, राजश्री हैबतराव बिन नरसिंगराव राजे घोरपडे, मोकदम पाटील मौजे मजकूर हे, मौजे मजकूर येथील मोकदमीसंबंधें आपला मानपान, इनाम वगैरे घेऊन, गांवची वहिवाट करीत असतां, दरम्यान राजश्री बाळोजी व जनकोजी राजे घोरपडे, पाटील मौजे मजकूर यानीं श्री क्षेत्र काशीहून कलकत्ते येथील इंग्रजांचें पत्र व श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब यांचें पत्र, ऐसीं दोन पत्रें अजम कर्नल क्लोज् बहादुर यासी पुण्याचे मुक्कामास आणिलीं, त्याजवरून कर्नल यांनीं हैबतराव यासी बोलावणें केलें. त्याजवरून त्यांनीं आपले कनिष्ट बंधु, राजश्री कृष्णाजी राजे घोरपडे यांस पुण्यास पाठविलें. तेव्हां कर्नल यांनीं उभयतां वादी यांची मनसुभी, राजश्री खुशरजी शेट मोधी याजकडे सांगोन, आणखी पंच नेमून देऊन, पंचाईत करविली. त्यांत बाळोजी व जनकोजी खोटे जाहले. त्यांचे चिरंजीव बाबाजी व त्याचे बंधु सटवाजी व जोत्याजी व बहिरजी घोरपडे हे पळोन गेले. ये विषयी—कर्नल यानीं आम्हांस लिहून, तुम्हीं पेशजी मनसुबी केली आणि हैबतराव यांस पत्रें करून दिल्हीं, त्याची चौकशी येथें केली. त्यास तुमच्या व आमच्या करण्यास ताळा पडोन, हैबतराव खरे ठरोन, बाळोजी व जनकोजी वगैरे वाघे खोटे पडले म्हणून, त्याजवरून हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी हैबतराव घोरपडे हे मोकदमीसंबंधें, मौजे मजकूर येथील मोकदमी पाटिलकीची वडील पेशजीपासून वहिवाट यांची आहे. त्याप्रमाणें हे आपला मानपान, कुलबाब, कुलकानू सदरहू वतनसंबंधें घेऊन, कामकाज करितील व प्राचीन इनाम, पांढरीचा मळा बिघे ८३ तीन व चावर पैकीं बिघे ८७ सात, एकूण दाहा बिघे आहे. येविषयीं पेशजी नारायणजी घोरपडे यानीं सरकारांत गैर-

वाका समजावून सनद करून घेतली होती. ती जमीन इनाम हैबतराव यांची आहे. ती वगैरे शेत, मळे व घुगरी व कानु, कायदे यांचे हे वंशपरंपरेनें उपभोग करितील. तुम्हीं तेथील सर्व वतनदार व याचे बिरादर भाऊबंद, आपलाला हिस्सा भाऊपण्याचा घेऊन, याज खाले वर्तत जाणें. जाणिजे. छ. १ सवाल.

श्री

श्रीमत् क्षत्रिय कुलवतंस महाराज राजश्री———छत्रपती स्वामीचे शेवेशी.

विनंती सेवक बाजिराव बल्लाळ प्रधान, कृतानेक विज्ञापना सेवकाचें वर्तमान तारीख छ २४ सफर पावेतों स्वामींचे कृपादृष्टिकरून यथास्थित असे विनंती. पुरंदरे व अत्रे यांचा कर्यात सासवड येथील देशकुळकर्णाचा व कसबे मजकुरच्या कुळकर्णाचा कजिया होता, त्यास महाराजांनीं कुल गांवचे देशमुख व पाटील व बारा बलुते यांस हुजूर नेऊन क्रिया घालून पुशिलें कीं, वतनदार खरे कोण ? त्यास समाकुळ पांढरीनें साक्ष पुरंदरे यांची दिल्ही. त्यास क्रिया गांवकरी यानीं केली. ते समयीं दशरात्र पंचरात्र नेमिली, तव्हां गांवकरी यांनीं स्वामीजवळ बोली सोडविली कीं, मावजी नाईक देशमुख व मल्हार तुकदेऊ पुरंदरे यांची स्त्री दोघें दुखणियास पडली आहेत. तीं मेली तरी आपणास क्रिया नाहीं. याखेरीज कोणाचे घरीं कांहीं दगा जाहला तरी (तो) खरा; ऐशी बोली केली होती. त्यास मावजी नाईक देशमुख जाया जाहला होता. तो मृत्य पावला. आणखी कोणाचें घरीं कांहीं दगा झाला नाहीं. विदित जाहलें पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

१४. वृत्तिपत्र.

सिद्धेश्वरभट बिन शिवभट धर्माधिकारी, क्षेत्र प्रवरा संगम, यास वृत्तीस पत्र दिल्हें ऐसेजें, भवानीशंकर बिन सिद्धेश्वरभट इबिन हरभट यानें हुजूर येऊन विदित केलें कीं, सिद्धेश्वरभट बिन हरभट धर्माधिकारी, क्षेत्र प्रवरा संगम, यास पुत्र संतान नाहीं. ते मृत्य पावले. त्याउपर त्याची स्त्री येसुबाई होती. तिनें आपण, तिचे लेकीचा पुत्र दोहित्र होतो तो, दत्तविध करून, आपला पुत्र केला. आपला व्रतबंध, विवाह, शांडिल्य गोत्रीं केला. आपण सिद्धेश्वरभट बिन हरभट याचे वृत्तीचा उपभोग करितों. त्यास सिद्धेश्वरभट बिन शिवभट धर्माधिकारी, क्षेत्र प्रवरा संगम, हे आपणास ह्मणतात कीं, तुजला येसुबाईनें दत्तविध करून पुत्र घेतला नाहीं. तुजला सिद्धेश्वरभट बिन हरभट याचे वृत्तीशीं संबंध नाहीं. ऐसें म्हणून, आपणासी व्यवहार सांगतात. तरी सिद्धेश्वरभट बिन शिवभट यांस आणून आपला इनसाफ केला पाहिजे, म्हणून विदित केलें. त्यावरून सिद्धेश्वरभट बिन शिवभट यांस हुजूर आणून, त्यास पुरशीस करितां त्यानीं विदित केलें. आपल्या विभागी सिद्धेश्वरभट बिन हरभट होता. त्यास पुत्र नाहीं. तो मृत्य पावला. त्याचे लेकीचा पुत्र भवानीशंकर आहे. तो म्हणतो कीं, आपणास सिद्धेश्वरभट बिन हरभट याची स्त्री येसुबाईनें दत्तविध करून पुत्र घेतले. आपला व्रतबंध, विवाह, शांडिल्य गोत्रीं केला, आणि तिनें आपल्या

NATIONAL ARCHIVES OF INDIA

विभागास अधिकारी केलें, ऐसें भवानीशंकर म्हणतो; परंतु आपणास हें ठावकें नाहीं. आपणास पुसोन घेतला नाहीं. आपले वंशीचा पुत्र घ्यावा, तोही पिता असतां घ्यावा. बायकोस लेकीचा पुत्र घ्यावयास संबंध काय ? तथापि ये गोष्टीचे गांवामध्यें कोणी साक्ष नाहीं. भवानीशंकर याचा आपला वेव्हार वीस पंचवीस वर्षें होत आला. त्याचे कागद-पत्र आपणाजवळ औरंगाबाजेचा महजर, व ठाणें नेवासें येथील महजर व भवानीशंकर याचा बाप, भास्कर नरहर यांचें पत्र कीं, आपण पुत्र येसुबाईस दिल्हा नाहीं. व्रतबंध आपण आपले गोत्रीं केला, ऐसें पत्र व भवानीशंकर याचें येजितपत्र ऐशीं चार पत्रें आहेत. तीं पाहून न्याय करावा म्हणून विनंती केली. त्यावरून भवानीशंकरास पुरशीस करितां त्यानें विदित केलें कीं, आपले साक्षी गांवीं आहेत, त्यांच्या सड्या आणवाव्या म्हणून. त्यावरून गांवास पत्रें पाठवून तेथून सड्या आणविल्या आणि तुम्हां उभयतांस श्री स्वामीमठ कोल्हापूर यांकडे न्यायास पाठविलें, कीं धर्मशास्त्रप्रमाणें निवाडा करावा त्यावरून त्यांनीं सड्या मनास आणितां सड्यावरून निर्वाह न होय ऐसें झालें. तेव्हां तुम्हीं मान्य झालेत कीं, भवानीशंकर याचे प्रतिपक्षी बाळुभट टोके, हे त्याचे निसबत आपणासी, वेव्हार सांगतात. यांनीं श्री कृष्णेमध्यें शिरोन क्रिया करावी कीं, आपणा देखत दत्तविध. होऊन, शांडिल्य गोत्रीं लाविला. ऐसें बोलोन क्रिया करावी, आपण मान्य आहों. ऐसें बोलिलेत. त्यावर बाळुभटाहीं मान्य केलें, परंतु श्री स्वामी यांनीं तो विचार मोडिला कीं, हे गोष्टी आपल्या स्थळास योग्य नाहीं. तुम्हीं उभयतांदी, भले ब्राह्मण, अग्नहोत्री आहां. तुमचे प्रतिष्ठेस क्रिया योग्य नव्हे. याउपर येसुबाईनें पुत्र घेतला तो तुम्हींच घेतला, ऐसें बोलोन आपण सांगों तें ऐकावें. ऐसें उभयतांसही मान्य करून, तुम्हां उभयतांस सिद्धेश्वर-भट बिन हरभट याचे वृत्तीचा विभाग करून दिल्हा. बितपशील बरहुकूम निवाडपत्र:—

सिद्धेश्वरभट बिन शिवभट यासी विभाग.

सिद्धेश्वर भट बिन हरभट याची वृत्ती आणे.

कुळपुरोहितकीचे यजमान निमेनिम कलम १.

८ मूळ वृत्ती

।· सखो बल्लाळ गोत्रज यांजबद्दल खरीदी केली वृत्ती.

।—

पैकीं निमे ८॥

बद्दल त्रिंबकभट ८।

खोडयाबद्दल दान घेतलें होतें घर तें दिल्हें

कलम १.

भवानीशंकर यास वाटा दिल्हा.

सिद्धेश्वरभट बिन हरभट याची वृत्ती आणे.

कुळपुरोहितकीचे यजमान निमेनिम कलम १.

८ मूळ वृत्ती

।· खरीदीबद्दल सखो बल्लाळ गोत्रज.

।—

पुरातन सिद्धेश्वरभट बिन हरभट याचें घर दिल्हें १.

पैकीं निमे भवानी शंकर ८॥.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

त्रिंबकभट बिन महादेवभट याची वृत्ती, त्याच्या बायका आहेत तों त्यांनीं खावी.

त्याजमाघारे सिद्धेश्वर भट बिन शिवभट यानीं निमे ८।. खावी. त्यामध्यें ८।. भवानीशंकर यास निमे द्यावी. त्यांचीं घरें दोन आहे(त) तीं सिद्धेश्वरभट बिन शिवभट यानीं घ्यावीं. भवानीशंकरास घरासी संबंध नाहीं कलम १. त्रिंबक भट बिन महादेवभट याचे यजमान निमेनिम १.

बरहुकूम ८।. त्रिंबक भट बिन महादेवभट याजबद्दल.

त्रिंबकभट बिन महादेव भट याचे घरासी संबंध नाहीं.

त्रिंबकभट बिन महादेवभट याचे यजमान निमेनिम कलम १.

येणेंप्रमाणें निवाडा करून, निवाडपत्र तुह्मांस करून दिल्हें. तें पत्र तुह्मीं आणून दाखविलें, त्यावरून हें पत्र तुह्मांस करून दिल्हें असे. तरी सदरहू निवाडपत्राप्रमाणें सिद्धेश्वरभट बिन हरभट याची वृत्ती निमे तुह्मीं अनुभवून सुखरूप राहणें. निमे भवानीशंकर अनभवील. याउपर तुह्मांस त्यास भांडावयास प्रयोजन नाहीं. ह्मणून सिद्धेश्वरभट बिन शिवभट धर्माधिकारी याचे नांवें सदरहूप्रमाणें लेहून दिल्हें, पत्र १.

एकूण एक पत्र देणें.

---

१५. महजर.

बारकिर्द छ. २६ रबिलाखर, सन तिसा.

महजर ब तारीख ५ माहे रबिलाखर, हजीर मजालसी ठाणें, परगणे कासेगांव, सरकार आसदनगर उर्फ आकलोज, सुभे दारूलजफर बिजापूर सुरुसन आर्बा तिसैन हजार १२०३ सन ३७ जलूसवाला.

बेहुजूर.

राजमुद्रा.
खंडेराव बळवंतराव
नायब फौजदार
परगणे मजकूर
शिक्का असे.

बहिरजी मुसळे
शिक्का असे.

दत्ताजी राजे जाधव साहेब मदार जमा सुभानजी राजे जहागीर कसबे मजकूर शिक्का असे.

नरसो श्रीनिवास रत्नखाना सरकार शिक्का असे.

रामजी गोविंद दिवाण मौजे तावसीचा जहागिरीबद्दल शिक्का असे.

गोविंद व दत्ताजी देशमुख परगणे मजकूर शिक्का असे.

संताजी पाटील मोकदम कसबे मजकूर निशाणी नांगर असे.

मल्हार रघुनाथ शेखदार खलास सेरफ व जहागीर तुकोजी जाधव देहाय परगणे मजकूर शिक्का असे.

शिक्का असे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

संताजी पाटील मोकदम मौजे तावसी निशाणी नांगर.
खंडशेट व सांतशेट म्हेतरी जुळाई कसबे मजकूर.

भिकाजी लालकुंभ तुकोजी गंगथडा महात पालिगोड.
भिक्या लिगाडे.

मलापा तेली म्हेतरे.
सुभानजी व मकाजी नाईक लोहकरे परगणा मजकूर.

निराजी नरसिंह देशपांडे परगणा मजकूर बिकलम.
बंदशेटी आज जाबती राचापा शेट्या कसबे मजकूर.
मलकोजी व मानाजी मोंशा रयान कसबे मजकूर.
मकाजी जोग माळी व संतु थेटक माळी कसबे मजकूर.
रेवाजी व जिवजी पोतदार कसबे व परगणा मजकूर.
सिदप्पा महाजन कसबे मजकूर.
मोकदमानी मौजे खरडी नांगर निशाण असे.

संताजी पाटील मोकदम मौजे रांजणी निशाणी नांगर.

सटवाजी चौगुला मौजे मथाडे निशाणी नांगर.

अंबाजी पाटील संगेवाडी निशाणी नांगर.

बाजी पाटील मोकदम शिंदेवाडी निशाणी नांगर.

शिदोजी पाटील मोकदम मौजे नखतगांव नांगर.

आप्पाजी पाटील एखलासपूर नांगर.

सखाजी पाटील मौजे शिरगांव नांगर.

आबाजी आनंत जोतिषी प्रांत कऱ्हाड.

सोनजी यशवंतराव पाटील मोकदम मौजे बाखरे निशाण नांगर.
बहिरजी पाटील मोकदम मौजे चिंचोली परगणा सांगोले नांगर.
जावजी पाटील मोकदम मौजे शिरढोण.

रामोजी संधानसिंह पाटील मौजे मांजरी नांगर.
आबाजी मेहतर.
दरजी निशाण कातर.

बाबाजी पाटील मोकदम मौजे सरकोळी निशाण नांगर.
रघोजी पाटील मोकदम मौजे आणवडी.

आमाजी व संताजी पाटील मौजे शिरबावी परगणा मजकूर नांगर.
मकाजी पाटील मोकदम मौजे टाकळी.

या विद्यमानें झाला महजर ऐसाजेः—क्षेत्र पंढरपुरचे बडवे व बेणारे या हरदोजणामध्यें श्री देवाची पालखी व पालखीचें उत्पन्न घोडे वगैरे वाहनेंबद्दल गर्गशा होता ह्मणून पेशजी दखणी मुदतीस शाहापूर पेठेस हरदोजणांचा निवाडा झाला, ते वक्तीं बरहक्क इनसाफमुळें बडवे खरे व बेणारे खोटे ह्मणून महजर करून दिल्हा होता. त्या बरहुकूम

बडवे मजकूर पालखी व पालखीचें उत्पन्न घोडे वगैरे वाहन भोगवटा खात आले असतां, हल्लीं राजश्री बहिरजी राजे पांढरे फौजदारसाहेब यांचे आमदानीमध्यें विसाजी देशमुख भोमकर यांची लेक नारो राघोजीची सून यांनीं वाचादत्ताचे घोडें आषाढ वद्य द्वितीयेस श्री देवास वाहिले. ते बडवे घेतां बेणारी यांनीं दूरहाई दिधली जे, पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें वगैरे वाहनें आपलीं असतां तूं कायबदल घेतोस ? म्हणून त्यावरून हरदोजण भांडत. ठाणे फौजदारसाहेबांचे कचेरीस फिर्याद झाले जे आपला निवाडा करणें. पेस्तर इनसाफ व्हावा. तों अगोदर महादभट बेणारा जाऊन बाळकृष्ण बेणारी यास हकिकत जाहीर करून बापुजी महादेव जहागीरदार क्षेत्र मजकूर व केशवराव वकील हुजूर कचेरी यास रदबदल करून सानीसीचे कागद फौजदारसाहेबांस व देशमुखास घेऊन आला जे, घोडें अमानत करून हरदोजणांची बुनियादी पाहून बरहक्क इनसाफ करणें. ज्यांचे होईल त्यास देणें म्हणून. त्यावरून फौजदारसाहेबीं देशकास बोलावून फर्माविलें कीं, बेणारी यांनीं हुजरून कागद आणिले आहेत, याबद्दल हजीर मजालसी बैसून घोडें अमानत करून हरदोजणांचा इनसाफ करावा म्हणून गोंदजी देशमुख परगणा मजकूर यांच्या घरीं घोडें अमानत ठेऊन बरहक्क निवाडा करावयाचा तह केला. हें वर्तमान पाहतां बडवीयानीं मनामध्यें दहशत धरिली जे, बेणारी यांनीं हुजरून कागद आणिले आहेत. जेव्हांचे तेव्हां इनसाफ बरहक्क होणार नाहीं. याबद्दल आपणही हुजूर जाऊन कागद आणावे म्हणून आपल्या आपल्यामध्यें तह करून जिवाजी बडवे व कोन्हेरी बडवे यांचा भाऊ कुसाव्वा बडवा हुजूर जाऊन बापुजी महादेव जाहागिरदार क्षेत्र मजकूर यास रदबदल करून कागद घेऊन आले जे, क्षेत्र मजकुरास जाऊन हरदोजणाचे बुनियादीचा शोध पाहोन ज्यांचे घोडे होतील त्यास देणें म्हणून. त्याजवरून हजीर मजालसी दिवाण व देशक बैसोन हरदोवादीयासी बोलावून आणून हकिकत पुसतां त्यांनीं तकरिरा दिधल्या बितपशीलः—

तकरीर कर्दे बनाम महादभट बेणार व समस्त बेणारे क्षेत्र पंढरपूर लिहून दिली तकरीर ऐसीजे, श्री पाडुरंग मूर्तीचे गरुडवाहन अनादिसिद्ध आपलें व त्याचें उत्पन्न आपलें आपण खातों. आणखी श्रीमूर्तीस भक्ती समर्पिलिया पदार्थांस विभागी वेगळाले आहेत. त्यामध्यें पालखी व घोडे वगैरे वाहनें आपलीं आपण घेत असतां बडवे म्हणतात कीं, आपलीं. हीं सदरहू त्यांचीं नव्हेत. आपलीं ऐसी रुजू करून देऊं. जरी नेदूं तरी गोताचे खोटे व दिवाणचे गुन्हेगार. केली तकरीर सही.

तकरीर कर्दे समस्त बडवी यानीं क्षेत्र पंढरपूर लेहून दिल्ही तकरीर ऐसीजे, सालबाद मातकदम पिढीदरपिढी पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें वगैरे वाहनें वडीलावडील खात आलों. दराम्यान बेणारे उभे ठाकोन खलेल केले जे, पालखी, पालखीचें उत्पन्न आपलें म्हणून हुजूर जाऊन फिर्याद केली. त्यावरून आपणास हुजरून तलब केली. आपण हुजूर

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जाऊन निवाडीयास उभे राहिलों. आपण व बेणारी यांनीं तकरिरा व राजीनामे दिल्हे जे' देशक व क्षेत्रीचे लोक व हक्क जवाहिरीचे, पाटील हे जे धर्मता सालाबाद भोगवटा पाहोन लिहितील, त्याप्रमाणें हरदोजण राजी त्यावरून सभानायक बैसून विचारणा करून कारकुनास व देशकास हुजरून लिहिले आलें जे, क्षेत्र मजकूरचे लोक व हक्क जवाहिरीचे लोक मेळवून त्याचे डोईवरी इमान शपथपूर्वक घालून ते जे आपले इमानें सांगतील ते हुजूर लेहून पाठवणें म्हणून. त्यावरून देशक व गांवीचे लोक व हक्क जवाहिरीचे पाटील बैसून पुसिलें ते जें बोलिले तें, हुजूर लेहून पाठविलें. त्यावरून हुजूर सभानायक बैसून मनास आणितां आपला भोगवटा खरा झाला. भोगवटा बेणारी यांस नाहीं. त्यावरून आपले वडील खरे करून पालखी व पालखीचें उत्पन्न आपलें दुमाला करून महजर करून दिल्हा. तो आजितागाईत पालखी व पालखीचें उत्पन्न खात आलों. हल्लीं घोडें आलें त्यास बेणारी यानें खलेल केले. तरी आपण सालाबाद पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें धेत आलों. बेणारी यांस संबंध नाहीं. केली तकरीर सही.

सदरहूप्रमाणें तकरिरा लेहून घेतल्या. मग हजीर मजालसी बोलिली जें, पेशजी निवाडे झाले आहेत ऐसी तकरीर केली आहे. तरी पेशजीचे महजर अगर बाजे कागद जे असतील ते तमाम दाखवणें म्हणून. त्यावरून हरदो वादीयांनीं पेशजी दखणी मुदतीस शहापूर पेठेस दोनदा निवाडे झाले होते त्या महजराच्या नकला आणून दाखविल्या. त्याची हकिकत मनास आणितां शाईदी क्षेत्रावरी आली. म्हणून हरदूजणास पुसिलें जे तुम्हीं निवाडीयास क्षेत्रीं राजी आहां कीं नाहीं म्हणून. त्यावरून बडवा बोलिला जैसा शेवकवर्ग देवाचे त्यांत बेणारी यांत समा आहेत. ते वेगळे करून समस्त क्षेत्रास राजी. बेणारा बोलिला जे आपणही ताटे थिटे आराध्ये वेगळे करून समस्त क्षेत्रास राजी. त्यावरून हजीर मजालसी बोलली जे, क्षेत्रास राजी ह्मणून राजीनामा देणें. मग क्षेत्रास जाऊन इनसाफ करितां हरदो वादीयांचे जो सेवेचा असेल तो वेगळा करून उरल्या लोकांस पुसोन इनसाफ करून ह्मणून. त्यावरून हरदोजण वादी राजी होऊन राजीनामे दिल्हे बितपशील.

राजीनामा बनाम महादभट व समस्त बेणारे क्षेत्र पंढरपूर लिहून दिल्हा राजीनामा ऐसाजे, आपणांमध्यें व बडवीयामध्यें श्री देवाचें वाहन पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें वगैरे वाहनाबद्दल गर्गशा लागला आहे. ह्मणून साहेबांपाशीं निवाडीयास उभे राहिलों. त्यास साहेबीं फर्माविलें कीं, निवाडीयास क्षेत्रास राजी किंवा नाहीं. तरी आपण क्षेत्र मजकूरचे समस्त लहान थोर ब्राह्मण जमा करून चंद्रभागेमध्यें आंघोळी करून श्री तुळसी डोईवर घेऊन आपलें सत्य सुकृतें वदतील आणि ज्याचे हाती घोडें देतील त्यानें घ्यावें. यास आपण राजी असोन व दिगर करणार नाहीं. जर नवदिगर करूं, तरी गोताचे खोटे व दिवाणचे गुन्हेगार. लेहून दिल्हा राजीनामा सही.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राजीनामा बनाम समस्त बडवी यांनीं क्षेत्र पंढरपूर लेहून दिल्हा राजीनामा ऐसाजे, आपणांमध्यें व बेणारे क्षेत्र मजकूर यामध्यें श्री देवाचें वाहन, पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें वगैरे वाहनाबद्दल गर्गशा लागला आहे. ह्मणून साहेबांपाशीं निवाडीयास उभें राहिलों. त्यास साहेबीं फर्माविलें कीं, क्षेत्र मजकुरच्या लोकांस निवाडीयास राजी किंवा नाहीं ह्मणून. तरी आपण क्षेत्रीचे समस्त लहान थोर जमा करून, श्री चंद्रभाग़ेची आंघोळी करून, श्री तुळसी डोईवरी घेऊन, ते जे आपल्या इमानें सांगतील त्यास आपण राजी. जे भोगवटा पाहोन सांगतील त्यास आपण राजी असो. नवदिगर करणार नाहीं. नवदिगर करूं तरी गोताचे खोटे दिवाणाचे गुन्हेगार. लेहून दिल्हा राजीनामा सही.

सदरहूप्रमाणें राजीनामे घेतले. मग दिवाण व देशक व कसबाचे मोकदम व समस्त लहान थोर जमा होऊन क्षेत्र पंढरपुरास गेले. तेथें कार्तिक वद्य एकादशीस देवाच्या राऊळामध्यें माधवानंदाचे मठीं बैसून क्षेत्रस्त लहान थोर जमा केले. त्यांमध्यें शेवकवर्ग ताटे, थिटे, आराध्ये निराळे काढून, तमाम तीर्थवासी ब्राह्मण व बकालांनीं व रयानी व बलुती यांनीं मेळवून त्यास हजीर मजालसी बोलली जे, बडवीयांत व बेणारीयांत पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें वगैरे वाहनेंबद्दल गर्गशा आहे; म्हणून हरदोजणा वादे निवाडीयास तुम्हांवरी राजी झाले आहेत कीं, तुह्मीं ब्राह्मण, तीर्थवासी. वृत्तीविशीं धर्मिष्ठ हां. पापांचा कंटाळा धरितां. सत्य वदून निवाडा कराल म्हणून. तरी तुम्हीं हरदोजणांनीं बुनियाद पाहोन पुरातन पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें वगैरे वाहनें कोणाचीं; भोगवटा कोणाचा चालत आला आहे या गोष्टींचा पुरा शोध घेऊन, श्री चंद्रभागेमध्यें आंघोळी करून, फुलकुंडांत उभे राहून, डोईवरी श्री देवाच्या तुळसी घेऊन आपल्या बेताळिसांचें सुकृतें सत्य वदणें. त्यावरून तीर्थवासी ब्राह्मण व बकाल व रयान व बलुते समस्त लहान थोर जमा होऊन, नवाजणांचा इलाखा वेगळा करून श्री देवाचे राऊळी सभामंडपी बैसून, हरदोजणाचे बुनियादीचा शोध घेतां पेशजीच्या निवाडीयाचा प्रसंग पडला. ह्मणून पेशजीच्या हरदोजणापासोन निवाडीयाचे महजर आणविलें. त्यास त्यांनीं महजराच्या नकला आणविल्या. त्या वाचून पाहोन तजवीज केली. मग समस्त लहान थोर राजी एक विचार करून, क्रिया करावयाचा तह करून, हजीर मजालसीस येऊन सांगितलें. मग हजीर मजालसी उठोन गरूडपारीं येऊन बैसून क्रिया करणार नेमिले बितपशीलः—

वैदिक ब्राह्मण ५.	बकालानी ३.
१ नरहरभट गोपीनंदन.	१ पुंडलीक गर्बा.
१ रामराज रूपलग.	१ जिवाजी महार.
१ पांडुरंग पाठक.	१ गोमाजी बारी.
१ दादभट पाठक.	३

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ तमणभट विध्वंस.

५

सराफजी ३.

१ अवजी नाईक पोतदार.
१ रायाजी व्यंकाजी.
१ साबाजी हब्बु.

३

रयानी ८.

१ होनाजी तेली मेहतर.
१ रायाजी सोनार.
१ शिदोजी घेवारी.
१ चौडाजी सोनार.
१ तुकोजी मेहतर माळी.
१ मकाजी माळी.
१ नारायण सोनार.
१ विठोजी मेढकरी.

८

बलुतीयानी ११.

१ माणकोजी सुतार.
१ शेटी कुंभार.
१ बहिरजी कुंभार.
१ जिवाजी शिंपी.
१ निंबाजी न्हावी.
१ शेटी चांभार.
१ भिकाजी सुतार.
१ विठोजी परीट.
१ भिकाजी कोळी.
१ भिकाजी न्हावी.
१ बापु चांभार.

११

एकूण सदरहू तीस मुकरार करून, श्री देवाचें तीर्थ डोईवरी घालून, गळा तुळशीचे दंड घालून, श्री देव स्मरोन हजीर मजालस बोलली जे, आपल्या बेताळीसांचें सुकृतें वदणें म्हणून. त्यावरून फुलकुंडामध्यें उभे होते, त्यांनीं एक विचार करून नरहरभट गोपीनंदन व माणकोजी सुतार वदले जे, घोडीयाचे बाबें बडवे व बेणारे कधीं भांडतां ऐकिले नाहींत. व पूर्वी श्री देवाची पालखी पाहिली, देऊळींच असे. त्यास बडवे संरक्षण करीत असत. पालखी घरास नेतां बेणारी यानें दुराई दिल्ही. चारी परवी मिळवून देवळांतून नेतां कांहीं दुराई देत नव्हते म्हणून वदले. मग हजीर मजालसीनें फुलकुंडामध्यें उभे होते, समस्तांस निराळें निराळें पुसिलें. ते अवघेही बोलिले जे, नरहरीभट गोपीनंदन व माण-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कोजी सुतार बोलिले तेंच सत्य म्हणून शाईदी दिल्ही. मग शाईदी पत्र करून हजीर मजालसी द्वादशीस उठोन ठाणीयास आले. मग तमाम दिवाण व देशक ठाणां हजीर मजालसी बैसून शाईदी पत्रावरून सभानायकांनीं विचार केला जे, पूर्वीं पालखी देऊळीं असतां बडवेच संरक्षण करीत होते. पालखी घरास नेतां बेणारी यानीं दुराई दिल्ही, तरी चारही परवे मिळवून पालखी देवळांतून नेत होते. तेव्हां बेणारा देत नव्हता. जें पूर्वीं पालखीचें उत्पन्न होत असे तें बडवेच घेत असत. त्यावरून विचारें पाहतां बेणारी यास पालखी व पालखीच्या उत्पन्नासीं काय संबंध आहे ? पालखी बडवी यांची. तेव्हां घोडें वगैरे वाहनें यामुळें बडवीयांचींच खरीं झालीं. त्याहीमध्यें बडवीयांचा भोगवटा कारकिर्द दर कारकिर्दी (त) पहिल्यापासून चालत आला आहे. त्याबद्दल धर्मता विचारमानें पाहतां, बेणारी यांस पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें वगैरे वाहनें यांसी कांहीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं. बडवे खरे. पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें वगैरे वाहनें बडवीयांचीच खरी. म्हणून हजीर मजालस बोललीं जे, याचा भोगवटा धर्मता पाहतां बडवे खरे आहेत. यांस महजर करून देणें म्हणून. त्यावरून बडवीयांस महजर करून दिल्हा असे. पालखी व पालखीचें उत्पन्न घोडें वगैरे वाहनें दुमाला केलीं असेत. बेणारी यांस लेंकराचे लेंकरीं संबंध नाहीं. गोपजी देशमुख यांचे घरीं घोडे अमानत होते, तें हजीर मजालसीनें आणून बडवीयांचे दुमाला केले असेत. पेशजीचे कागद पत्र बेणारी यापाशीं असतील ते रद्द असेत. हा निवाडा धर्मता झाला असे. लेंकराचे लेंकरीं बडवीयांनीं वतन खाऊन सुखें असावें. बडवे खरे, बेणारे खोटे झाले. महजर सही.

लिहिला महजर सही.

स्वहस्त बाळकृष्ण बिन नागेशभट बेणेराय व समस्त बेणेराय.

तारीख ५ माहे रबिलाखर.

गोही.

नरहरी गोपीनंदन १.	पांडुरंग पाठक १.
तमणभट विध्वंस १.	सामराज १.
आऊजी नाईक पोतदार १.	गोमाजी बोरी १.
रायाजी व्यंकाजी १.	दाद पाठक बोंबले १.
पुंडलीक गर्बे १.	नारायण पाठक बोंबले १.
नारायण सोनार १.	जिवाजी महार १.
तुकोजी माळी मेहतर १.	चोडाजी सोनार १.
होनाप्पा तेली महेतरी १.	माणकोजी सुतार १.
मकाजी माळी १.	भिकाजी कोळी १.
रायाजी सोनार १.	भिकाजी न्हावी १.
निंबाजी न्हावी १.	भिकाजी सुतार १.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

बापु चांभार १.
शेटी चांभार १.
विठोजी परीट १.
स्वस्त.
१ केसोजी मकर पुजारे.
१ मोरया पुजारे.
१ जिवाजी पुजारे.
१ अप्पाजी शिवदेव पुजारे.
१ डिंगर वासुदेवपंत संमत प्रमाणें.
१ वेंकु पांडुरंग परिचारक.
१ वेंकाजी रामाजी डिंगरे.
१ पांडुरंग हरीदास बिन गोविंद.
८

शेटी कुंभार १.
बहिरजी कुंभार १.
शिदोजी घेवारी १.
जिवाजी शिंपी १.
रायाजी सोमनाथ ताटे आसामी १.

जिवाजी विठल ताटे १.
स्वस्त विश्वनाथ पंडित पथकी आसामी १

वेंकाजी विठल दिवटे १..
त्रिंबक नरहरी दिवटे १.
हरीबा विठ्ठलदास १.
स्वस्त नारायण डांगे १.
मोरेश्वर भट थिटे १.

फेरिस्त कागद कजियाचे, बडवे व डांगे व बेणारी क्षेत्र वास्तव्य श्री पंढरपूर, येथील क्षत्रींचें श्री पाशींल कायदे यांचा कजिया आहे. त्याच्या करिना मनास आणावयाबद्दल त्रिवर्गाच्या तकरिरा व राजीनामे व क्षेत्रस्थ ब्राह्मण व बाराबलुते यांच्या तकरिरा क्षेत्र मजकूर मुक्कामीं घेतल्या असेत. सुरुसन सब्बा आर्बैन मया व अलफ वगैरे कागद वादी त्रिवर्ग वगैरे क्षेत्रवासी यांजपासून तकरिरा वगैरे कागद घेतले, इस्तकबील छ ४ जमादिलावल तागाइत छ. सुमार.

तपशील.

बडवे यांचे कागद सुमार.
शिवराम सखो बडवे यांचे कागद सुमार.
१ तकरीर.
१ राजीनामा.
१ यादी गोहीदारांची.
३

इस्तकबील छ ४ जमादिलावल.
तागाइत छ ५ जमादिलावल.
तकरिरा सुमार.

गरुडध्वज समस्त बेणारी यांचे कागद सुमार.
१ तकरीर बंद २.
— तकरीर.
१ यादी.
२

डांगे नारायणभट व समस्त डांगे यांचे कागद सुमार.
१ तकरीर.
१ यादी राजीनामा.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१ जिऊबा वलद खंडोबा पुजारी.
१ मल्हारभट वलद सरस्वतीभट डिंगरे.
१ भिकंभट वलद तुकदेवभट उत्पात व गोविंदभट वलद रघुनाथ.
१ नागेश वलद तोरापा परिचारक.
१ गोपाळराम व आप्पाजी हरदास.
१ निंबाजी वलद नागेशभट दिवटे.

१ लक्ष्मणाचार्य वलद रामाचार्य.
१ गोविंदभट वलद शामभट दिवटे.
१ शामभट वलद शेशभट टोणपे आगांकु.
१ पांडुरंग बिन नारायण गोसावी ताटे.
१ दादो नरहर ताटे व बाबु वेंकाजी थिटे व त्रंबक सामराज आराध्ये पाटील, कुलकर्णी, जोशी व धर्माधिकारी.
१ चक्रपाणी वलद शिवाजी विठलदास व प्रल्हाद वलद गोरोजी विठलदास.
१ राणोजी वलद उदाजी कोळी पुंडलिकाचा.
१ विठू वलद रायेशेट शेटे.
३ तकरिरा जमीदार.
२ देशमुख असामी २.
१ गोपजी बिन विठोजी ताटे.
१ खंडेराव ताटे.
२
१ निराजी आवजी देशपांडे.
३
तकरीर त्रिवर्गाची मिळून एकच असे.
२ लक्ष्मण नाईक तुरळकर व बापूजी नाईक कुपी व भगवंत नाईक निबासाडिकर. एकूण तकरीर १ आसामी २.
१ येसाजी बिन सिदोजी नाईक मठकरी.
२२

छ ६ जमादिलावल तकरीर सुमार ७ बाराबलुबतेः—
१ केशव वलद भिकाजी सुतार.

१ निंबाजी वलद खंडोजी कुंभार व दौडाजी वलद रखमाजी कुंभार आसामी २.
—तकरीर.

१ भिकु चांभार वलद बापोजी व गोदू कोम जनकोजी चांभार.
१ धोंडी न्हावी.
१ धोंडी महार.
१ आप्पाजी वलद सिदोजी.
१ गिरमाजी वलद वेंकाजी अनगळ पोतदार.
७

७ कित्ता आगांकु आसामी.
१ विठलभट वलद अनंतभट बोरगांवकर.
१ धोंडभट वलद महादेवभट दामोदर.
१ गोपाळभट बिन रामभट तारगांवकर
१ नारायणभट बिन रामभट तुरळकर
१ पांडुरंगाचार्य वलद रामाचार्य कौलगी.
१ यमाजी यशवंत रामदास.
१ सखभट बिन कामभट गोपीचंदन.
७

१४
कतबे २.
१ तुकाजी वलद बाळाजी पुजारी.
१ भिमभट उत्पात पुजारी रुक्मिणीचा.
२

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१६. यादी.

यादी क्षेत्र पंढरपूर येथील श्रीचें देवालयाचे किल्लीविषयीं डांग्ये यांचा व समस्त बडवे यांचा कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली. उभयतांच्या तकारिरा व पुरशिसांचीं उत्तरें घेऊन उभयतांचे रजावंदीचे साक्षीदार पुण्यास आणून श्री नागेश्वराचे देवालयीं कलमझाडच्याप्रमाणें पुरशिसा करून प्रथकाकारें सड्या लेहून घेतल्या. त्यावरून पंचाईत-मतें मनास आणितां बडवे पुरातन श्रीचे सेवाधारी साहाजण, त्यांत दिवट्याचे हिश्यांत डांग्या अलिकडे जडला. सेवाधारी यांस देवाचे सेवेचें काम सांगणें तें बडवे यांनीं सांगावें. देवास वस्त्रें अलंकार यात्रेकरू समर्पण करितील ते सर्व बडवे यांकडे. त्यांनीं संरक्षण करून श्रीस भोगवावयाचें ते भोगवीत जावें. वरकड देवाजवळ येईल तें बडव्यांनीं घ्यावें. पूजा निवेदन झालीयावर सेवाधारी यांनीं यजमानास मागावें. जें देतील तें साहावांटे सातांनीं वांटून घ्यावे. दिवट्याचे साहावे हिश्यांत निमे डांग्या व निमे दिवट्या. देवाचें भांडार वेगळें नाहीं. वस्तभाव बडवे यांचे घरीं रहात असत्ये. देवालयांची एकच किल्ली ते बडव्यांपाशीं पूर्वी-पासून आहे. पांढरे याचे अमलांत सेवाधारी यानीं सभापत्र करून किल्लीचे कजियास डांग्या उभा केला. तेव्हांपासून कजिया करितो. पूर्वी किल्लीविषयीं तुह्मांसी कधीं कजियाच नाहीं. यावरून पाहतां डांग्ये यास किल्लीविषयीं बडवे यांसी कजिया करावयास संबंध नाहीं. भांडण खोटें भांडले. बडवे खरे जाहले. सबब त्यांजकडे सरकारची हरकी ७००१ रुपये.

सात हजार एक. यासी हप्तेबंदी.
२००१ तूर्त.
२००० भाद्रपद शुद्ध प्रतिपदा.
१००० आश्विन शुद्ध प्रतिपदा.
२००० कार्तिकअखेर.

७००१

एकूण सात हजार एक रुपया बडवे यांकडे सरकारची हरकी करार केली. याची निशा करून घेऊन सदरहू चार हप्त्यांनीं साल मजकुरीं वसूल घ्यावा. येणेंप्रमाणें करार करावें.

संमत

छ २१ रजब सन ईहिदे समानीन, आषाढ मास, मुक्काम पुणें.

---

१७. महजरनामा.

महजरनामा बतेरीख छ २२ माहे जिल्काद सुरुसन तिसा अशरीन मया व अलफ बहुजूर हजीर मजालसी मुक्काम किल्ले सातारा.

राजश्री मुदगलभट पंडितराव.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

शिक्का.

राजश्री फत्तेसिंग भोंसले.

शिक्का.

सरकारकून.

राजश्री श्रीनिवास परशराम प्रतिनिधी.

शिक्का.

राजश्री बाळकृष्ण वासुदेव आमात्य.

राजश्री कान्होजी आंगरे सरखेल.

शिक्का.

राजश्री नारो प्रल्हाद छंदोगामात्य.

राजश्री नारो राम वांकनीस.

राजश्री गोविंद रायाजी.

राजश्री पंताजी शिवदेव.

राजश्री मोरो नरहरी बक्षी.

राजश्री खंडो बल्लाळ चिटणीस.

राजश्री बाळाजी विश्वनाथ प्रधान.

शिक्का.

राजश्री नारो शंकर सचीव.

राजश्री महादजी गदाधर डबीर.

राजश्री सखो विठ्ठल न्यायाधीश.

राजश्री यादव गोपाळ.

राजश्री होनाजी अनंत सेनाकर्ते.

राजश्री आनंदराव रघुनाथ.

राजश्री शंकराजी मल्हार.

शिक्का पारशी असे.

सरदार.

राजश्री खंडेराव दाभाडे सेनापती.

शिक्का.

राजश्री मुधोजी नाईक निंबाळकर.

शिक्का.

राजश्री मानसिंग मोरे.

राजश्री केरोजी पवार.

शिक्का.

राजश्री पिलाजी जाधव.

राजश्री धर्मोजी देवकांते.

राजश्री रुस्तुमराव जाधव.

राजश्री रघोजी कदम बांडे.

शिक्का.

शेखमिराजी.

मिया शादी.

राजश्री सुलतानजीराव निंबाळकर सरलष्कर.

शिक्का.

राजश्री शिदोजी निंबाळकर.

राजश्री कृष्णाजी प्रतापराव मोरे.

राजश्री देवजी सोमवंशी.

शिक्का.

राजश्री संताजी कदम.

शिक्का.

राजश्री मकाजी बटकराव.

शिक्का.

राजश्री काळोजी भोंसले.

राजश्री संताजी धायभर पारशी निशाणी आहे.

हुसेन बेगजी.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मिर अनुदी देशमुख शेवगांव.
मोहर आहे.
लालमहंमद नोकर अमीरल् उमराव.
पारशी मोहर असे.
हिरोजी सोनलकर हटकरराव, प्रांत फलटण.
राजश्री कान्होजी भोंसले सेनासाहेब सुभा.
शिक्का असे.

राजश्री त्रिंबकराव माणकेश्वर धायगुडे.
संताजी पांढरे शरीफन मुलूक.
शिक्का.
महमंद अदल.
मोहर.
इमामशा पटेल, मौजे आळास, परगणे मिरज.
मोहर असे.

गोत हामशाई

परगणे वांई—

राजश्री शाहूजी राजे भोंसले देशमुख, प्रांत मजकूर.
शिक्का देशमुखीचा.
चांदशेटी बिन गोपाळशेटी शेटचा, कसबे वाई.
तागडी.
संमत निंब.
रामोजी बिन गंगाजी पाटील साबळे, मौजे शिवथर, नांगर असे.

देशमुख व देशकुळकर्णी परगणे मजकूर.
मोरो जिवाजी व गिरमाजी झुंगो देशपांडे, परगणे मजकूर.

दत्ताजी पाटील व तुळाजी पाटील, कसबे रहिमतपूर, प्रांत वाई. नांगर असे.

या विद्यमानें स्वस्ती श्री शके १६४० विलंबीनाम संवत्सरें, अश्विन वद्य सप्तमी, इंदुवासरे, ते दिनीं राजश्री पिलाजीराव बिन गणोजीराव व देवजीराव बिन पिलाजीराव व गुणाजीराव बिन बहिरजीराव शिर्के सरदेशमुख, मामले रायरी व देशमुख मामले दाभोळ, पश्चमवादी यासी लिहून दिल्हा महजर ऐसाजे, सातारीयाचे मुक्कामीं, राजश्री———स्वामींचे शेवेसी तुमचे भाऊ, राजश्री कान्होजीराव व बहिरजीराव व कुवरजीराव बिन रामोजीराव व दौलतराव बिन कान्होजीराव शिर्के, अग्रवादी याहीं जाहीर केलें कीं, मामले रायेरी शिरकाण येथील सरदेशमुखीचें वतन आपलें आहे. आपण पुरातन खात आहों. व मामले दाभोळ, येथील देशमुखी मन्हामती वतन आपणासच आहे. या वतनासी राजश्री पिलाजीराव व देवजीराव व गुणाजीराव शिर्के विभागासाठीं आपणासीं भांडतात. तरी साहेबीं, त्यांची व आपली धर्मता मनसुबी गोतमुखें करून विल्हे लावली पाहिजे, ह्मणोन जाहीर केलें. त्याजवरून, महाराजसाहेबीं तुम्हांस व त्यांस रुबरू हुजूर बोलावून, करिना विचारून, गोतमुखें निवाडा होईल त्याप्रमाणें वर्तावें ये बाबे जमान मातबर देणें ह्मणून आज्ञा केली. मग तुम्हीं व त्यांनीं राजी होऊन, येणेंप्रमाणें जमान दिल्हे बितपशीलः—

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अग्रवादी कान्होजीराव व बहिरजीराव व कुवरजीराव बिन रामोजीराव व दौलतराव बिन कान्होजीराव शिर्के यांसी जमान, राजश्री फत्तेसिंग भोंसले, बरहुकूम जमान कदबा.

पश्चमवादी पिलाजीराव व देवजीराव व गुणाजीराव शिर्के यांसी जमान, काळोजी भोंसले मुकादम, कसबे फलटण, बरहुकूम जमान कदबा.

येणेंप्रमाणें हरदूजणांनीं जमान दिल्हे. मग पंचाईत गोतवारी शपथ गोहत्या व ब्राह्मणहत्या श्रीवाराणशींत केली. याची शपथ राजश्री साहेबीं घातली कीं, उभयतांची मनसुबी धर्मता करणें. त्यावरी गोतसभा बैसोन हरदूजणांस तकरिरा लिहून देणें ह्मणोन गोतनाईकांनीं आज्ञा केली. त्यावरोन येणेंप्रमाणें उभयतांनीं तकरिरा लिहून दिल्हा बितपशीलः—

बेशमी कान्होजीराव व बहिरजीराव व कुवरजीराव बिन रामोजीराव व दौलतराव बिन कान्होजीराव शिर्के अग्रवादी यांनीं तकरीर केली ऐसीजे, आपलें कदीम वतन सरदेशमुखीचें, मामले रायेरी शिरकाण येथील आहे. त्यास वडिलांनीं दलपतराव पाताणे प्रभू मुतालिकीस ठेविला होता तो, कितीका दिवसांनीं बळाऊन, आपण वतनदारच ह्मणवून बळेंच वतन खाऊं लागला. त्यास आपण वाद सांगोन टक्का खर्च पडला, तो पदरिचा देऊन, आपलें वतन सही करून प्रभूस दूर करून, आपण वतन खात आहों. राजश्री राजारामसाहेबीं, चंदीचे मुक्कामीं सरदेशमुखीचें वतन आपणासच खरें करून दिल्हें. त्यास तीस पस्तीस वर्षें जाहलीं. वतन आपण अनभवीत आहों. राजश्री गणोजीराव शिर्के आपले भाऊ खरे; परंतु त्याचा भोगवटा या वतनास नाहीं. व दाभोळचें देशमुखीचें वतन राजश्री राजारामसाहेबीं चंदीहून स्वार जाहले, ते समयीं राजश्री रामोजीराव शिर्के, आपले वडीलभाऊ व राजश्री गणोजीराव शिर्के यांसी नूतन मन्हामत केले. त्या वतनाचाही भोगवटा आपणच करीत आहों. त्यास दखलगिरी वतनांत दिल्ही नाहीं. या वतनास हक्क दरसदे एकोत्रा होता. तो आपणच खात आहों. त्यावर मातुश्री ताराबाईसाहेबांचे वेळेस, राजश्री परशराम पंडित यांनीं चिपळूण घेतलें, ते समयीं कष्ट, मेहनत आपण व रामोजीराव शिर्के यांनीं बहुत केली, ह्मणून हक्क दरसदे नूतन रुपये ४ चार व कदीम रुपया १एक होता, तो देखील पंचोत्रा हक्क करार करवून दिल्हा. ती सनद रामोजीराव शिर्के यांचे नांवें मन्हामत केली. पहिली सनद एकोऱ्याची उभयतांचें नांवें आहे. हीं दोन्हीं वतनें आपलीं, हें खरें करून गोही साक्षीनें देऊं. यासी अन्यथा झालें तरी गोताचे अन्यायी व दिवाणचे गुन्हेगार, ही तकरीर सही.

बेशमी पिलाजीराव बिन गणोजीराव व देवजीराव बिन पिलाजीराव व गुणाजीराव बिन बहिरजीराव शिर्के, पश्चमवादी यांनीं केली, तकरीर ऐसीजेः—मामले रायेरी शिरकाण, येथील सरदेशमुखीचें वतन, आपलें कदीम आहे. यासी रामोजीराव व दौलतराव शिर्के वडील ह्मणवितात. तरी आह्मां उभयतांसही, वडील आणखी आहेत. आपले उभय-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

तांची हकिकत, तरी दौलतराव याचे आजे तानाजीराव शिर्के 'वडील भाऊ, आपले बाप पिलाजी शिर्के धाकटे भाऊ. त्यास दौलतराव याचे वडिलीं वतनाची मेहनत केली. परंतु आपले भाऊ गणोजी शिर्के त्याची भीड राज्यांत दरबारीं होती. त्याच्या नांवावर यांनीं मेहनत केली, हें खरें. सारे शिरकाणचें वतन सर-देशमुखीपैकीं निमें आपले आहे व निमें दौलतराव याचें आहे. व दाभोळचें देशमुखीचें वतन, राजश्री राजारामसाहेबीं चंदीहून बाहेर निघतां, गणोजीराव शिर्के यांनीं, राजश्री———बरो-बर मेहनत करून, येलुरास राजश्रीस पोहोंचविलें. मग राजश्री—कृपाळू होऊन, गणोजीराव शिर्के यांस वतन मन्हामत दाभोळचें देशमुखी केलें. ती सनद गणोजीराव शिर्के याहीं दौल-तराव यापाशीं व रामोजीराव याजपाशीं दिल्ही आहे. तीच सनद बजिन्नस त्यांनीं आणून दाखवावी. दुसरीयानें सनद करून रामोजीराव शिर्के यांनीं घेतली. तें आपले नांव आधीं घालून, मग गणोजीराव शिर्के याचें नांव लिहून सनद घेतली ती सनद एकाचे हातें केली. ती प्रसंगानुसार हाजीर दाखवून देऊन, ते सांगतील त्यावरून कळेल. व चंदीमध्यें राजश्री राजारामसाहेबीं आपणासच खुद्द देशमुखीचें वतन मन्हामत केलें. तेव्हां मजालसीस येणेंप्रमाणें होते. हल्लीं ते मजालसीस येथें आहेत बितपशीलः—

राजश्री शंकराजी मल्हार १.	राजश्री आंबुराव १.
राजश्री मानसिंग मोरे १.	राजश्री खंडेराव दाभाडे १.
राजश्री खंडो बल्लाळ १.	राजश्री कृष्णाजीराव मोरे व प्रतापराव मोरे.

येणेंप्रमाणें आहेत. त्यास हकिकत दखल आहे. हें सत्य स्मरून सांगतील. त्यास आपण मान्य असों. दाभोळचें सारें वतन देशमुखीचें आपलें आहे. यासी अन्यथा जाहलीं-यानें आपण गोताचे अन्यायी व दिवाणचे गुन्हेगार, ही तकरीर सही.

येणेंप्रमाणें हरदूजणाच्या तकरिरा घेऊन, सभासदांनीं तकरिराचे अर्थ पाहतां, हे दोन्हीं वतनाचें भांडण दोघांस लागलें. दोघांचे मूळपुरुष एकच आहेत. परंतु कदीम वतन शिरकाण मामले रायेरी, तेथील मेहनत दौलतराव शिर्के अग्रवादी यांनीं आपलेंच आहे व दाभोळचाही आपणच भोगवटा संपादला, ह्मणवून तकरीर केली. व पश्चमवादी पिलाजी-राव शिर्के व देवजीराव शिर्के व गुणाजीराव शिर्के यांनीं तकरीर केली कीं, दाभोळचें वतन अजराम-हामत आपलें सारें आहे. व शिरकाण मामले रायेरी, त्या वतनाची मेहनत दौलतरावाचे वडिलीं केली.परंतु आपले बंधु गणोजीराव शिर्के त्याची भीड राज्यांत दरबारीं होती. त्याच्या नांवावरी अवघे वतनाचे साहित्य जाहलें. कदीम वतनांत आपलें निमें वतन रायरी मामलीयाचें ह्मणवून तकरीर केली. दोघांच्या तकरिरा बरवे रीतीनें, मजालसीस पसंत करून मग राजश्री—स्वामींनीं मनास आणून चंदीचे मुक्कामीं, राजश्री—राजारामसाहेबीं दाभोळचें देशमुखीचें वतन मन्हामत करितां, कोणासीं केलें ते प्रसंगीं येणेंप्रमाणें होतें. त्यांसीं शपथ श्रीवाराणशींत गोहत्या, ब्रह्महत्येचें पातक ऐसी शपथ घालून सत्य सांगणें ह्मणवून. येणेंप्रमाणें यांसीं विचारिलें. त्यांनीं साक्ष दिल्ही. बितपशीलः—

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राजश्री शंकराजी मल्हार १. राजश्री आंबुराव १. राजश्री मानसिंग मोरे १.
राजश्री खंडेराव दाभाडे १. राजश्री खंडो बल्लाळ राजश्री कृष्णाजी मोरे व प्रतापराव १.
चिटणीस १.

यांनीं साक्ष सांगतां, राजश्री खंडो बल्लाळ उभें राहून, राजश्री स्वामीचे शेवेसी विनंति केली कीं, शिर्के ह्याची साक्ष देतां भय वाटे. ते आपणादेखतच चंदीमध्यें जें जाहलें, तें सत्य सांगतां कोणासीं कैसें वाटेल. येविषयीं आपल्या जीवाचे धणी कोण आहे ? ऐसें बोलिल्यावरी राजश्री—स्वामीनीं त्यासीं आज्ञा केली कीं, तुमच्या जिवाचे धनी आपण आहां. ऐसें अभय राजश्री—चें जाहलें. मग खंडो बल्लाळ यांनीं साक्ष दिल्ही कीं, दाभोळचें वतन देशमुखीचें पूर्वी राजश्री राजारामसाहेबीं आपणांस दिल्हें होतें. मग चंदीचे मुक्कामीं ताम्रानीं चंदी सिकंदा जाहली. राजश्री स्वामीस कुटुंबासहवर्तमान बाहीर निघावें सारिखा प्रसंग जाहला. तांब्राचे मोर्चे चहूंकडे. ते वेळेस राजश्री गणोजीराव शिर्के तांब्रांकडे होते. त्यांनीं त्या संकटीं एकनिष्ठता धरून, श्रम सायास करून, राजश्री—चंदीहून बाहेर काढून, येलुरास नेऊन पोहचविलें. राजश्री—ची कृपा संपादून घेऊन, दाभोळचे देशमुखीचें वतन आपणास देणें म्हणवून, अर्ज करून मागितलें. त्याजवरी स्वामी कृपाळू होऊन, वतन त्यास द्यावें ऐसें मनांत आणून, आपणास राजश्रींनीं आज्ञा केली. तुम्हांस दुसरें वतन देऊन, तुमचें उर्जित करूं. हें वतन सोडून देणें, म्हणोन आज्ञा केली. मग आपण अर्ज केला कीं, आपलें वतन साहेबांचे पाय आहेत. ऐसा अर्ज करून, वतनाच्या सनदा आपल्या नांवाच्या होत्या त्या, राजश्रीपुढें ठेविल्या. त्या सनदा राजश्रींनीं दूर करून, राजश्री गणोजीराव शिर्के यांस देशमुखी अजरामन्हामत करून, दुमाला सनदा त्यांच्या नांवें करून दिल्ह्या. म्हणवून खंडो बल्लाळ यानीं साक्ष दिल्ही. मग राजश्री शंकराजी मल्हार व अवघे यांसी पृथकाकारें सदरहू जनांसी पुसिलें. त्यांनीं सांगितलें कीं, जे खंडोबानीं साक्ष दिल्ही, ते यथार्थ आहे. आपणासही याप्रमाणें ठाऊक आहे, म्हणवून साक्ष दिल्ही. याउपरी मनास आणितां, सभासदांच्या मतें विचार जाहला कीं, मामले रायेरी येथील सरदेशमुखीचें वतन, कदीम यांच्या वडिलाचें होतें. ते प्रभू पाताणा मुतालिक ठेविला होता तो बळावला. त्यासी दौलतरावाचे भावानीं वाद सांगोन सोडविलें. परंतु ती वडिलाची भाकरी एकानेंच खावी, भावास विभाग न द्यावा, असें उचित नव्हे. दाभोळचें वतन देशमुखीचें मन्हामत गणोजी शिर्के यासच झालें, तें त्यानीं खावें. तेथें भावास विभाग न द्यावा, हें विहित नव्हे. वतनाची पुस्तवानी करून, दाभोळेस भोगवटा दौलतराव शिर्के याच्या भावांनीं केला आहे. याउपरी दोन्हीं वतनें, दोघा भावांस वांटून द्यावीं. समजाविशीं करून दोघाचा कुसूर तोडावा. ऐसें समस्त गोतसभासदाचें मजालसीचें मनास आलें. त्याप्रमाणें हरदूजणा भावांस विचारिलें. मग हरदूजणांनीं राजी होऊन सांगितलें कीं, समस्त गोतगंगा वडील आहां. आम्हांस तुह्मीं विल्हेस लावाल त्याजप्रमाणें आपण वर्तणूक करूं. राजी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

होऊं. म्हणवून राजी होऊन, दोघांनीं मज्यालसीस गोताजवळ सांगितलें. मग येणेंप्रमाणें दोघांस दोन्हीं वतनाची वांटणी करून गोतानें दिल्ही. बितपशील.

मामले रायेरी शिरकाण, येथील सरदेशमुखी कदीम वतन आहे. तेथील वतनाचें उत्पन्न दोघांनीं बरोबरी निम्यानिम वाटोन खावें. येथील वडीलपण शिक्का व मानपान, तश्रीफ आधीं कान्होजीराव बिन रामोजीराव शिर्के यांनीं घ्यावें. त्याचे मागें मानपान, तश्रीफ पिलाजीराव बिन गणोजीराव शिर्के यानीं घ्यावी. वडीलपण येथील कान्होजीराव यासी दिल्हें. धाकटेंपण पिलाजीराव बिन गणोजीराव शिर्के यासी करार करून दिल्हें असे. येणेंप्रमाणें तह केला असे. याप्रमाणें येथील वतन दोघांनीं खाऊन, समानुगतीनें असावें. नवदिगर परस्पर करावयासी गरज नाहीं.

मामले दाभोळ येथील देशमुखी वतन अजरा मन्हामत गणोजीराव शिर्के यांचे नांवें आहे. या वतनाचें वडीलपण शिक्का, मानपान, तश्रीफा आधीं पिलाजीराव बिन गणोजीराव शिर्के यानीं घ्यावें. येथील वडीलपणा यास करार करून दिल्हा असे. याचे मागें कान्होजीराव बिन रामोजीराव शिर्के याणीं मानपान, तश्रीफ, घ्यावी. धाकुटपणें याणीं असावें. याजखेरीज वतनाचें उत्पन्न दोघांनीं दोन्हीं ठायीं बरोबर वांटून, निम्यानिम खाऊन असावें. येणेंप्रमाणें तह करून, दोघांचा कुसूर तोडिला असे. याप्रमाणें वतन दोघांनीं खाऊन, समानुगतीनें परस्परें असावें. नवदिगर करावयासी गरज नाहीं.

सदरीलप्रमाणें दोघांची समजाविस करून, दोन्हीं वतनें दोघांस सदरीलप्रमाणें दिल्हीं असेत. वडीलपणें ही दोन्हीं वतनाचीं दोघांस सदरील लिहिलेंप्रमाणें दिल्हीं. वरकड उत्पन्न दो वाटाचे दो ठायीं दोघांनीं निम्यानिम खाऊन, समाधानरूप असावें. या निवाडीयास परस्परें हिल्ला हरकत करील तो खोटा; गोताचा अन्यायी; दिवाणचा गुन्हेगार; त्यासी वतनासी संबंध नाहीं. सदरीलप्रमाणें वतनाचे विभाग करून, तुह्मांस महजर करून दिल्हा असे. याप्रमाणें तुह्मीं आपला विभाग दोन्हीं वतनाचा खाऊन, वंशपरंपरेनें सुखरूप असावें हा महजर. सही लेखन अलंकार मोर्तब असे.

---

१८. निवाडपत्र.

यादी भिकाजीराव बिन देवजीराजे शिर्के सरदेशमुख, मामले रायरी, याचे नांवें पत्र कीं, तुह्मीं हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन, विदित केलें कीं, मामले रायरी शिरकाण येथील सरदेशमुखी व सुभा दाभोळ, येथील देशमुखी या दोन्हीं वतनांचे विभागाविषयीं, लक्ष्मणराव बिन कन्होजी राजे शिर्के यांचा व आमचा कजिया लागोन साल तिगस्ता मनसुबी हुजूर पडली. ते समयीं उभयतांनीं आपलालें वर्तमान लिहून देऊन, साधकाचे कागदपत्र आणून दाखविले. त्यावरून हुजूर पंचाईतमतें मनास आणितां, मामले रायरी शिरकाण, येथील सरदेशमुखीचें वतन पुरातन वडिलांचें आहे. तेथील हक्क रुसूम व इसाफत गांव व इनाम जमिनी वगैरे सुदामत चालत असेल, त्याचा निमे विभाग वडीलपण लक्ष्मण

राजे शिर्के यांजकडे व निमे विभाग आह्मांकडे, याप्रमाणें निवाडा होऊन, सन इहिंदे समानीनचे सालीं आम्हांस निवाडपत्रें द्यावयाची यादी करार झाली. त्याप्रमाणें आम्हीं सरकारचीं पत्रें तयार केलीं. करारापमाणें सरकारचे नजरेचा ऐवज देणें, त्याचे भरण्याची तरतूद करून, पत्रावर शिक्के करून घ्यावे, तों इंग्रज बोरघांटावरी आला. पुण्यांत गडबड झाली, त्यामुळें देशीं ऐवजाची तरतूद न होय, सबब निवाड्याची यादी झाली, ती आम्हीं घेऊन, ऐवजाचे सोईकरितां नागपुरास गेलों. ही संधी पाहून, लक्ष्मणराव शिर्के यांनीं सरकारांत आठ हजार रुपये नजर कबूल करून, विनंति केली जे, पेशजी कैलासवासी शाहूमहाराज यांचे वेळेस, आपले पिते कान्होजी शिर्के यांनीं, सदरहू दोन्हीं वतनाचें वडीलपण शिक्का आपला आणून श्री कृष्णेचें दिव्य करून, दिव्यास पार पडले. देवजी शिर्के यांसीं वतनासी संबंध नाहीं. याप्रमाणें होऊन राजपत्रें झालीं होतीं तीं गळाठलीं. परंतु तुळाजी आंगरे सरखेल यांसीं, दाभोळचे देशमुखीविषयीं हातरोखा दिल्हा. त्यांत दिव्याचा दाखला लिहिला आहे, व सातारीयाचे दप्तरीं राजपत्रें बार असतील, तीं लिहून आणून शोध करावा. याप्रमाणें आपण म्हणत असतां, ध्यानास आणितां दिव्याचे पूर्वील राजपत्राचे अन्वयें भिकाजीराजे शिर्के यांसी निवाडीयाची यादी करून दिल्ही आहे. ते आणवून पुर्ती चौकशी करावी. याप्रमाणें निवेदन करून, नजरेचा ऐवज सरकारांत देऊन, सदरहू ऐवज व्याज सुद्धां फिटे तोंपर्यंत दरोबस्त वतन आपणांकडे चालावें. दरम्यान भिकाजीराजे शिर्के यांनीं कजिया करूं नये ऐसा करार करून घेऊन, सदरहू अन्वयें पत्रें घ्यावयाची यादी करून घेऊन, त्याप्रमाणें पत्रें तयार करविलीं. त्याजवर शिक्के व्हावे तों तेच सालीं पौष मासीं, आपण नजरेचे ऐवजानिशीं हाजर होऊन विनंति केली. त्याजवरून त्यांचे पत्रावर शिक्के व्हावयाचे राहिले. त्यास साहेबीं कृपाळू होऊन, तिगस्तांचे करारापमाणें हरकीचा ऐवज घेऊन, इनसाफ होऊन, निवाडपत्रें तयार झालीं आहेत त्याजवर शिक्के करून देऊन, निमें वतन आमचें आम्हांकडे चालतें करावें ह्मणून. व लक्ष्मणराव शिर्के यांचें बोलणें कीं, कैलासवासी शाहूमहाराजांचे वेळेस कान्होजी शिर्के यांनीं सदरहू दोन्हीं वतनाचे वडीलपण शिक्का आपला ह्मणून, श्रीकृष्णेचें दिव्य करून, राजपत्रें करून घेतलीं होतीं तीं गळाठलीं. यास्तव सातारीयाचे दप्तरचे बार लिहून आणवून, भिकाजीराव शिर्के यांचे नांवें साल तिगस्तां निवाडीयाची यादी करून दिल्ही आहे, त्याची गुदस्तां आह्मांपासून आठ हजार रुपये नजर घेऊन, पुर्ती चौकशी करणेंविषयीं आह्मांस पत्रें दिल्हीं आहेत. त्याप्रमाणें हल्लीं पुरती चौकशी करावी ह्मणून आक्षेप केला. त्याजवरून कृष्णराव अनंत, किल्ले सातारा, यांसी पत्रें पाठविलीं. त्यांनीं तेथील मजमू दप्तरीं शोध करून, दाहा पत्रें बार झालीयाची यादी पाठविली. त्यांतील अन्वयें स्वामी यांनीं राजश्री कान्होजीराजे व कुवरजी व जयसिंग व बहिरजी व वाघोजी व उदतसिंग व बाजी बिन रामोजी राजे शिर्के यांसी दिल्हें वतनपत्र ऐसेजें, शाहूनगर नाजिक किल्ले

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सातारा, येथील मुक्कामीं विनंति केली कीं, मामले रायरी शिरकाण येथील सरदेशमुखी व सुभा दाभोळ, येथील देशमुखी हीं दोन्हीं वतनें पुरातन आपल्या वडिलांचीं होतीं. तीं कालगतीनें कित्येक दिवस चालत नव्हतीं. त्याउपरी महाराज राजारामसाहेब यांसमागमें रामोजी राजे शिर्के चंदीस जाऊन, कष्ट मेहनत करून, सेवा केली. त्याजवरून महाराजांनीं सदरहू दोन्हीं वतनें, आपले बाप रामोजी शिर्के यांसी अजरामरहामत करून, वतनपत्रें दिलीं. त्याप्रमाणें अनभवीत असतां, देवजीराव शिर्के, आमचे चुलते विठोजी व दौलतराव शिर्के या त्रिवर्गांचा कजिया वतनसंबंधें लागोन, वतनाचे विभाग करून द्यावे ह्मणून विनंती केल्यावरून महाराजांनीं हरदू वतनपैकीं निमें वतन व दाभोळ सुभ्याचें देशमुखीचें वडीलपण देवजीराव शिर्के यांसीं देऊन, वतनपत्रें करून दिल्हीं. आह्मीं प्रबुद्ध झालीयावर, त्यांजकडे वडीलपण शिक्का चालों दिल्हा नाहीं. सरदेशमुखीचें वतन पुरातन वडिलांचें खरें, परंतु पाताणे परभू मुतालीक अनभवीत होता. त्यासी वाद सांगोन कष्ट मेहनत व टक्का पैका वेंचून वतन करून घेतलें असतां, देवजीराव व विठोजीराव व दौलतराव शिर्के यांसी वतन विभागून घ्यावयासी संबंध नाहीं. जें देणें तें वडीलपणें आपण देऊं. महाराजांनीं पत्रें करून दिल्हीं, त्या आश्रयानें देवजी शिर्के आम्हांसीं कजिया करितात. त्याचा आमचा करिना मनास आणून निवाडा केला पाहिजे म्हणून विनंति केली. त्यावरून त्याचा व तुमचा करिना मनास आणून, निवाडा करावयासी पंचाईत नेमून दिल्ही बितपशीलः—

आप्पाजी बिन विठोजी माने, पाटील, कसबे रहिमतपूर, संमत कोरेगांव, प्रांत वांई १.	पटवोजी पाटील, मौजे वाघेरी, प्रांत कऱ्हाड १.
काळोजी पाटील, मौजे पळसदेव, परगणे इंदापूर १.	रावजी जगताप, कसबे सासवड १. (नांव लागलें नाहीं.) पाटील, मौजे माणकेश्वर, परगणे भूम १.

येणेंप्रमाणें पांचजण वतनदार हुजूर आणून, निवाडा करावयाविषयीं आज्ञा केली. त्यांनीं मनास आणितां, दोन्हीं वतनाचें वडीलपण शिक्के रामोजी शिर्के यांचे, असे पंचाईतमतें होतांच देवजीराव शिर्के बोलिले कीं, दोन्हीं वतनाचें वडीलपण शिक्का आपला. याप्रमाणें कान्होजी शिर्के यांनीं श्री कृष्णावेणी संगमीं उभे राहून, आमचे हातावर पाणी घालून, दशरात्र पार पडल्यास निमें वतनासी व दाभोळ सुभ्याचे देशमुखीचे वडीलपण शिक्क्यासी आपणास संबंध नाहीं. त्यावरून तुह्मीं शके १६६५ रुधिरोद्गारीनाम संवत्सरीं, श्री कृष्णावेणी संगमीं उदकांत उभे राहून उच्चार केला जे, दोन्हीं वतनें पुरातन वडिलांचीं होतीं, तीं कालगतीनें बहुत दिवस जाऊन भोगवटा तुटला होता. त्यास आमचे बाप रामोजी शिर्के यांनीं स्वामीसेवा एकनिष्ठेनें करून, कष्ट मेहनत व टक्का पैका वेंचून दोन्हीं वतनें साधलीं. वडीलपण शिक्का आमचा ऐसा उच्चार करून, देवजीराव शिर्के यांच्या हातावरी तुह्मीं पाणी घातलें. नेमास पार पडलेत. त्याजवरून दोन्हीं वतनें तुम्हांस दरोबस्त देऊन, हें वतनपत्र

करून दिल्हें असें. देवजी शिर्के यासी निमें वतनासी व दाभोळ मामल्याचे देशमुखीचे वडीलपणासी संबंध नाहीं म्हणून व सदरहू दोन्हीं वतनांसीं विठोजी व दौलतराव व कान्होजी व बहिरोजी शिर्के यांसीं संबंध नाहीं, ऐसीं राजपत्रें तुम्हांजवळ आहेत. त्या तीस(?) अन्वयें मामले दाभोळ, येथील देशमुखीचे वतनाविषयीं राज्याभिषेक शके ४४ चे सालचें राजपत्र, राजा शाहू छत्रपति स्वामी यांनीं, पिलाजीराव बिन गणोजीराव व देवजीराव बिन पिलाजीराव देशमुख मामले दाभोळ यांसीं दिल्हें वतनपत्र ऐसेजें, तुमचे चुलते देवजी शिर्के स्वामीसंन्निध किल्ले सातारीयाचे मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, मामले दाभोळ येथील देशमुखीवतन पूर्वी ब्राम्हणाचें, त्यास त्या ब्राम्हणापासून इदलशहा पातशहासीं हरामखोरी झालीयाबद्दल त्यास मुसलमान केलें. आणि देशमुखीचें वतन कित्येक वर्षें अमानत असतां, शृंगारपुरीं सूर्याजी राजे सुर्वे यांनीं पिलाजीराव शिर्के यांसीं आपली लेक दिल्ही. त्यांनीं पातशहास विजापुरीं अर्ज पोंचविला. त्यावरून पिलाजीराव यांस दाभोळ मामल्याचे देशमुखीचें वतन मन्हामत केलें. त्याचा भोगवटा व्हावा तों छत्रपति थोरले स्वामीस तळकोंकण काबीज झालें यास्तव न जाहला. त्याउपरी कांहीं वर्षें थोरले शिवाजीमहाराज यांनीं आपली लेक राजकुवरबाई गणोजीराव यांसी दिल्ही. व पिलाजीराव शिर्के यांची लेक जिऊबाई संभाजीराजांस केली. याउपरी कोंकणांत लखम सांवत फिसाहत करून, वसाहत होऊं न देई. याजकरितां महाराजांनीं पिलाजीरायास सांवताकडे पाठविलें. त्यांनीं सांवतास आणून, राजांस भेटवून तह करून दिल्हा. ते समयीं महाराज कृपाळू होऊन, उर्जित करावयावरी आले. ते समयीं चिरंजीव राजकुवरबाईस पुत्र होईल, त्यास मामले दाभोळ येथील देशमुखीचे वतनाचा भोगवटा चालत नाहीं. तें वतन करून देऊं. त्याजवर राजश्री राजारामसाहेब तांब्राचे दाटीचे प्रसंगें कर्नाटकांत चंदी प्रांते गेले. तिकडे तांब्राच्या फौज झुलफुकारखान जाऊन चंदीस वेढा घातला. ते समयीं गणोजीराव मोगलांचे चाकर असतां त्यांनीं स्वामीस व सौभाग्यवती ताराबाई व राजसबाई व राजकुंवरसहित चंदीहून काढून रात्रीची अरणीस पाववितीं. त्या सेवेमुळें राजश्री राजाराम संतोषी होऊन काय पाहिजे ते मागा ऐसी आज्ञा केली. तेव्हां गणोजीराव यांनीं विज्ञापि केली जे, दाभोळचे देशमुखी इदलशहानीं अमानत केली होती. ते त्यांनीं आपले बाप पिलाजीराव यांसी दिल्ही; परंतु भोगवटा न जाहला. त्या वतनावर कोणी वतनदार नव्हता म्हणून चंदीचे मुक्कामीं राजश्री खंडो बल्लाळ चिटणिवीस यांस दिल्ही आहे. ऐसीयासी आपणांस आपण देऊं, ऐसें अभय पूर्वीं आहे. त्याजप्रमाणें आपणांस पुत्र झाला आहे. त्याचें नांव पिलाजीराव ठेविलें असे. तरी तें वतन आपणास द्यावें. त्यावरून राजश्री खंडो बल्लाळ याचें समाधान करून, त्यास दुसरें वतन देऊं केलें. आणि दाभोळचें देशमुखीचें वतन गणोजी राजे यांसी देऊन, पत्रें करून दिल्हीं. व खंडो बल्लाळ यांस पत्रें दिल्हीं होतीं, तीं घेऊन गणोजीराव यांजपाशीं दिलीं. येलुराहून स्वामी स्वार होऊन, स्वराज्यांत स्वदेशीं आले.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

त्यांजसमागमें रामोजी बिन कान्होजी शिर्के, गणोजीरावाचे पुतणे देशीं आले. त्यांजपाशीं वतनाचीं पत्रें देऊन इकडे पाठविलें. देशीं आलीयावर वतन चालवण्याबद्दल ताकीद पत्रें मागितलीं तीं, राजश्री स्वामींनीं देवविलीं. त्या पत्रांत आपलें नांव घालून, राजपत्रें घेतलीं आणि वतनाची कमाविस करूं लागले. आपणास वतनास दखल होऊं देत नाहीं. यामुळें याचा आमचा कथला होऊं लागला आहे. त्यास त्याचा आमचा करिना मनास आणून, गणोजीराव यांचें वतन, त्यांचे पुत्रास व आपण बंधु आपणास दिल्हें पाहिजे ह्मणून, विदित केलें. तें स्वामींनीं अंतःकरणांत आणून याची व त्याची मनसुबी करावी; स्थल व गोत लावून द्यावें; ऐसें करून विठोजीराव व दौलतराव व कान्होजीराव व बहिरजीराव शिर्के यांसी हुजूर आणून, गोतांत राजीनामे द्या व स्थळांत जाऊन व्यवहार सांगा, गोतमुखें न्याय होईल त्याप्रमाणें वतन चालविलें जाईल, ऐसी आज्ञा केली. त्यास विठोजी व वरकड मान्य न होत व राजीनामे न देत. नसती दिक्कत घेऊन कथले करूं लागले. त्याउपरी स्वामींनीं चंदीस सरकारकून होते, त्यामध्यें जे हाजीर आहेत व राजश्री शंकराजी मल्हार, मोंगलाईतील सैदाचे तर्फेनें आले होते, व राजश्री मानसिंग मोरे व खंडेराव दाभाडे सेनापती हे चंदीस, राजश्री काका स्वामीसन्निध होते, त्यास बलावून व राजश्री सुलतानजीराव निंबाळकर, सरलष्कर व वरकड भले लोक व कित्येक परगणीयाचे देशमुख व देशपांडे व मोकदम व मुक्तसर यांस सभेस बसवून त्यास यांचा करिना पुशिला. तेव्हां समस्तांनीं विदित केलें कीं, देवजी शिर्के यांनीं करिना विदित केला, तो यथार्थ आहे. वतन गणोजीराव शिर्के यांसी दिल्हें. रामोजी शिर्के, त्याचे पुतणे म्हणून, त्यांनीं वतनाचीं पत्रें त्यापाशीं देऊन इकडे पाठविले. तेव्हडीयानेंचं रामोजी व त्यांचे भाऊ वतन अनभवूं लागले. वतनाचे खावंद पिलाजी शिर्के हे खरे, ऐसें साक्षपूर्वक विदित केलें. त्यावरून विठोजी व दौलतराव व कान्होजी व बहिरजी शिर्के हे खोटे, ऐसें कळूं आलें. त्यास सदरेवरून उठवून लाविलें. स्वामीस थोरले कैलासवासी स्वामींचें वचन प्रतिपाळावें व कैलासवासी राजश्री काका स्वामीचें दत्त प्रतिपालन करावें हें अगत्य म्हणून, तुम्हांवर स्वामी कृपाळू होऊन, मामले दाभोळचे देशमुखीचें वतन, तुम्हांसच बहाल केलें असे. तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतनाचा उपभोग करून, दंडकप्रमाणें वतनाची सेवा करीत जाणें. या वतनास रामोजी शिर्के यांचें पुत्रास व विठोजी व दौलतराव शिर्के यांस संबंध नाहीं म्हणून." व रायरी मामल्याचें पत्र, राज्याभिषेक शके ४४ हेमलंबीनाम संवत्सरें, राजा शाहू छत्रपती यांचें पिलाजीराव बिन गणोजीराव व देवजीराव बिन पिलाजीराव शिर्के सरदेशमुख, मामले रायरी, यांचें नांवें दिल्हें वतनपत्र ऐसेजें, "तुम्हांमध्यें राजश्री देवजी शिर्के, यांनीं विदित केलें कीं, रायरी मामला, महाल बरा येथील सरदेशमुखी शिर्के याची पुरातन, निजामशहा पातशहांनीं दिल्ही होती. ती बहुत दिवस भोगवटा चालिला. त्याजवर आपले वडिलांनीं वतनावर मुतालीक दलपतराव ह्मणून पाताणा

प्रभू ठेवून, आपण पातशाही मनसब दौलत करूं लागले. त्याउपरी जावलीकर चंद्रराव यांनीं रायरी किल्ला घेतला. त्या कारकिर्दीस मुतालीक तोच सरदेशमुख म्हणून, वतनाचा भोगवटा करूं लागले. त्यानंतर स्वामींचें राज्य जाहलें, तेव्हां दलपतराव यास कांहीं हक्काची मोईन करून दिल्ही. तेवढ्यावर चाकरी करून वतन अनभवीत आहे. त्याउपरी स्वामी राज्याधिकारी होऊन चंदीस गेले. तिकडे मोंगलांच्या फौजा नामजाद जाहल्या. चंदीस वेढा झुलपिकारखानानें घातला. ते समयीं गणोजीराव व त्यांचे पुतणे, रामोजी शिर्के मोंगलाईंत होते. त्यास कौल देऊन चंदीस आणिलें. दौलतेचा सरंजाम करून चालवीत होते. त्या प्रसंगीं वतनदारांचीं पुरातन वतनें, ज्यांचीं त्यांस दिल्हीं. व कित्येकांस नवीं करून दिल्हीं. ते समयीं गणोजीराव व रामोजीराव यांनीं रायरी मामलेयाची सरदेशमुखी पुरातन आपली, आपणास द्यावी, मुतालीक दूर करावा, ह्मणून विनंति केली. ते प्रसंगीं आप्पाजी दलपतराव, मुतालीक चंदीस आला होता. त्याजला स्वामींनीं शपथ घालून करिना पुशिला, तेव्हां तो आपण मुतालीक म्हणोन कबूल झाला. त्याजवरून शिर्के सरदेशमुख ऐसें खरें झालें. तो मुतालीक दूर करून, सरदेशमुखीचें वतन, गणोजीराव व रामोजीराव शिर्के यांसी करार करून देऊन, तानाजीराव वडील भाऊ त्याचे कान्होजी, त्याचे रामोजी यास्तव त्याचें नांव आधीं लेहून, पिलाजीराव धाकटे भाऊ त्याचे पुत्र, गणोजीराव म्हणून त्याचें नांव मागून लेहून राजपत्रें करून दिल्हीं. त्याउपरीं राजश्री स्वामी देशास आले. समागमें रामोजी शिर्के पत्रें घेऊन आले. त्यांनीं नवीन ताकीदपत्रें मागितलीं. त्यांत गैरवांका समजावून, आपलें एकाचेंच नांवें पत्रें घेऊन, वतनाचा अनुभव करूं लागले. आपला विभाग व्यावयासी कथला करितात. येविषयीं मनास आणून, पारपत्य केलें पाहिजे, म्हणून त्याजवरून विठोजी व दौलतराव व कान्होजी व बहिरजी शिर्के यांसी हुजूर आणून, जामीन देऊन मनसुबीस उभें राहणें; निवाडा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें म्हणून आज्ञा केली. त्यास तुम्हीं राजीनामा व्यावयासी सिद्ध जाहले. ते चौघेजण राजीनामा देत नवते. कथले करूं लागले. यास्तव त्यास सदरेवरून उठविलें. आणि सभासद हुजूरचे सरकारकून व शंकराजी मल्हार पूर्वी चंदीस होते ते, मोगलाईंतून स्वामीसन्निध आले. त्यास व राजश्री खंडेराव दाभाडे सेनापति व मानसिंग मोरे व सुलतानजीराव निंबाळकर व वरकड भले लोक यांसी करिना पुशिला. त्यांनीं चंदीचे प्रसंगीं गणोजीराव शिर्के यांनीं स्वामीसेवा करून कार्यास आले. याकरितां हें वतन त्यांस दिल्हें. उभयतां शिर्के यांचें आहे. येविषयीं विदित केलें. त्याप्रमाणें विठोजी व दौलतराव व कान्होजी व बहिरजी शिर्के यांसी मान्य करून, वतन अनभविणें म्हणून आज्ञा केली. परंतु ते मान्य न होत. यास्तव स्वामी तुम्हांवर कृपाळू होऊन, तुह्मांस मामले मजकूरचें वतन बहाल केलें असे. तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभव करून सुखरूप राहणें ह्मणून. यावरून पंचाईतमतें मनास आणितां तुमचा व लक्ष्मणराव शिर्के यांचा मामले रायरी शिरकाण, येथील सरदेशमुखीचा

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली. त्याची चवकशी करून, पेशजी सौल तिगस्तां सन. इहिदे समानीनचे सालीं, रायरी मामल्याचे सरदेशमुखीचे वतनाचा निमें विभाग तुम्हीं घ्यावा या अन्वयें निवाडपत्रें तुमचें नांवें तयार झालीं. त्याजवर शिक्के व्हावे तों, इंग्रज बोरघाटाचे माथां आला. पुण्यांत गडबड जाहली. यास्तव, नजरेचे ऐवजाचा भरणा न होय. सबब ऐवजाचे तरतुदीकरितां निवाड्याची यादी घेऊन, तुम्हीं नागपूर प्रांतीं गेलां. ही संधी पाहून, तुम्हीं गैरहाजीर झाल्यामुळें पुन्हा चवकशी जाहली पाहिजे म्हणून, लक्ष्मणराव शिर्के यांनीं विनंति करून, आठ हजार रुपये सरकारांत नजर देऊन, रायरी मामल्याचे सरदेशमुखीचें वतन, दरोबस्त आपल्याकडे चालतें करावयाविषयीं पत्रें तयार करविलीं. त्याजवर शिक्के व्हावे तों तुम्हीं नजरेचे ऐवजासुद्धां हाजर होऊन, त्याचे पत्रावर शिक्के न व्हावे, याविषयीं अडथळा करून विनंति केली कीं, पेशजीचे कराराप्रमाणें सरकारचे नजरेचा ऐवज सरकारांत घेऊन, रायरी मामल्याचे सरदेशमुखीचे निमे विभागाविषयीं, आमचें नांवें पत्रें तयार जाहलीं आहेत, त्याजवर शिक्के करून द्यावे म्हणून. त्यास कैलासवासी शाहू महाराजांचे वेळेस, कान्होजी शिर्के यांनीं सदरहू दोन्हीं वतनाचें वडीलपण शिक्का आपला म्हणून श्रीकृष्णेचें दिव्य करून राजपत्रें घेतलीं होतीं, ते गळाठलीं. यास्तव सातारीयाचें दफ्तरचे बार लेहून आणवून, भिकाजीराव शिर्के यांसीं, निवाड्याची यादी करून दिल्ही आहे. त्याची पुन्हा पुर्ती चवकशी करावी म्हणून लक्ष्मणराव शिर्के यांनीं आक्षेप केला. त्याजवरून कृष्णराव अनंत, किल्ले सातारा यांसीं पत्रें लिहिलीं. त्यांनीं तेथील मजमू दफ्तरीं शोध करून, दाहा पत्रें बार जाहलीयाची यादी पाठविली. त्यांची व दोन्हीं वतनास विठोजी व दौलतराव व कान्होजी व बहिरजीराव शिर्के यांसी संबंध नाहीं. सदरहू दोन्हीं वतनें पिलाजीराव बिन गणोजीराव व देवजीराव बिन पिलाजीराव शिर्के यांनीं अनभवावीं म्हणून, गोत महजरापूर्वील राजपत्रें तुह्मांपाशीं आहेत, त्याची चवकशी करितां एकले गणोजीराव शिर्के यांसच दाभोळ सुभ्याचे देशमुखीचें वतन दिल्हें, व मामले रायरी शिरकाण, येथील सरदेशमुखीचें वतन गणोजीराव शिर्के याचे भिडेवरून, रामोजीराव शिर्के यांस महाराजांनीं आपणाजवळ ठेऊन घेऊन, वतनावर पाताणा परभू मुतालीक होता त्यास दूर करून, गणोजीराव व रामोजीराव या उभयतांचें नांवें, रायरी मामल्याचे सरदेशमुखीचें वतनाचीं पत्रें करून दिल्हीं. त्या पत्रांचा लोप रामोजीराव यांनीं करून, दुसरीं पत्रें आपल्या साधकांचीं घेतलीं. आणि दोन्हीं वतनें आपणच अनभवूं लागले. वतनाचे कष्ट, मेहेनत, जीवाभ्यश्रम, साहस गणोजीराव शिर्के याणींच केले. म्हणून चंदीचे साक्षींत गोत महजरा पूर्वीच पुरलें. त्याचसमयीं विठोजी व दौलतराव व कान्होजीराव व बहिरजीराव शिर्के यांसी महाराजांनीं हुजूर आणून, मनसुबीस राजी होऊन राजीनामे देणें, ह्मणून आज्ञा केली. ते जामीन न देत व मनसुबीस उभे न राहत. यास्तव दोन्हीं वतनांस त्यांजला संबंध नाहीं. तुमचे वडिलीं दोन्हीं वतनें अनभवावीं. येविषयीं राजपत्रें झालींच आहेत. त्याजउपरीं पुनः महाराजांपाशीं उभयतां वादीयांचा फिरोन कजिया पडिला. यास्तव पुन्हां चंदीचे साक्ष मोझे मनास आणून, महाराजांनीं गोत महजर शिक्क्यानिशीं करून दिल्हा. त्याच अन्वयें कान्होजीराव शिर्के, यांनीं सबंद पत्र लेहून दिल्हें व मातुश्री ताराऊसाहेब यांनीं चंदीचे माहितगारीनें मनास आणून, शपथ पुरस्कर निवाडपत्र करून दिल्हें. एकूण

NATIONAL ARCHIVES OF INDIA

तिन्हीं पत्रें यथान्यायें झालीं असतां, फिरोन कजिया उपस्थित करोन, कान्होजी शिर्के यांनीं श्रीकृष्णेचें दिव्य केलें. त्याचा विचार पाहतां, उभयतां वादी यांचा मूळपुरुष वाघोजी शिर्के त्यास पुत्र तानाजीराव, पिलाजीराव एकूण दोघे. पैकीं वडील तानाजी यासी पुत्र कान्होजी, त्याचे रामोजी, त्याचे कान्होजी, त्याचे हल्लीं लक्ष्मणराव; व धाकटे पिलाजी. त्यास पुत्र देवजीराजे शिर्के त्याचे हल्लीं तुह्मीं एका मूळपुरुषाचा वंश असतां, मामले रायरी शिरकाण, येथील सरदेशमुखीचे वतनाचें वडीलपण शिक्का आपला ऐसें देवजी शिर्के ह्मणत नसतां व वडीलपणें आह्मीं देऊं तें देवजीराव शिर्के यांनीं घ्यावें, ऐसें कान्होजीराव शिर्के यांचें बोलणें असतां, वडीलपण शिक्का आपला ह्मणून, श्रीकृष्णेचें दिव्य कान्होजीराव यांनीं केलें. त्यास कान्होजीराव यांचें घराणें वडील असतां, वडीलपण शिक्का आपला ह्मणून दिव्य केलें. तें दिव्य विरुद्ध कैसें पडेल ? व दिव्याचे उच्चारांत देवजी शिर्के यांसी वतनास संबंध नाहीं असें असतें तरी दिव्य लागतें. ते गोष्ट कांहींच नाहीं. तेव्हां वडील असतां वडीलपणाचें दिव्य केल्यामुळें, देवजी शिर्के यांसी वतनास संबंध नाहीं, ऐसें कैसें घडेल ? वडिलोपार्जित वृत्तीचे जीर्णोद्धाराविषयीं कोणत्याही भावाबंदांनीं टक्का, पैका खर्च करून मेहनत केली असली, तथापि वरकड भावापासून, तक्षिमेप्रमाणें खर्चाचा ऐवज घेऊन, ज्याचा विभाग त्यास द्यावा असें असतां, कष्ट, मेहनत एकले रामोजीराव शिर्के यांनींच केली ऐसेंही नाहीं. राज्यांत मातबरी गणोजी राजे यांची. त्यांचे भिडेवरून व त्यांनीं चंदीचे समयीं जीवाभ्य मेहनत, श्रम, साहस केल्यामुळें दोन्हीं वतनें साध्य केलीं. ऐसें चंदीचे साक्ष मोझे महाराजांनीं पाहिलें असतां, त्याविषयीं दिव्य करणें व करवणें योग्य नव्हे. हाच अर्थ महाराजांनीं समजोन, पुढें दोन वर्षांनीं, तुळाजी आंगरे सरखेल यांसी हातरोखा, सौभाग्यवती सकवारबाईसाहेब यांचे अग्रहास्तव, दिव्यपत्राचे अन्वयें सिद्ध जाहला. त्या हातरोख्याचे शेवटीं महाराजांनीं स्वदस्तुरें लिहिलें आहे कीं, यांसी पूर्वी राजश्री—यांहीं पत्रें वतनांचीं दिल्हीं आहेत. त्याप्रमाणें आम्हीं दिल्हीं आहेत. त्याप्रमाणें तुह्मीं चालवणें. उजूर न करणें ह्मणून लिहिलें आहे. तेव्हां दिव्य भिडेमुळें जाहलें असें, तेच समयीं महाराजांचें ध्यानांत येऊन पूर्वील पत्राप्रमाणें चालवणें ह्मणून लिहिलें आहे व या दिव्याचा विचार साल तिगस्तां तुमचें नांवें निवाडपत्र दिल्हें आहे, त्या निवाडपत्रीं सर्व मजकूर उगवलाच आहे. तथापि हल्लीं चवकशी करितां, पेशाजी दिव्य होऊन राजपत्रें जाहलीं. त्याजवर शिक्केही जाहले. तथापि दिव्याच्या मजकुरामुळें तुम्हांस विभाग न द्यावा असें होत नाहीं. याप्रमाणें सिद्ध जाहलें. यास्तव पुन्हां चवकशी करावी म्हणून, लक्ष्मणराव शिर्के यांनीं विनंति करून, आठ हजार रुपये सरकारांत नजर देऊन, रायरी मामल्याचे सरदेशमुखीचें दरोबस्त वतन आपल्याकडे चालतें करावयाविषयीं पत्राची यादी करून घेऊन, त्याप्रमाणें पत्रें तयार करविलीं. त्याजवर शिक्के व्हावयाचे राहिले आहेत. तीं पत्रें व यादी रद्द करून, यावरून कान्होजी शिर्के यांनीं, सौभाग्यवती सकवारबाईसाहेबांचेही माहितीनें आग्रहामुळें दिव्य केलेंसें करून, दोन्हीं वतनास देवजीराव शिर्के यांसी संबंध नाहीं ह्मणून राजपत्रें घेतलीं. त्यावरून दोन्हीं वतनाचे धनी, लक्ष्मणराव शिर्के होतात, असें घडत नाहीं. व गोत महजरा पूर्वी, रामोजी शिर्के यांनीं पूर्वील पत्राचा लोप करून, लोभास प्रवर्तून, आपले साध-

काचीं दुसरीं पत्रें घेतलीं. ऐसे चंदीचे साक्षी मोझे पुरले. यामुळें विठोजीराव व दौलतराव व बहिरजीराव व कान्होजीराव शिर्के, इनसाफास उभें न राहत. सबब दोन्हीं वतनांसीं त्यांस संबंध नाहीं म्हणून राजपत्रें तुम्हांजवळ आहेत, यावरून दोन्हीं वतनें तुमचींच कशीं होतील ? पूर्वी शाहूमहाराज यांनीं सरकारकून व मुत्सदी व जमीदार मिळवून, वावन्न असामी यांचे विद्यमानें, चंदीचे साक्षी मोझे मनास आणून, मामले रायरी शिरकाण येथील सरदेशमुखीचें वतन वडिलांचें. तेथील वडीलपण शिक्का, मानपान, तश्रीफ, आधीं कान्होजीराव बिन रामोजीराव शिर्के यांनीं घ्यावी; व सुभा दाभोळ येथील देशमुखीचें वतन अजरा मन्हामत गणोजीराव याचें नांवें, यास्तव तेथील वडीलपण, शिक्का, मानपान, तश्रीफ, आधीं पिलाजीराव बिन गणोजीराव यांनीं घ्यावी. त्यांचे मागून मानपान तश्रीफ कान्होजीराव बिन रामोजीराव यांनीं घ्यावी व दोही वतनाचें उत्पन्न निमेंनिम प्रमाणें दोघांनीं वांटून घ्यावें. म्हणून गोत महजर शिक्क्यानिशीं, शके १६४० विलंबीनाम संवत्सरीं करून दिल्हा. त्याअन्वयें राजपत्रें जाहलीं. व सदरहू महजराचे अन्वयें वंशपरंपरेनें चालावयाविषयीं तळेगांवचे मुक्कामीं, खंडेराव दाभाडे सेनापति व मातबर सरदार, यांचे विद्यमानें कान्होजीराव शिर्के यांनीं देवजीराव शिर्के यांचें नांवें प्लवंगनाम संवत्सरीं, श्री सिर्काईची व काशींत महापातकें केल्याचें शपथपूर्वक पत्र लेहून दिल्हें असें असतां, फिरोन कजिया करूं लागले. तेव्हां शाहूमहाराज यांनीं शिर्केयांसी पूर्वील साहेबांचें देणें आहे, यानिमित्यें सत्य, सुकृत व थोरले महाराजांची शपथ व गंगा स्मरोन निवाडा करावा म्हणून, कैलासवासी ताराऊसाहेब यांसी विनंति करून, गंगोदकाच्या व श्री बाळकृष्ण देवाच्या तुळसी व यादवभट उपाध्ये व रघोजी भोंसले व राणोजी भोंसले व कित्येक मातबर सरदार, यांबरोबर उभयतां शिर्के यांसी देऊन, त्यांजकडे पाठविलें. त्यांनीं मागील माहितगारीनें इनसाफाची छान करून, महजराचे अन्वयें सर्वांचे विद्यमानें निवाडा करून, देवजी शिर्के यांचें नांवें, दुर्मतीनाम संवत्सरीं निवाडपत्र करून दिल्हें. एकूण तिन्हीं पत्रें विचार होऊन, न्याय शुद्ध झाला. त्याअन्वयें करून हल्लीं हें पत्र दिल्हें असे. तरी सन इहिद्देचे सालीं, पंचाईतमतें निवाडा होऊन, तुमचें नांवें निवाडपत्रें करून दिल्हीं, तीं यथार्थ आहेत. त्याजवर तुम्हीं शिक्के करून घेऊन, त्याप्रमाणें तुम्हीं व त्यांनीं चालावें. त्या पत्रांत वरकड विभागाचा मजकूर सर्व यथास्थितच उगवला आहे. परंतु गोत महजरीं, मामले रायरी शिरकाण, येथील सरदेशमुखीचें वतनाचें वडीलपण, शिक्का मात्र लक्ष्मणराव शिर्के यांचे वडिलांकडे, याप्रमाणें ठरलें असतां, शिक्क्यासंबंधीं उत्पन्न, नक्त व वस्त्रें दरोबस्त लक्ष्मणराव शिर्के यांजकडे; वरकड उत्पन्नापैकीं निमें तुम्हांकडे ऐसें लिहिलें आहे. तें निवाडपत्रीं समजोन लिहिलें नाहीं. यास्तव पेशजी कैलासवासी शाहूमहाराज यांनीं गोत महजरीं ठराव केला आहे, त्याप्रमाणें मामले रायरी शिरकाण येथील वडीलपण शिक्का मात्र, लक्ष्मणराव शिर्के यांजकडे; वरकड दरोबस्त वतनसंबंधीं उत्पन्न निमें त्यांजकडे व निमें तुम्हांकडे याप्रमाणें ठराव केला आहे. त्याप्रमाणें तुम्हीं आपला विभाग अनभवीत जावा. सुभा दाभोळ येथील देशमुखीचें वतनाचा कजिया आहे, त्याचा विचार पेस्तर मनास आणून, आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

JHA e-7
95403 Mayn/Dec (72677)

Decisions fr. the Shastri and Peshwa Daftar G. S. Vad

Microfilm 7/1/81 11-12-87

EXM 12/2/90 12/2/90

NATIONAL ARCHIVES OF INDIA

Digitized with financial assistance from

NSDL
Technology, Trust & Reach

on 16 November, 2018